सोलापूर

SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

४० वा वर्धापन दिन

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, १ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक २७२ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com



## दै. सोलापूर 'तरुण भारत'च्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### शिवसेना महानगर व कामगार सेनेच्यावतीने अस्मिता गायकवाड यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

शिवसेना महानगर व महाराष्ट्र कामगार सेनेच्यावतीने शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांच्या जन्मदिनानिमित्त कामगार सेनेचे प्रदेश अध्यक्ष व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगर प्रमुख विष्णू कारमपुरी यांच्या हस्ते त्याच्या निवासस्थानी शाल व पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात दिल्या. यावेळी शिवसेना युवती सेनेचे रेखा आडकी, अ‍ॅड. मुनीनाथ कारमपुरी कामगार सेनेचे प्रसिद्धीप्रमुख विठ्ठल कु-हाडकर, श्रीनिवास बोगा, गुरुनाथ कोळी, जेष्ठ नेते इम्तियाज बेलिफ आदी उपस्थित होते.



### ज्येष्ठ नागरिक एकता मंचतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

वीरशैव कक्कया ढोर समाज जेष्ठ नागरिक एकता मंचतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. भवानी पेठ येथील ढोर गल्ली समाज मंदिरात हा समारंभ पार पडला. ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी दत्तात्रय शिंदे, सतीश शिंदे, तुकाराम महाराज कोकणे, विजयकुमार कटके, अबाजी शिंदे, नागनाथ नारायणकर, चंद्रकांत शिंदे, धनंजय सोनवणे, दत्तू इंगळे , विजयकुमार सोनवणे, सुनील सोनवणे, शामराव व्हटकर, दत्तात्रय अवसरे, मुकुंद शिंदे, मारुती जोगधनकर आदींसह महिला व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### युवकांनी समाजासाठी कार्य करावे : प्रा. प्रशांत स्वामी

**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

विद्यार्थामध्ये आत्मविश्वास, कौशल्यविकास आणि संयोजन कौशल्य हे गुण विकसित व्हावेत तसेच जीवनातील काही वर्षे सम ाजासाठी वेचण्याची मानसिकता निर्माण व्हावी यासाठी अशा उपक्रम ातून सहभाग नोंदवावा, असे प्रतिपादन ए.जी. पाटील इंजिनिअरिग कॉलेजे प्रा. प्रशांत स्वामी यांनी केले. ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील विवेकानंद समिती आणि विवेकानंद केंद्र, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने 'युवा नेतृत्व विकसन उपक्रम अंतर्गत ' (प्रज्वलित तरुण) या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून प्रशांत स्वामी मार्गदर्शन करीत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. तुकाराम ना. शिंदे होते. या कार्यक्रमाच्या प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयातील विवेकानंद समितीचे समन्वयक प्रा. डॉ. रंजना बनसुडे व हरिष तवाणी हे होते. कार्यक्रमाचे सुरुवात ओंकार प्रार्थना व गीताने झाले. प्रास्ताविक अश्विनी नंदाल हिने केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय कु. रुतिका गाजूल हिने करुन दिला. सूत्रसंचालन समृध्दी गवंडी, आभार प्रा. डॉ. रंजना बनसुडे यांनी केले.



### एसव्हीसीएस प्रशालेत शिक्षण सप्ताह साजरा

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**


राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त एसव्हीसीएस हायस्कूलएमआयडीसी येथे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण सप्ताह पार पडला. अध्ययन अध्यापन साहित्य दिवस या उपक्रमामध्ये भिंती पत्रके, शैक्षणिक साहित्य प्रदर्शन, हस्तलिखित प्रदर्शन, मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस यामध्ये गणितीय परिपाठ व निपुण प्रतिज्ञा, गणित तज्ञांची माहिती, गणितीय कथाकथन, कोडी व खेळ, क्रीडा दिवस यामध्ये क्रीडा परिपाठ, क्रीडा शपथ, देशी खेळाचे महत्व, खेळ व व्यायाम, सांस्कृतिक दिवस यामध्ये पारंपरिक वेशभूषा, नृत्य कथाकथन गायन आणि एकांकिका, कौशल्य व डिजिटल उपक्रम दिवस यामध्ये बांबू कला, प्रथमोपचार, मिशन लाईफच्या दृष्टीक्षेपात इको क्लब उपक्रम व शालेय पोषण दिवस यामध्ये इको क्लब ची स्थापना, वृक्षारोपण शालेय पोषण आहार व त्यातून मिळणारा उष्मांक व समुदाय सहभाग दिवस यामध्ये विद्यार्थी नोंदणी, स्वयंसेवक प्रसिद्धी, प्रभात फेरी, पोस्टर मेकिंग घोषवाक्ये, विद्यार्थी माहिती आदी उपक्रम घेण्यात आले. हे उपक्रम यशस्वी करण्यासाठी उपमुख्याध्यापक धनंजय नकाते पर्यवेक्षक संतोष कुमार तारके यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# राजकारणात एक तर मी राहीन, नाहीतर फडणवीस राहतील : उद्धव ठाकरे यांचा हल्लाबोल

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३१ जुलै -**

मला आणि आदित्यला जेलमध्ये टाकण्याचे षडयंत्र देवेंद्र फडणवीस यांनी रचले होते. मात्र आपण शांत होतो .पण आता शांत राहणार नसून या पुढच्या काळात राजकारणात एक तर मी राहीन नाहीतर फडणवीस राहतील, असा आक्रमक इशारा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना बुधवारी दिला.

रंगशारदा येथे शिवसेनेच्या ठाकरे गटाच्यावतीने आयोजित पदाधिकाऱ्याच्या मेळाव्यात ते बोलत होते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या मेळाव्यात पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना ठाकरे यांनी भाजपा, पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह व देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्यावर कडाडून हल्ला चढविला. ते म्हणाले,' फडणवीसांनी घरं फोडली, पक्ष फोडले पण त्यातूनही त्यांच्या हाती काहीच लागले नाही. हिंदुत्व सोडलं असा संभ्रम निर्माण केला जात आहे. तोडाफोडा आणि राज्य करा ही मोदी , शाह यांची निती आहे. न खाऊंगा न खाने दूंगा ,असे म्हणणारे खा खा खातात असा आरोपही त्यांनी यावेळी केला. पंचवीस वर्षे युतीत होतो पण त्यांनी त्याचा गैरफायदा घेतला. भाजप म्हणजे चोर मंडळी आहेत. मोदींची भाषण म्हणजे रोमांच वाटायची. पण आता त्यांची किव येते. आपल्या आयुष्यातील परीक्षा घेणार हे शेवटचं आव्हान आहे. ते यशस्वीपणे आपल्याला पेलाचे आहे. मला आणि आदित्यला जेलमध्ये टाकण्याचा डाव फडणवीसांचा होता. पण त्यांना आताच सांगतो या राजकारणात एक तर ते राहातील नाहीतर मी राहीन असे थेट आव्हानच त्यांनी फडणवीसांना दिलं आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता हल्लाबोल करताना ठाकरे म्हणाले ,' अनेक चोर लोक ग्रामिण भागात बाळासाहेबांचा फोटो वापरत आहेत. बाळासाहेबांचा धनुष्यबाण असाही प्रचार करत आहेत. त्यांच्या प्रचाराला भूलू नका. सध्या गोंधळाचे वातावरण आहे. त्यामुळे मशाल घराघरापर्यंत पोहोचवा. मशाल हे आपले चिन्ह आहे. आपल्याबरोबर अनेक जाती धर्माचे लोक मोठ्या ताकदीने येत आहेत. लोकांच्या मनात सध्याच्या सरकार आणि पक्षफोडी बाबत प्रचंड राग आहे. त्यामुळे आगामी काळात आपली सत्ता येणार, ती आणणारच असे सांगून ते म्हणाले,'पैशासाठी आईशी गद्दारी नको' आपलं हिंदूत्व वेगळं आहे. तोडा फोडा आणि राज्य करा, हे त्यांचे हिंदूत्व आहे. आग लावण्याचे काम ते करत आहे. अनेकांना आताही फोन येत आहेत. ते तुम्हाला पैसेही देतील. माजी नगरसेवकांना संपर्क केला जात आहे. पण ज्यांना जायचं आहे त्यांनी आताच जावं. आत राहून दगाबाजी करून नका. जे शिवसैनिक बरोबर आहेत. त्यांना घेवून ही लढाई लढेन आणि जिंकेन. पैसे मिळत आहेत म्हणून आईबरोबर गद्दारी करू नका. यावेळी व्यासपीठावर शिवसेना नेते आदित्य ठाकरे, माजी महापौर किशोरी पेडणेकर व अन्य नेते उपस्थित होते.

# ..त्यासाठी उद्धव ठाकरे यांना शंभर जन्म घ्यावे लागतील

## चंद्रशेखर बावनकुळे यांचा पलटवार

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३१ जुलै:**

देवेंद्रजींच्या पाठीशी जनता आहे, परमेश्वराचे आशीर्वाद आहेत. त्यामुळे त्यांचे राजकारण संपविण्यासाठी उद्धव ठाकरे यांना शंभर जन्म घ्यावे लागतील, असा प्रतिहल्ला भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

उद्धव ठाकरे यांनी फडणवीस यांच्यासह भाजपा पंतप्रधान मोदी, अमित शाह यांच्यावर कडाडून टीका केली होती. त्याला ' एक्स' वरून प्रत्युत्तर देताना बावनकुळे यांनी म्हटले आहे की,' आमचे नेते देवेंद्रजी फडणवीस यांच्याविरोधात षडयंत्र रचून त्यांना तुरुंगात टाकण्यासाठी मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरेंनी जंगजंग पछाडले ,पण मायबाप जनतेच्या आशीर्वादानं उद्धव ठाकरे देवेंद्रजींना तुरुंगात टाकू शकले नाहीत. पंतप्रधान म ोदीजी यांच्या वर तर टीका करण्याची त्यांची पात्रताही नाही, त्यामुळे घाम फोडण्याची त्यांची भाषा हास्यास्पद आहे. ठाकरेंनी देवेंद्रजींच्या पाठीत खंजीर खुपसला, तुरुंगात टाकण्यासाठी प्रयत्न केला. आता त्यांना संपविण्याची अहंकारी भाषा करताहेत, पण त्यांनी लक्षात ठेवावं, तुमचा हाच अहंकार जनता जनार्दन संपविल्याशिवाय राहणार नाही. असेही त्यांनी नमूद केले आहे.



# बार्शीच्या श्री भगवंत मंदिरात श्रावणमास प्रवचनमालेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ जुलै-**

श्री भगवंत देवस्थान ट्रस्ट व श्री बोधराज भक्त मंडळाच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी ५ ऑगस्टपासून श्री भगवंत मंदिरात दररोज सायंकाळी ६ ते ७ या वेळेत श्रावणमास प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आलेले आहे.



प्रवचनमालेचे निरुपणकार हभप गुरुवर्य डॉ. जयवंत महाराज बोधले यांच्या अमृतवाणीतून या वर्षी श्री संत एकनाथ महाराज चरित्र व तत्त्वज्ञान या विषयावर संपूर्ण महिनाभर निरुपण होणार आहे. हभप गुरुवर्य डॉ. जयवंत महाराज बोधले हे मूळ बार्शी तालुक्यातील धामणगांव येथील असून ते श्री संत माणकोजी महाराज बोधले यांचे ११ वे वंशज आहेत. यापूर्वी गुरुवर्य डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी भगवंत मंदिरात सन २००३ पासून श्रावणमास प्रवचन मालेतून अखंड विविध अध्यात्मिक विषयावर निरुपण केलेले आहे. या वर्षीही प्रवचनमाला सलग २० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. आतापर्यंत त्यांनी श्री संत नामदेव महाराज चरित्र, हरिपाठ, श्रीकृष्ण चरित्र, विष्णू सहस्त्रनाम, श्री संत माणकोजी बोधले महाराज चरित्र, चांगदेव पासष्ठी, श्री संत तुकाराम महाराज चरित्र व तत्वज्ञान, श्री संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र व तत्वज्ञान अशा अनेक अध्यात्मिक विषयावर संपूर्ण महिनाभर निरुपण केलेले आहे.

### प्रत्येक वर्षी नवीन अध्यात्मिक विषयावर निरुपण

दरवर्षी श्रावण महिन्यात एका नवीन अध्यात्मिक विषयावर अभ्यासपूर्ण निरुपण होत असल्याने ही प्रवचनमाला बार्शी शहर व पंचक्रोशीमध्ये अत्यंत लोकप्रिय झालेली आहे. या वर्षीच्या श्री संत एकनाथ महाराज चरित्र व तत्वज्ञान या विषयावरील निरुपणाचा भाविकांनी आनंद घ्यावा, असे आवाहन श्री भगवंत देवस्थान ट्रस्टचे सरपंच दिलीपदादा बुडूख आणि श्री बोधराज भक्त मंडळाचे प्रा. विलास जगदाळे यांनी केले आहे.


# १०० चारचाकी, दुचाकी गाड्यांना इंधन देणार

## प्रा. रामदास झोळ : सोलापूर येथील शांतता रॅलीसाठी नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ३१ जुलै-**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर येथे ७ ऑगस्ट रोजी शांतता रॅली होणार आहे. या रॅलीसाठी करमाळा तालुक्यातून मराठा समाजाचे समाजबांधव मोठ्या संख्येने जाणार आहेत. करमाळा तालुक्यातून मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी जाणाऱ्या बांधवांना १०० चारचाकी गाड्यांसाठी डिझेल व १०० दुचाकी गाड्यांसाठी पेट्रोल मोफत देणार असल्याचे मत दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी सांगितले.

प्रा. रामदास झोळ म्हणाले की, जिल्हाभरातून तसेच



जिल्ह्याबाहेरूनही मराठा बांधव मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने सोलापूर येथे दाखल होणार आहेत. आपणही बहुसंख्येने उपस्थित राहावे. मराठा समाजाला सरसकट आरक्षण मिळावे म्हणून सोलापूर येथे शांतता रॅली काढण्यात येणार असून सदर शांतता रॅलीत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रातून मराठा समाज, बहुजन बांधव मोठ्या संख्येने जाणार आहेत. या शांतता रॅलीला जाण्यासाठी समाज बांधव मोठ्या प्रमाणात इच्छुक आहेत. त्यांच्या प्रवासाची मोफत सोय करण्यासाठी डिझेल, पेट्रोल मोफत देण्यात येणार आहे. दुचाकी वाहनधारकांनी शक्यतो जास्तीत जास्त बुलेट गाडी आणण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन प्रा. रामदास झोळ यांनी केले आहे. पुणे सोलापूर हायवेवर इंधनाची सोय केली जाणार आहे. इच्छुक समाज बांधवांनी प्रा. रामदास झोळ फाऊंडेशन, करमाळा संपर्क कार्यालय, विकासनगर, करमाळा येथे आणि ९४०५३१४२९६ या मोबाईलवरुन संपर्क करून नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जपानने महाराष्ट्राच्या उद्योग, पायाभूत सुविधा क्षेत्रात गुंतवणूक वाढवावी : मुख्यमंत्री

## जपानचे कॉन्सुलेटची मुख्यमंत्र्यांशी सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि.३१जुलै :**

महाराष्ट्र हे उद्योगस्नेही आणि गुंतवणूकीसाठी पहिल्या पसंतीचे राज्य आहे. अनेक जपानी कंपन्या राज्यात चांगल्या पद्धतीने काम करत आहेत. भविष्यात देखील जपानने राज्यात उद्योग आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात गुंतवणूक वाढवावी, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

जपानचे नवनियुक्त कॉन्सुलेट जनरल यागी कोजी यांनी आज मुख्यमंत्र्यांची वर्षा निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ.आय एस चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, जपानी शिष्टमंडळातील प्रतिनिधी शिम ाडा मेगूमी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की भारत आणि जपान हे आशिया खंडातील महत्वाचे देश असून दोन्ही देशात खूप जुने आणि मजबूत संबंध आहेत. महाराष्ट्र हे भारतातील गुंतवणूकीसाठी उद्योगांच्या पहिल्या पसंतीचे राज्य आहे. जपानी कंपन्यांनी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली असून राज्याच्या आणि



मुंबईच्या पायाभूत सुविधा विकासात देखील मोठे सहकार्य दिले आहे. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेली मुंबई- अहम दाबाद बुलेट ट्रेन ही याची उदाहरणे आहेत. आमच्या सरकारच्या माध्यमातून एमटीएचएल अपेक्षीत वेळच्या आत पूर्ण करण्यात येऊन जनतेसाठी खुला करण्यात आला. तर बुलेट ट्रेनच्या कामाला सुद्धा मोठा वेग देण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी कोजी यांनी भारत आणि जपान यांचे संबंध अधिक मजबूत व्हावेत, ही आम ची भूमिका आहे. आज टोयोटा किर्लोस्कर कंपनीने राज्यात केलेला गुंतवणूकीचा करार हा महाराष्ट्रातील उद्योगस्नेही वातावरणाचे द्योतक आहे. एमटीएचएल आणि बुलेट ट्रेन सारख्या प्रकल्पाच्या माध्यमातून जपान महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात जपान सहभागी आहे,

# शांतता रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी व्हा

## अक्कलकोट येथे नियोजन बैठक

## प्रवासाबारेबरच विविध विषयांवर चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ जुलै-**

मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या सोलापूर येथील शांतता रॅलीसाठी अक्कलकोट तालुक्यातून मराठा बांधव प्रचंड संख्येने सहभागी होतील, असा निर्णय सकल मराठा समाज बैठकीत घेण्यात आला.

यावेळी जिल्हा मराठा सकल मराठा समन्वयक माऊली पवार, प्रा. गणेश ७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या या शांतता यात्रेम ध्ये अक्कलकोट तालुक्यातील मराठा समाजाने सहभागी व्हावे यासाठी सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.मनोज जरांगे हे स्वतःसाठी नव्हे तर समाजासाठी संघर्ष करीत आहेत. त्यांची प्रकृती ठीक नसतानादेखील समाज हितासाठी झटणारा एक प्रामाणिक नेता म्हणून मनोज जरांगे यांच्या या शांतता रॅलीमध्ये समाजाने सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा समन्वयक माऊली पवार यांनी केले. बाळासाहेब मोरे यांनी तालुक्यातील मराठा समाजाला शांती या रॅलीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन करत असतानाच तालुक्यातील भाजप आणि काँग्रेस नेतृत्वावर जोरदार हल्ला चढवला. मराठा समाज बांधवांनी आपसातील मतभेद आणि हेवेदावे सोडून आपल्या अस्तित्वाच्या लढाईसाठी एकत्र यावे, असे आवाहन फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब निंबाळकर यांनी केले. याप्रसंगी सरपंच नितीन मोरे, आण्णासाहेब सुरवसे, विश्वजीत बिराजदार, सहदेव पाटील, वर्षा चव्हाण, प्रा. गणेश देशमुख, गणेश पवार यांनी मनोगत व्यक्त केले. या बैठकीला सुरेश सूर्यवंशी, सुभाष गडसिंग, सुधाकर गोंडाळ, मराठा सेवा संघ शहराध्यक्ष योगेश पवार,विठ्ठलराव मोरे, तम्मा शेळके, मोहन चव्हाण, अरुण जाधव, शिवसेना शहर प्रमुख योगेश पवार, अतुल जाधव, मीरा बुद्रुक, माया जाधव, अक्षय मोरे, बापूजी निंबाळकर, बालाजी पाटील, राम जाधव, स्वामीराव सुरवसे, माणिक बिराजदार, यांच्यासह मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रकाश सुरवसे यांनी केले. यावेळी कृषी अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल सहदेव पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

### मराठा समाजासाठी स्वतंत्र कार्यालय

यावेळी तालुक्यातील मराठा समाज बांधवांच्या शासकीयस्तरावरील अडीअडचणी सोडविण्यासाठी मराठा कार्यालयाची निर्मिती करण्यात येणार असल्याची घोषणा अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी केली. याची संपूर्ण जबाबदारी मनोज निकम, राजाभाऊ नवले, शितल फुटाणे यांच्यावर राहणार आहे.

### वाहनांसाठी नाव नोंदणीचे आवाहन

वाहनांची सोय उपलब्ध होऊ शकत नाही त्यांच्यासाठी वाहनांची सोय केली जाणार आहे. मात्र त्यासाठी त्यांनी ४ ऑगस्टपर्यंत आपली नावे नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पंढरपूर वारीत हरवलेल्या कुत्र्याने २५० किमीचा प्रवास करत गाठलं घर

## सत्कार करत चक्क रॅली काढली; गावाला दिली मेजवानी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

बेळगामधील यमगर्णी गावात चक्क एका कुत्र्याची हार घालत रॅली काढण्यात आली. इतकंच नाही तर त्याच्या सन्मानार्थ संपूर्ण गावकऱ्यांसाठी म ेजवानी ठेवण्यात आली होती. यावेळी संपूर्ण गर्दी श्वानासाठी आनंद साजरा करत होती. तुम्हालाही हे वाचून आश्चर्य वाटलं असेल. या कुत्र्याने नेमकं असं काय काम केलं असा विचार तुम्हीही करत असाल. झालं असं की, हा श्वान हरवला होता. विशेष म्हणजे यानंतरही तो न चुकता आपल्या घरी पोहोचला आणि गावकरी आश्चर्यचकित झाले.

महाराज अशी गावकरी त्याला प्रेमाने हाक मारतात. पंढरपुरात भाविकांच्या गर्दीत तो हरवला होता. पण यानंतरही त्याने आपल्या मालकाचा माग काढला आणि तब्बल २५० किमी प्रवास करत गावात दाखल झाला होता. विशेष म्हणजे त्याला कोणीही मदत केली नव्हती. तो एकटाच प्रवास करत आपल्या घरी पोहोचला होता. त्याला पाहिल्यानंतर गावकऱ्यांचा विश्वासच बसच नव्हता. प्रत्येकजण हा चमत्कार आहे असंच म्हणत होता. जूनच्या शेवटच्या आठवड्यात महाराज आपला मालक कमलेश कुंभार यांच्यासह पंढरपूरच्या वारीत गेला होता. कमलेश कुंभार हे वारकरी असून, दरवर्षी आषाढी एकादशी आणि कार्तिकी एकादशीला पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी जातात. कमलेश कुंभार यांच्यासह महाराजही पंढरपुरात पोहोचला होता.



महाराजला नेहमी भजन ऐकायला आवडतात. एकदा तो माझ्यासह ज्योतिबा मंदिराच्या पदयात्रेत सहभागी झाला होता, अशी माहिती कमलेश कुंभार यांनी पीटीआयशी बोलताना दिली होती. महाराज तब्बल २५० किमीपर्यंत कमलेश कुंभार यांच्यासह चालत गेला होता. विठ्ठल मंदिरात दर्शन घेतल्यानंर कमलेश कुंभार बाहेर आले असता महाराज जागेवर नव्हता. त्यांनी त्याला शोधण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही लोकांनी त्यांना तो दुसऱ्या लोकांसह गेला असल्याचं सांगितलं. तरीही मी त्याचा शोध घेतला, पण सापडला नाही. त्यामुळे मला वाटलं लोक खरं सांगत आहेत. तो दुसऱ्या लोकांसोबत गेला असावा. मी १४ जुलैला घरी परतलो, असं कमलेश कुंभार यांनी सांगितलं. पण दुसऱ्या दिवशी कमलेश कुंभार यांना धक्काच बसला. याचं कारण महाराज घराच्या दरवाजात त्यांच्यासमोर उभा होता. जणू काहीच झालं नसल्यासारखा तो शेपूट हलवत होता. त्याचं पोट भरलेलं आणि व्यस्थित दिसत होता अशी माहिती त्यांनी दिली.

### जणू विठ्ठलच मार्ग दाखवला

कमलेश कुंभार यांनी आपला आनंद गावकऱ्यांसह साजरा करण्याचं ठरवलं. महाराजने स्वतः रस्ता शोधला हे आश्चर्यापेक्षा कमी नाही. जरी २५० किमीचं अंतर असलं तरी तो व्यवस्थित आला. आम्हाला वाटतं विठ्ठलानेच त्याला रस्ता दाखवला असावा, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
४० वा वर्धापन दिन
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, १ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक २७२ |
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विनम्र अभिवादन



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची आज पुण्यतिथी



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची आज जयंती

## तरुण भारत

### प्रिय वाचक

सोलापूर जिल्ह्यासह मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात लोकप्रिय असलेल्या आणि गेल्या ४० वर्षांपासून वाचकांच्या पहिल्या पसंतीस उतरलेल्या दैनिक सोलापूर तरुण भारतचा वर्धापन दिन साजरा होत आहे. या निमित्ताने येत्या गुरुवारी, ८ ऑगस्ट रोजी वर्धापन दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. १ ते ८ ऑगस्ट दरम्यान दररोज वर्धापन दिन विशेष पुरवणी प्रसिध्द होणार आहे. सोलापूर जिल्ह्याचा विकास, सोलापूरसह परिसरातील धार्मिक पर्यटन, कृषी, सांस्कृतिक, शिक्षण, क्रीडा व उद्योग अनुषंगाने वर्धापन दिन पुरवणीत वाचकांसाठी लेख प्रसिध्द केले जात आहेत. तरुण भारत वर्धापन दिन विशेष पुरवणीचा आस्वाद तर आमच्या वाचकांनी घ्यावाच. तसेच गुरुवारी, ८ ऑगस्ट रोजी होणाऱ्या वर्धापन दिन कार्यक्रमास वाचकांनी आवर्जुन उपस्थित रहावे, हे आवाहन.

**- प्रशांत माने,**
**निवासी संपादक**

# तर शरद पवारांनी पक्षच गुंडाळावा

## मराठा-ओबीसी आरक्षणावरून प्रकाश आंबेडकरांचा खोचक टोला



**वृत्तसंस्था, मुंबई, ३१ जुलै -**

शरद पवारांनी अगोदर आपल्या पक्षाची काय भूमिका आहे ते सांगावे? मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भूमिका घ्यावी असे पवार म्हणत असतील तर पवारांच्या पक्षाची गरज काय? तुमचा पक्षच गुंडाळून टाका, असा खोचक टोला प्रकाश आंबेडकर यांनी लगावला.

### रोहित पवारांनी आजोबांचा इतिहास पहावा

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी आम च्यासोबत यावं अशी आमदार रोहित पवार यांनी खुली ऑफर दिली होती. यावरून प्रकाश आंबेडकर यांनी रोहित पवारांवर निशाण साधला आहे. रोहित पवारांना त्यांच्या आजोबाचा इतिहास माहिती नाही पहिले त्यांनी त्यांच्या आजोबाचा इतिहास बघावा असा टोला आंबेडकर यांनी लगावलाय. तसेच खासदार सुप्रिया सुळे यांचे वक्तव्य बघावे मग त्यांनी अध्ययन करावे असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर सध्या आरक्षण बचाव यात्रेनिमित्त राज्यभरात दौरा करत आहेत. ओबीसी आरक्षणासाठी त्यांनी मैदानात उडी घेतलेली आहे. आरक्षणावरुन राज्यात ओबीसी आणि मराठा असा वाद देखील काही जिल्ह्यांमध्ये पाहायला मिळत आहे. यावेळी त्यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावनभूमीत आल्याचा अभिमान

### नूतन राज्यपाल राधाकृष्णन यांनी घेतली राज्यपालपदाची शपथ

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१ जुलै:**

छत्रपती शिवाजी महाराजांची पावन जन्मभूमी असलेल्या महाराष्ट्र भूमीत आल्याबद्दल आपल्याला अभिमान आहे. शिवाजी महाराज सर्वधर्म समभावाचे सच्चे पुरस्कर्ते होते. राज्यातील गोरगरिबांच्या उन्नतीसाठी तसेच समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय लोकांच्या उन्नतीसाठी आपण शासनाला सर्वतोपरी सहकार्य करू, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे नूतन राज्यपाल



सी.पी. राधाकृष्णन यांनी केले. राजभवनातील दरबार हॉल येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांना त्यांना शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील आदी उपस्थित होते.

## पूजा खेडकर यांची उमेदवारी रद्द

**नवी दिल्ली :** गेल्या महिना भरापासून चर्चेत असणाऱ्या पूजा खेडकर यांची उमेदवारी युपीएससीने अखेर रद्द केली आहे. आधी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयीाल गैरवर्तन व त्यानंतर कागदपत्रांमध्ये आढळलेली कथित अनियमितता या पार्श्वभूमीवर पूजा खेडकर यांची उमेदवारी यूपीएससीने रद्द केल्याचे वृत्त एएनआयने दिले आहे. विशेष म्हणजे यापुढे यूपीएससीकडून घेण्यात येणाऱ्या कोणत्याही परीक्षेत पूजा खेडकर यांना बसता येणार नाही, असंही यूपीएससीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. खेडकर यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर अद्याप पतियाला कोर्टाने निर्णय दिलेला नाही.

## आभासी जगातील प्रेमभंगातून युवतीची आत्महत्या

**सातारा :** 'समाजमाध्यमा' वरील आभासी जगातील बनावट नाव धारण केलेल्या मित्राचा मृत्यू झाल्याचे समजताच तो धक्का सहन न झाल्याने साताऱ्यातील कोरेगाव तालुक्यातील एका युवतीने आत्महत्या केली. विशेष म्हणजे यातील आभासी जगातील हा मित्र आत्महत्या केलेल्या तरुणीचीच मैत्रीण असून, ती बनावट नाव धारण करत तिच्याशी संवाद करत होती. संबंधित युवतीला पोलिसांनी अटक केली आहे. समाजमाध्यम ावर (इन्स्टाग्राम) घडलेल्या या प्रकाराबाबत माहिती अशी- दोन मैत्रिणींमधील एकीने तरुणाचे बनावट नाव धारण करीत आपल्या मैत्रिणीशीच 'समाजमाध्यमा'वरील मैत्री जोडली. या मैत्रीचे पुढे प्रेमात रूपांतर झाले. यातून आत्महत्या केलेल्या तरुणीने बनावट नाव धारण केलेल्या 'तरुणा'ला भेटण्याचा आग्रह सुरू केल्यावर बनावट नाव धारण केलेल्या युवतीची पंचाईत झाली. त्यातून मार्ग काढण्यासाठी मग तिने आणखी एक बनावट नावाने खाते तयार करून त्यावरून अगोदरच्या बनावट नाव धारण केलेला तरुणाचा मृत्यू झाल्याचे संबंधित युवतीला कळवले. याचा धक्का बसल्याने तिने गळफास घेऊन नुकतीच आत्महत्या केली.

Precision PRINTS
सोलापूर तरुण भारत
वृत्तवेध CHANNEL
वर्धापन दिन सोहळा ४० वा
सस्नेह निमंत्रण...

**सन्माननीय वाचक,**

सप्रेम नमस्कार,
गेली ४० वर्षे '**सोलापूर तरुण भारतने**' सोलापूर जिल्ह्यासह मराठवाडा,
प.महाराष्ट्र तसेच कर्नाटकात आपल्या राष्ट्रीय विचारांचा ठसा उमटविला आहे.
वाचक, हितचिंतक व जाहिरातदार यांच्यामुळेच हे साध्य झाले आहे.
'**वृत्तवेध चॅनल**' मराठवाडा, सोलापूर जिल्ह्यात अग्रेसर आहे.
तसेच नागपूर, मुंबई, पुणे, जळगाव येथे ही तरुण भारतच्या
माध्यमातून राष्ट्रीय विचार पोहचवित आहोत.
अत्याधुनिक तंत्रज्ञानासह '**प्रिसिजन प्रिंटस्ने**' कमर्शिअल
प्रिंटींग क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे.
दै. सोलापूर तरुण भारत, वृत्तवेध चॅनल, प्रिसिजन प्रिंटस् आदिंचा

॥ वर्धापन दिन ॥

कार्यक्रम आयोजित केला आहे.
आपण उपस्थित राहून ऋणानुबंध दृढ करावेत.

✻ आपले स्नेहांकित ✻
**सोलापूर तरुण भारत मिडिया लिमिटेड**


**श्री. दिलीप यशवंत पेठे** (मुख्य समूह संपादक) | **श्री. विवेक घळसासी** (अध्यक्ष) | **श्री. प्रशांत वसंतराव माने** (निवासी संपादक)

**संचालक मंडळ व तरुण भारत, वृत्तवेध चॅनल व प्रिसिजन प्रिंटस् परिवार**

✻ स्थळ ✻
दि. ८ ऑगस्ट २०२४, सायं. ६ ते ९ पर्यंत
दि सोलापूर इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट सोसायटी फंक्शन हॉल,
तरुण भारत प्रेसच्या मागे, होटगी रोड, सोलापूर.




१३ वे
॥ पुण्यस्मरण ॥



**श्रद्धेय सुभाष रावजी शहा**
(संस्थापक चेअरमन, प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेड)
जन्म : १४ नोव्हेंबर १९३६ | मृत्यू : ०१ ऑगस्ट २०११

**श्रद्धेय दादा,**
पवित्र तुमची स्मृती
चिरंतन तुमची माया
नित्य असूद्या आमच्यावरती
अखंड तुमची छाया

PRECISION
प्रिसिजन परिवार






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## क्राईम वृत्त

### कामगाराच्या मृत्यूप्रकरणी ठेकेदारावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

शुभराय आर्ट गॅलरी येथे सुरु असलेल्या बांधकामावर कामगाराच्या मृत्यूप्रकरणी ठेकेदाराविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शामा रमेश बडूरवाले (वय ५०, रा. बापूजी नगर, उत्तर सदर बझार, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन शितल धनेवाले (रा. बापूजी नगर, उत्तर सदर बझार, सोलापूर) या ठेकेदाराविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारत रमेश बडुरवाले (वय २२) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. महानगरपालिकेच्या पाठीमागे असलेल्या शुभराय आर्ट गॅलरी येथे ठेकेदार शितल धनेवाले याचे चालू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी २१ डिसेंबर २०२३ रोजी सायंकाळी शामा बडुरवाले यांचा मुलगा भारत हा त्याच्या कामाचे पैसे ठेकेदाराकडे मागण्यासाठी गेला होता. त्यावेळी भारत बडुरवाले हा त्या बांधकामाच्या पायाच्या ठिकाणी डोक्यावर पडून त्याच्या डोक्यास जबर मार लागून त्याचा मृत्यू झाला होता. ठेकेदार धनेवाले याने बांधकामाच्या पायाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची संरक्षक जाळी न बसविता तसेच इतर कोणतीही उपाय योजना न करता निष्काळजीपणाचे व हयगयीचे कृत्य केल्याने भारत बडुरवाले याचा मृत्यू झाला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक अहिवळे पुढील तपास करीत आहेत.

### विवाहितेचा छळ करणाऱ्या सहाजणांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह सहाजणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आफरीन रफिक शेख (वय २७, रा. डॉ अन्सारी चौक, सोलापूर) या विवहितेच्या फिर्यादीवरुन पती रफिक शेख, सासरे शमशोद्दीन चाँदसाब शेख, दीर फिरोज शमशोद्दीन शेख, जाऊ साईका शेख, नंदावा शिरजोद्दीन, नणंद शबनम (रा. गल्ली नं. ११, समता वेल्फेअर सोसायटी, इस्लामीक कंम्पाऊंट, गांधी नगर, हिंदुस्थान नाका, कांदीवली, मुंबई) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आफरीन शेख या मे २०२३ ते जून २०२४ या कालावधीत मुंबई येथे सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती रफिक व त्याच्या घरातील लोकांनी आफरीन हिस शिवीगाळ करून पतीचे दुसरे लग्न करून घे, हिला सोडून दे व हिची मस्ती जिरव असे म्हणून मानसिक व शारीरीक छळ केला. तसेच माहेरून घर डिपॉझिटकरीता १ लाख रुपये घेऊन ये म्हणून पैशांची मागणी करून आफरीनला माहेरी हाकलून दिले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार इनामदार पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीला कट लागल्याच्या कारणावरून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

दुचाकीला कट लागल्याच्या कारणावरून तरूणास मारहाण करणाऱ्या १० जणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत अभिषेक मोहनसिंग चौधरी (वय २२, रा. बापूजी नगर, काळभैरव मठाजवळ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन कृष्णा जमादार, गणेश जमादार, राजू जमादार, राम जमादार, दिनेश जमादार, शनि जमादार, अजय मन्सावाले, दिपक जमादार आणि त्याच्या ३ साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ जुलै रोजी दुपारी वनशितला देवी मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील नवनीत हॉस्पीटलसमोर अभिषेक चौधरी व त्यांचा मामे भाऊ विनायक मौलावाले हे दोघे मोटारसायकलवरून जात होते. त्यावेळी गाडीला कट लागलेल्या कारणावरून कृष्णा जमादार याने लोखंडी रॉडने तर गणेश जमादार याने कोयत्याने आणि इतरांनी हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक अहिवळे पुढील तपास करीत आहेत.

### बालसुधारगृहातील बालकावर लैंगिक अत्याचार

**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

शहरातील बालसुधारगृहातील बालकावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली असून याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बालसुधारगृहातील एका अल्पवयीन बालकावर ३० जुलै रोजी सकाळी बालगृहातील बाथरूम व झोपण्याच्या खोलीत बालगृहात आधीपासून दाखल असलेल्या एका १८ वर्षीय बालकानेच लैंगिक अत्याचार केला. तसेच इतर दोन बालकांनाही जबरदस्तीने त्या बालकावर अत्याचार करण्यास भाग पाडले. म्हणून याबाबत बालसुधारगृहाच्या अधिक्षकांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक व्हट्टे पुढील तपास करीत आहेत.

## निधन वार्ता

### प्रभाकरराव मुंडले



**सोलापूर, दि.३१ जुलै-**

रा.स्व. संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक आणि ज्येष्ठ उद्योजक, समाजसेवक भैयासाहेब उपाख्य प्रभाकरराव मुंडले यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक दातृत्त्व जपणारे, मनाने अत्यंत संवेदनशील असलेले एक पितृतुल्य व्यक्तिमत्त्व गमावले आहे. नागपुरातील शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेले काम अतुलनीय आहे. नागपुरातील अंध विद्यालय, बीआरए मुंडले, आरएस मुंडले अशा अनेक संस्थांची धुरा त्यांनी यशस्वीपणे सांभाळली. 'तरुण भारत'चे संचालन करणाऱ्या श्री नरकेसरी प्रकाशन संस्था, बिल्डर असोसिएशन ऑफ इंडियाचेही ते अध्यक्ष होते. समाजाच्या विविध क्षेत्रात त्यांनी अत्यंत मोठे योगदान दिले. अत्यंत मनमिळावू, लहानांपासून थोरापर्यंत प्रत्येकाचा सन्मान जपत होते.

### रामचंद्र कुलकर्णी



**सोलापूर, दि.३१ जुलै-**

येथील दूरसंचार खात्यातील सेवानिवृत्त रामचंद्र दत्तात्रय कुलकर्णी यांचे मंगळवारी ३०जुलै रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षाचे होते. सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे खेळाडू प्राणेश कुलकर्णी यांचे ते वडिल होते त्यांच्या मागे पत्नी ज्योत्स्ना कुलकर्णी, प्रसाद कुलकर्णी प्राणेश कुलकर्णी, प्रज्ञा हवालदार (कुलकर्णी) व कुटुंबीय असा परिवार आहे. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जोडभावी पेठेत दोन गटात हाणामारी; १४ जणांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

शहरातील जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात दोन गटात झालेल्या हाणामारीप्रकरणी १४ जणांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी तौफिक इब्राहीम कल्याणी (रा. २७८, जोडभावी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन उमर बागवान, हाजी दौलतबी, अमिर बागवान, अझरूद्दीन बागवान, अलिम बागवान, शरीफ बागवान, मुस्तफा महिबुबसाब बागवान (सर्व रा. जोडभावी पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर अलिमउद्दीन मेहबूबसाब बागवान (वय ३४, रा. गोलचावडी दवाखान्यासमोर, जोडभावी पेठ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन तौफिक कल्याणी, रिझवान कल्याणी, रईस कल्याणी, अय्युब कल्याणी, मालन कल्याणी, आयेशा कल्याणी, गौस कल्याणी (सर्व रा. जोडभावी पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तौफिक कल्याणी हे २९ जुलै रोजी सायंकाळी त्यांची नात जहिरा हिस घेऊन रस्त्यावर शतपावली करीत होते. त्यावेळी शेजारील गल्लीत राहणारे उमर बागवान याने त्याच्या मोटारसायकलवरून येऊन कट मारल्याने तौफिक हे उमर व त्याच्या आजीस समजावून सांगत होते. त्यावेळी उमरच्या आजीने तौफिक यांना शिवीगाळ केली व फोन करून अमिर बागवान व इतरांना बोलावून घेतले. या सर्वांनी मिळून तौफिक व त्यांचा भावाचा नातू मुफीक कल्याणी यास शिवीगाळ करीत मारहाण केली व ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बामणे पुढील तपास करीत आहेत.

तर अलिमउद्दीन कल्याणी याच्या फिर्यादीनुसार २९ जुलै रोजी सायंकाळी त्यांची आई दौलतबी बागवान या त्यांच्या मयत मामा कय्युम कामतीकर यांच्या घरी कामानिमित्त गेल्या होत्या. थोड्यावेळाने अलिमउद्दीन यांचा मुलगा उमर हा आईला बोलावण्याकरीता गेला होता. तो दादीलाहाक मारत असताना तौफिक कल्याणी हे विनाकारण शिवीगाळ करीत होते. तेवढ्यात अलिमउद्दीन यांची आई बाहेर आली व शिवीगाळ का करता असे म्हणाल्यानंतर रिझवान कल्याणी व इतरांनी आईचा हात पिरगाळून त्यांना ढकलून दिले. त्यामुळे त्यांच्या पायास मार लागल्याने व इतरांनी मारहाण केल्याने मुक्का मार लागल्याने जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बामणे पुढील तपास करीत आहेत.

# पोलिसांना बोलावण्याच्या कारणावरून तरूणास मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

पोलिसांना बोलावण्याच्या कारणावरून तरूणास मारहाण करून त्याच्या खिशातील ७०० रुपये जबरदस्तीने चोरून नेणाऱ्या चौघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत श्रीकांत तिमण्णा कोळी (वय ३८, रा. सिध्देश्वर नगर भाग २, मजरेवाडी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुनिल जाधव व त्याचे तीन साथीदार यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.२९ जुलै रोजी रात्री ११ च्या सुमारास कुमठा कॉर्नर येथे सुनिल जाधव व त्याच्या तीन साथीदारांनी श्रीकांत कोळी व भाऊ श्रीनिवास यांस तुम्ही पोलिसांना बोलविता का म्हणून शिवीगाळ करून लोखंडी सळई, काठीने, हातातील कड्याने, लाथाबुक्क्याने मारहाण केली. यावेळी श्रीकांतच्या खिशातील रोख ७०० रुपये जबरदस्तीने चोरून पायाच्या घोटावर, हाताच्या मनगटावर जबर मारहाण करून फ्रॅक्चर केले. तसेच श्रीकांत व श्रीनिवास यांना जिवंत सोडण्यासाठी त्यांच्या वहिणीकडून १५ हजार रुपये घेतले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक पोपळभट पुढील तपास करीत आहेत.

# हरविलेला अल्पवयीन मुलगा तीन महिन्यानंतर मुंबईतून ताब्यात

### फौजदार चावडी पोलिसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

हरविलेल्या अल्पवयीन मुलास फौजदार चावडी पोलिसांनी तीन महिन्यांनंतर मुंबईतून ताब्यात घेऊन त्यास त्याच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात केले.

मनोहर संदीपान चवरे (वय ५०, रा. बाणेगाव, ता. उत्तर सोलापूर) यांचा मुलगा सुयश चवरे हा २४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी घरात चहा पिऊन डॉ. बाबासाहेब समाज मंदीरात जाऊन येतो असे सांगून घरातून निघून गेला होता. तो परत न आल्यामुळे मनोहर चवरे यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. तो मुलगा एस टी स्टॅन्डजवळील ॲम्बेसेटर हॉटेल येथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसून आला होता. त्याच्याकडे मोबाईल नसल्याने त्याचे लोकेशन मिळत नव्हते. या गुन्ह्याचा तपास करताना मनोहर चवरे यांना एका अनोळखी नंबरवरून फोन आला होता. त्या नंबरची माहिती काढून पोलिसांनी मुंबईतील दादर पूर्व येथील नायगाव येथून सुयश यास ताब्यात घेतले. सुयश हा त्याच्या मित्राच्या रूमवर राहात असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले. सुशय यास पोलिसांनी सोलापूरात आणून त्याच्या पालकांच्या ताब्यात दिले. ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, सहायक आयुक्त अशोक तोरडमल, पोलिस निरीक्षक दिलीप शिंदे, विकास देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस उपनिरीक्षक एर एन जेऊघाले, हवालदार घुगे, गायकवाड, ढोबळे यांनी केली.

# देवरदासीमय्या सभा मंडप कामाचे भूमिपूजन

### हटगार कोष्टी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करणार : प्रा. डॉ. वाघमारे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

हटगार कोष्टी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी आणि पारंपारिक विणकर व्यवसाय असणारा समाजाचा सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बैठक घेऊन समाजाच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी तसेच समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी आपण प्रयत्नशील आहोत अशी ग्वाही शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी दिली.

एमआयडीसी परिसरातील आशा नगर येथील श्री आद्य जगद्गुरु देवरदासीमय्या हटगार कोष्टी समाज सामाजिक संस्थेच्या सभा मंडप कामाचा भूमिपूजन सोहळा मोठ्या उत्साही व भक्तीमय वातावरणात झाला.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विशेष निधीतून प्रा. डॉ. वाघमारे यांच्या विशेष प्रयत्नातून दहा लाख रुपये खर्चून सभा मंडप बांधण्यात येणार आहे.

या सोहळ्यावेळी बागलकोट निलनकेरी येथील सिद्धारूढ मठाचे मठाधिपती श्री ब.ब्र.श्री गनलिंग महास्वामीजी, मुदनुर आणि सस्तापुर मठाचे मठाधिपती डॉ. श्री ईश्वरानंद आप्पाजी, प.पु.ष.ब्र.श्री अभिनव रेवनसिद्ध पट्टदेवर गुरुहिरे मठ मैंदर्गी, मी.नि.प्र. मृत्युंजय महास्वामीजी, सिद्धाश्रम मैंदर्गी, युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रियदर्शन साठे, श्री सद्गुरु रेवणसिद्ध शिवशरण महास्वामीजी मठ नीलम नगरचे अध्यक्ष सिद्धाराम खजुरगी, श्री सिद्धारूढ मठ विनायक नगर अध्यक्ष महादेव जुळजुळे, श्री चौडेश्वरी मंदिर शुक्रवार पेठ अध्यक्ष काशिनाथ रूगे, चेअरमन सोलापूर जिल्हा लेबर फेडरेशन शंकर चौगुले, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य महिला हाटगार कोष्टी समाज अक्कलकोट सुनंदा अष्टगी, अध्यक्ष श्री सिद्धारूढ सेवाभावी संस्था गवळी वस्ती श्रीशैल होळीकट्टी, अध्यक्ष सेवा संघ परमेश्वर कौंचे, बसवराज उडचण आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आशीर्वचन करताना श्रो.ब्र.श्री. ईश्वरानंद आप्पाजी म्हणाले की मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हटगार गोष्टी समाजाचे आराध्य दैवत आध्य जगतगुरु देवदास माया यांच्या सभा मंडपासाठी निधी उपलब्ध करून दिला. आज समाजाचे स्वप्न साकार झाले केवळ ज्योती वाघमारे यांच्या मुळेच.

प्रारंभी आद्य जगद्रु देवरदासमय्या यांच्या मूर्तीचे पूजन आणि दीप प्रज्वलन उपस्थित महास्वामीजी आणि प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक दुधगी यांनी केले. आभार संतोष मड्डे यांनी मानले.

# अट्टल दुचाकीचोरास अटक; चोरीच्या ४ दुचाकी जप्त

### फौजदार चावडी पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

फौजदार चावडी पोलिसांनी अट्टल दुचाकी चोरास अटक करून त्याच्याकडून चोरीच्या ४ दुचाकी जप्त केल्या.

औदुंबर सुधाकर गुंड (वय २५, रा. डोणगाव, जिल्हा परिषद शाळेजवळ, ता. उत्तर सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्याच्याकडून फौजदार चावडी, जोडभावी पेठ, सदर बझार आणि औसा पोलिस ठाण्यातील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.



फौजदार चावडी पोलिसांनी मिळालेल्या माहितीवरून सापळा लावून रेकॉर्डवरील दुचाकीचोर औदुंबर गुंड यास लक्ष्मी विष्णु चाळीच्या कंम्पौडच्या भिंतीलगत दुचाकीसह ताब्यात घेतले. त्यावेळी त्याच्याकडे मिळून आलेली दुचाकीबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याचे दिसून आले. ३० मे रोजी अपूर्वा इंगळे यांनी त्यांची एम एच १३ सीई २९८४ क्रमाकाची दुचाकी ही जुनी मिल कंम्पौडमधील राज मेमोरियल इंग्लिश मिडीयम स्कुलसमोर लावली असता ती चोरट्याने चोरून नेली होती. ही दुचाकी गुंड याच्याकडे मिळून आली. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने आणखी दुचाकी चोरल्याचे कबूल केले. त्याच्याकडून पोलिसांनी चोरीच्या १ लाख ५० हजार रुपये किंमतीच्या चार दुचाकी जप्त केल्या आहेत.

ही कामगिरी पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, सहायक आयुक्त अशोक तोरडमल, पोलिस निरीक्षक दिलीप शिंदे, विकास देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शंकर धायगुडे, यांच्या स्टाफने केली आहे.

# पत्नीला मारहाण करणाऱ्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

सोलापूर - चारित्र्याचा संशय घेऊन पत्नीला मारहाण करणाऱ्या पतीविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहेश्वरी श्रीनिवास दोड्डी (रा. वारद चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन श्रीनिवास नरसय्या दोड्डी (रा. राम नगर, सिकंदराबाद, तेलंगणा) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मार्च २०२० ते मे २०२४ या कालावधीत माहेश्वर या सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी श्रीनिवास याने दारू पिऊन माहेश्वरी यांच्या चारित्र्याचा संशय घेऊन तुझ्या आई वडीलांनी काही एक हुंडा दिला नाही, मुला रेडिमेड



कपड्याचा व्यापार करायचा आहे, माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये, नाहीतर तुला नांदविणार नाही असे म्हणून शिवीगाळ करून बेल्टने मारहाण करून खेळण्यातील स्टंम्पने मारहाण केली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मुजावर पुढील तपास करीत आहेत.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

कृपया , B आणि D, E, F श्रेणी स्थानकांवर केटरिंग स्टॉल्स (चहा स्टॉल्स), MPS, WVM च्या संचालनासाठी कराराच्या वाटपासाठी ई-लिलावासाठी दिनांक 29.07.2024 च्या निविदा सूचनेसोबत संलग्न करा. सोलापूर विभागावर पाच वर्षांच्या कालावधीसाठी. **Sr.01 लिलाव कॅटलॉग क्रमांक:**CTG-SUR-M- GMU. MO.DUD, KEM आणि RG-SMU. **स्थानकांचे नाव:** स्थानकांवर चहाचे स्टॉल चालवण्यासाठी 60 चौरस फूट क्षेत्र दिले जाईल. 1.मधा. 2. मोहोळ. 3. दुधनी. 4 केम. 5. आरग. **पद्धत:** ireps-e लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल) निविदा कालावधी: 5 वर्षे 4थ्या आणि 5व्या वर्षांसाठी 10% वाढीसह. डी.02. **लिलाव कॅटलॉग क्रमांक:** MPS-SUR-BTW-06-24-1 **स्थानकांची नावे:** BTW स्टेशनवर MPS स्टॉलचे संचालन. **पद्धत:** ireps-e लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल) **निविदा कालावधी:** 5 वर्षे 4थ्या आणि 5व्या वर्षांसाठी 10% वाढीसह. डी.03 **लिलाव कॅटलॉग क्रमांक:** MSS-SUR-KWV- 12-23-1, MSS-SUR-KLBG-10-23-1, MSS-सुर-वाडी-9-23-1. **स्टेशनचे नाव:** वॉटर वेंडिंग मशिन्स- क्लस्टर आधारावर कुर्डुवाडी क्लस्टर-5-, KLBG 6 ठिकाणी, वाडी-5 ठिकाणी. **पद्धत:** ireps-e लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल) निविदा कालावधी: 5 वर्षे 4थ्या आणि 5व्या वर्षांसाठी 10% वाढीसह. **वेबसाईटचा पत्ता;-** सर्व ई-लिलाव मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टल **www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहेत.

**सीनियर डीसीएम, सोलापूर**

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

SLP-27

## अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

**सन २०२४-२५ करिता वार्षिक निविदा २**

जा.क्र.२०२४/न.प.अ.कोट/संकलन/कावि ३६५ दिनांक : -३१/०७/२०२४

| अं. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | नगरपरिषद कार्यालयास स्टेशनरी साहित्य पुरवठा करणे | ३,००,०००/- | ५,०००/- | ५००/- |

१. कोरे निविदा फॉर्म संबंधित विभागात रोखीने फी भरून दि. ०२/०८/२०२४ ते दि१२/०८/२०२४ रोजी नगरपरिषद कार्यालयात मिळतील.
२. बयाणा रक्कम दि. १२/०८/२०२४ रोजीपर्यंत लेखा विभागात रोखीने भरून त्याची पावती निविदा सोबत जोडणे आवश्यक आहे.
३. मोहोरबंद निविदा दि. १२/०८/२०२४ रोजी दुपारी ४.०० पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारल्या जातील. मोहोरबंद निविदा दोन लिफाफा पद्धतीने दाखल करणे आवश्यक आहे. एका लिफाफ्यात तांत्रिक कागदपत्रे व दुसऱ्या लिफाफ्यात भरलेले निविदा फॉर्म देणेचे आहे.
४. निविदेतील दर हे वाहतूक, GST, शासनाचे सर्व कर, रॉयल्टी, भराई उतराई, पोहोच करणे ई. सर्व बाबीसह देणेचे आहे.
५. साहित्य पुरवठादाराकडे संबंधित पुरवठ्याबाबत अधिकृत डिलर, सब डिलर, स्टॉकिस्ट असल्याबाबत आवश्यक कागदपत्रे व दुकाने निरीक्षक यांचेकडील नोंदणीचा दाखला ई. निविदेसोबत सादर करावे.
६. मुदतींनंतर येणाऱ्या, खाडाखोड असणाऱ्या, बयाणा रक्कमेशिवाय येणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
७. निविदा दर मंजूर झाल्यावर नगरपरिषदेकडे आवश्यक करारपत्र करून द्यावे लागेल. तसेच सुरक्षित रक्कम ठेवावी लागेल.
८. कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारणे अगर सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार नगरपरिषद राखून ठेवत आहे.
९. टेंडर संबंधीच्या अटी व शर्ती टेंडर फॉर्मसोबत देण्यात येतील.
१०.ईतर माहिती संबंधित विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
स्थायी निदेश क्र. ०४/२०२३ नुसार कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हितसंबंध/हिस्सा नसल्याबाबतचे प्रतिज्ञा पत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.

**सही/-**
**(रमाकांत डाके)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**नगरपरिषद अक्कलकोट**

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३००३**

**ई-निविदा सूचना क्रमांक ०४ सन २०२४-२५ (ऑनलाईन)**

**(दुबार निविदा सुचना)**

**संदर्भ :- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय**
**क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२/मंत्रालय मुंबई-०३२ दि. २१/०२/२०२४**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर** निविदा योग्य पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत व सा.बां. विभागाकडून नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदार यांचेकडून खालील कामाकरिता **'बी-१'** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर - ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. ०१/०८/२०२४ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते ०८/०८/२०२४ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | ----------- NIL ----------- |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक | दि. ०८/०८/२०२४ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| मुळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा शर्त ८.१) | ई-निविदा पोर्टलवर 'बीड लॉक' झाल्यानंतर ७२ तासात हार्ड कॉपी १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. **१. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर** |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ | दि. १२/०८/२०२४ मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता |

निविदा सूचनाबाबतची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
१) www.mahapwd.gov.in २) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर- ४१३००३ कार्यालयात सूचना फलक

**सही/-**
**(मनोज रा. ठाकरे)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जुन्या फौजदार चावडी रोडवर वाहनांची बजबजपुरी

## हॉस्पिटलसमोर चारचाकी वाहने लावल्याने वाहतूक कोंडीत होतीय वाढ

### वाहतूक शाखेने लक्ष देण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

स्मार्ट सोलापुरातील वाहनधारकांना वारंवार वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. सोलापूर शहरातील वाहतुकीचे नियम सर्रासपणे पायदळी तुडवून रस्त्याच्या मधोमध वाहने उभी केल्याने वाहतूक कोंडीला मोठ्या प्रमाणात चालना मिळत आहे. जुन्या फौजदार चावडी रोडवर वाहनांची बजबजपुरी वाढत चाललेली आहे.

शहरातील अरुंद असणाऱ्या सोन्या मारुती चौक युनिक हॉस्पिटल रोडवर नेहमीच असे चित्र दिसून येते. हॉस्पिटलसाठी येणारी वाहने , विविध साहित्य घेऊन येणारी मालवाहतूक वाहने, पाण्याचे जार वाहून नेणारे वाहन , मेडिकलच्या औषधी घेऊन येणारी व्हॅन, अशी विविध वाहने रस्त्याच्या



मधोमध लावून वाहनचालक जातात. त्यामुळे या रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनधारकांना नेहमीच या समस्येचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान बुधवारी दुपारच्या सुमारास वाहतूक कोंडीचे हे चित्र या ठिकाणी दिसून आले. वाहतूक नियमांचे उल्लंघन करून चारचाकी आणि तीनचाकी वाहनधारकांनी वाहने रस्त्याच्या कडेला लावून कोंडीला चालना दिली. यामुळे दोन्ही बाजूंनी येणाऱ्या वाहनांचा खोळंबा झाला होता.वाहनधारकांनी हॉर्नचा आवाज करून देखील संबंधित वाहनधारकांनी आपले वाहन काढण्याची तसदी देखील घेतली नाही. त्यामुळे वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी आहेत की मोडण्यासाठी आहेत, हेच सोलापूर स्मार्ट सिटीतील वाहनधारकांना कळेनासे झाले आहे. स्मार्ट सोलापुरातील सोन्या मारुती चौक येथील युनिक हॉस्पिटलच्या गजबजलेल्या या रस्त्यांवर नेहमी वाहतूक कोंडी आणि इतरत्र लावलेली वाहने हे दृश्य पहावयास मिळते. या ठिकाणी वाहतूक शाखेने कारवाई करावी अशी मागणी आता स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

### नियम मोडणाऱ्यावर कारवाई व्हावी

सोलापूर शहरात विविध ठिकाणी वाहनांवर कारवाई केली जात आहे. मात्र ज्या ठिकाणी विरुद्ध दिशेने येणारी वाहन, आणि वाहतूक कोंडी करणाऱ्या वाहनांवर कारवाई होत नाही अशा नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई व्हावी जेणेकरून सर्वांना वाहतुकीचे नियम पाळावे लागतील आणि त्यामुळे वाहनधारकांना वाहतुकीची शिस्त लागेल.

**- स्थानिक नागरिक**

# महसूल सप्ताहानिमित्त जिल्ह्यात आजपासून विविध कार्यक्रम

### आरडीसी मनिषा कुंभार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

१ ऑगस्ट या महसूल दिनापासून ७ ऑगस्टपर्यंत जिल्ह्यात महसूल सप्ताह राबविण्यात येणार आहे. या सप्ताहामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली आहे.

महसूल सप्ताहामध्ये दि. ३० जुलै व १ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ ते ६ या वेळेत मेडीटेशन यावर मेडिटेशन सेंटरचे रामचंद्र मिशन हे मार्गदर्शन करणार आहेत. दि १ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे सकाळी ९ ते दुपारी १ पर्यंत वैद्यकीय तपासणी कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे दुपारी ४.३० वाजता व्यसनाधीनतेपासून मुक्ती या विषयावर डॉ.थडसरे यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी श्री शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर येथे दुपारी ४ ते सायंकाळी ५.०० यावेळेत उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी सत्कार व प्रशस्तीपत्र वाटप व सायंकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत, महसूल अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी मनोरंजनपर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचेही उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी सांगितले आहे.




# जि.प. कर्मचारी आज काळ्या फिती लावून काम करणार

**सोलापूर, दि.३१ जुलै-**

महाराष्ट्र शासनाने जुनी पेन्शनसाठी दिलेल्या आश्वासनाकडे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ सोलापूर सर्व संलग्न प्रवर्ग संघटनेचे पदाधिकारी व सदस्य गुरुवारी १ ऑगस्ट रोजी काळ्या फिती लावून काम करतील. तसे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांच्यामार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वित्तमंत्री, ग्रामविकास मंत्री यांना देण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी उद्या काळ्या फिती लावून कामकाज करावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे विभागीय सहसचिव दिनेश बनसोडे यांनी केले आहे.

# बनावट परराज्यातील दारुसह तीन वाहने जप्त

### दोन आरोपींना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पंढरपूर पथकाने मंगळवारी पंढरपूर व माढा तालुक्यात नोंदवलेल्या गुन्ह्यात दोन मोटरसायकल व एका कारमधून बनावट व परराज्यातील दारू जप्त करून दोन आरोपींना अटक केली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून जिल्हाभरात अवैध दारू व परराज्यातील दारूविरुद्ध मोहीम राबविण्यात येत आहे. भोसे (ता. पंढरपूर) गावाच्या हद्दीत जानुबाई मंदिराच्या पाठीमागे येथे सापळा रचून अभिजीत श्रीमंत बनसोडे (वय २६) याला अवैध बनावट विदेशी



दारूची वाहतूक करीत असताना पकडून अटक करण्यात आली. त्यांच्याकडून एका एमएच-१३ एआर १६९३ या पल्सर दुचाकीसह विदेशी दारूच्या ७२ बाटल्या जप्त करण्यात आल्या.

या गुन्ह्याचा तपास करताना बनावट मद्य पुरवठा करणाऱ्या इसमाचे नाव नष्पिन्न झाल्याने उंबरे पागे गावाच्या हद्दीत उंबरे ते बेंबळे रोडवर सापळा रचून सदानंद दत्तात्रय यादव (माळी) (वय ३२) याला दुचाकीवरून विदेशी दारूची वाहतूक करीत असताना पकडून त्याचेकडून एमएच-४५-एम-०४६२ या दुचाकीसह ६० बाटल्या जप्त करण्यात आल्या. त्याच्या घोट (ता.माढा) येथील राहते घर व घरासमोर उभ्या असलेल्या वाहनाची झडती घेतली असता, घरासमोर उभ्या असलेल्या एमएच-१४-डीएन-८१०३ या चारचाकी वाहनामध्ये परराज्यातील विदेशी मद्याच्या १२ बाटल्या मिळून आल्या. या गुन्हयात दोन दुचाकी व एक चारचाकी वाहन असा एकूण ७ लाख ९१ हजार २०० रुपयांचा मुद्देमला जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, संचालक (अंमलबजावणी व दक्षता) प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त पुणे सागर धोमकर, अधीक्षक नितीन धार्मिक व उप अधीक्षक संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर निरीक्षक पंकज कुंभार, दुय्यम निरीक्षक पंढरपूर श्रध्दा गडदे, दुय्यम निरीक्षक करमाळा दत्तात्रय पाटील, सहायक दुय्यम निरीक्षक जीवन मुंढे, जवान विजयकुमार शेळके, प्रकाश सावंत, विकास वडमिले व रामचंद्र मदने यांनी केली.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांची रेल्वे सुसाट

## पहिलेच अधिवेशन; लोणंद रेल्वे मार्ग, कुर्डूवाडी रेल्वे वर्कशॉपसह अनेक रेल्वेसंबंधित प्रश्नांवर उठवला आवाज

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३१ जुलै-**

देशाच्या संसदेत माढा मतदारसंघातील रेल्वे प्रश्नांबरोबरच राजमाता आहिल्यादेवी होळकर जन्मभू चौंडी ते कर्मभूमी इंदौर रेल्वेमार्गाची देशाचे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे मागणी केली.

पहिल्ङ्गाच अधिवेशनात खा. धैर्यशील मोहिते-पाटील ङ्गांनी संसदेतील सभागृहात अनेक प्रश्न ङ्कंडले. सद्यस्थितीत लोणंद ते फलटण एवढाच मार्ग पूर्ण झाला. पण त्यानंतरचा फलटण ते पंढरपूर हा जवळपास १०५ किलोमीटर लांबीचा रेल्वेमार्ग अद्यापही पूर्ण झालेला नाही. या प्रकल्पात राज्य सरकार देखील ५० टक्के वाटा देणार आहे. केंद्र सरकारने लवकरच उर्वरित निधीची तरतूद करुन रखडलेल्या रेल्वे मार्गाला लवकरात लवकर गती द्यावी. तसेच सध्या लोणंद-फलटण या २६ कि.मी. मार्गावर रेल्वे सुरू झाली आहे. पण सिग्नलिंग, मनुष्यबळ नसल्यामुळे रेल्वेला ८० मिनिटे लागतात. या मार्गावर रेल्वेगाडीचा वेग वाढवण्यासाठी सिग्नलिंग व्हावे. मनुष्यबळ मिळावे. तसेच फलटण-पुणे-मुंबई रेल्वे गाडी सुरू व्हावी. लोणंद-फलटण-बारामती या मार्गाचे लोणंद-फलटण काम झाले आहे. परंतु फलटण-बारामतीसाठी भूसंपादन झाले आहे. टेंडर प्रक्रिया ही झालेली आहे. हे काम ही लवकर पूर्ण करण्याबाबत प्रशासनाला सुचना करणे गरजेचे आहे. त्यामुळे फलटणमार्गे आणखी काही रेल्वे गाड्या सुरू करण्याची देखील मागणी केली.

कुर्डूवाडी येथे रेल्वे वर्कशॉपची स्थापना १९३० साली झाली. आज हे वर्कशॉप शंभरीकडे वाटचाल करत आहे. पूर्वी या ठिकाणी नॅरोगेज स्टीम लोकोमोटिव्हज व नॅरोगेज कोचेसचे काम चालायचे. पूर्वी या ठिकाणी १००० हजाराच्या



आसपास कामगार काम करायचे. या वर्कशॉपमुळे कुर्डुवाडी व आजूबाजूच्या गावांची अर्थव्यवस्था चालायची. कालांतराने स्टीम इंजिन कालबाह्य झाले. सगळीकडे ब्रॉडगेजचे जाळे वाढले. त्यामुळे नॅरोगेजचे अस्तित्व संपत आले.

२०१० साली आ. रणजितसिंह मोहिते-पाटील राज्यसभेचे खासदार असताना त्यांच्या प्रयत्नातून इथल्या वर्कशॉपसाठी ३० कोटींची तरतूद झाली आणि या ठिकाणी ब्राडगेज वैगनच्याPOHच काम सुरु झाले. त्यानंतर २०१७ साली विजयसिंहदादा मोहिते-पाटील माढा लोकसभेचे खासदार असताना त्यांच्या प्रयत्नातून तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी या ठिकाणी ६० कोटी रुपयांची तरतूद केली व या वर्कशापसाठी नवीन शेडची निर्मिती झाली. एकेकाळी १००० कामगार असणाऱ्या वर्कशॉपमध्ये आज जवळपास ३०० कामगार राहिले आहेत. हे वर्कशॉप जर टिकवायचे असेल तर कुर्डूवाडी वर्कशॉपला कायमचे काम मिळाले पाहिजे, त्यासाठी येथे प्रवासी वाहतूक डब्यांच्या झजक्वे काम मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात कामगार भरती होईल व कुर्डुवाडी शहर व आजू बाजूच्या भागात अनेक छोटे मोठ्या उद्योग वाढीस चालना मिळेल हे या भागाच्या विकासाला पोषक ठरेल.

### आहिल्यादेवी जन्मभूमी ते कर्मभूमी रेल्वेमार्गाची मागणी

जेऊर-चौंडी-आष्टी या मार्गाला सन २०१७ च्या अर्थसंकल्पात १ हजार ५६० कोटी रु तरतूद करण्यात आली होती. त्या कामाला गती देऊन हा रेल्वेमार्ग परळी-अहमदनगर रेल्वे मार्गास जोडून चौंडी ते इंदौर रेल्वेद्वारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जन्मभूमी ते कर्मभूमी जोडण्याबाबत सरकारकडे मागणी केली. यामुळे पंढरपूर-चौंडी-शिर्डी-इंदौर असा नवा मार्ग तयार होऊ शकतो. यामुळे मध्य प्रदेशमधल्या अनेक भाविकांना पंढरपूर, चौंडी येथे दर्शनला येतील व महाराष्ट्रातील भाविकांना इंदोरला जाणे सोयीचे होईल यासाठी निधीची तरतूद झाली पाहिजे, अशी मागणी खा. मोहिते-पाटील यांनी केली.

---

## संक्षिप्त वृत्त



### वीरशैव पंचपीठ महाराष्ट्र राज्य वार्ताधिकारीपदी राजशेखर बुरकुले

**सोलापूर, दि.३१ जुलै-**

वीरशैव धर्मातील पाच पीठापैकी श्रीकाशी, श्रीउज्जैन, श्रीश्रीशैल व श्रीरंभापुरी जगद्गुरूंच्या आदेशानुसार पंचपीठाच्या महाराष्ट्र राज्य वार्ताधिकारीपदाचे नियुक्तीपत्र राजशेखर बुरकुले यांना देण्यात आल्याची आल्याची माहिती पंचपीठाचे कर्नाटक राज्य वार्ताधिकारी सिद्रामप्पा अलगुडकर यांनी दिली. कलबुर्गी येथील कडगंची मठातील सांस्कृतिक सभागृहात झालेल्या कार्यक्रमात श्रीकाशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते राजशेखर बुरकुले यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी विरभद्र शिवाचार्य (कडगंची) अभिनव राचोटेश्वर शिवाचार्य (सोमवारपेटे), श्री पंपापती देवरू (सुलेपेठ), ज्ञानसिद्ध ओंकार शिवाचार्य (कडबगाव), पंचपीठाचे कर्नाटक राज्य वार्ताधिकारी सिद्रामप्पा अलगुडकर, महादेव अलगुडकर, जागतिक लिंगायत महासभा सोलापूर जिल्हा अध्यक्ष शिवानंद गोगाव, वीरशैव व्हिजनचे कोषाध्यक्ष आनंद दुलंगे, युवक आघाडीचे सोमनाथ चौधरी उपस्थित होते. यावेळी बोलताना श्रीकाशी जगद्गुरु म्हणाले की राजशेखर बुरकुले यांनी काशीपीठाची आजपर्यंत मनोभावे सेवा केली आहे. त्यांचे सेवा कार्य पाहून आम्ही सर्व जगद्गुरूंशी चर्चा करून यापुढील काळात त्यांनी पाचही पीठांची सेवा करावी. या उद्देशाने आम्ही त्यांची निवड आज केलेली आहे. ती जबाबदारी ते समर्थपणे पार पाडतील असा आम्हाला विश्वास आहे आणि आमचे त्यांना मंगल आशीर्वाद आहेत. राजशेखर बुरकुले यांना मिळालेले हे पद सोलापूरच्या इतिहासात पहिल्यांदाच मिळाले आहे. वीरशैव व्हिजनच्या माध्यमातून राजशेखर बुरकुले यांनी सामाजिक शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक, कला व क्रीडा क्षेत्रात भरीव असे योगदान दिले आहे. तसेच ते आतापर्यंत श्रीकाशीपीठाच्या प्रसिद्धी विभागाची जबाबदारी सांभाळत होते. यावेळी बोलताना राजशेखर बुरकुले म्हणाले की मी आजपर्यंत समाजाची, धर्माची सेवा करत आलो आहे. यापुढील काळात पंचपीठांची प्रसिद्धी विभागाची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. ती सेवा प्रामाणिकपणे बजावणार आहे.



### आयडीयल उर्दू शाळेत वृक्षारोपण

**सोलापूर, दि.३१ जुलै-**

आयडीयल उर्दू माध्यमिक शाळेत शिक्षण सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षण सप्ताहानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक इरफान जनवाडकर, रिजवान मंगलगीरे, अ.रहीम पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी इम्रान काझी, अब्दुल दकनी, मसरुर शेख, अ.रफिक माडीघर, रिजवान करजगी, मुजम्मिल चौधरी उपस्थित होते.

### लाडकी बहीण योजना शासकीय समितीच्या सदस्यपदी सतीश सपकाळ

**नातेपुते, दि. ३१ जुलै-**



महाराष्ट्र सरकारने लागू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना या योजनेचा सर्वांना लाभ मिळावा यासाठी शासकीय कमिटी स्थापन केली आहे. या कमिटीच्या माळशिरस तालुका सदस्यपदी शिवसेना तालुकाप्रमुख सतीश सपकाळ यांची सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या शिफारशीनुसार नियुक्ती झाली आहे. महायुतीच्या सरकारने लागू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण या योजनेचा सर्व समाजातील गोरगरीब महिलांना लाभ व्हावा, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे तालुका सदस्य सतीश सपकाळ यांनी सांगितले.

---

## हक्काच्या रेशनवर डल्ला मारणाऱ्यांविरोधात वंचित बहुजन आघाडी आक्रमक

### प्रांताधिकाऱ्यांचे पुरवठा विभागाला तात्काळ पंचनामा आणि चौकशीचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ३१ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील रेशन दुकानदारांकडून शघधउ च्या नावाखाली रेशन धारकांना माल वितरीत केल्याचे फिंगरप्रिंट घेऊन रेशनधारकांना काहीही माल न पुरवत रेशनधारकांची फसवणूक केल्याचा प्रकार वंचित बहुजन आघाडीच्या नुकताच निदर्शनास आलेला आहे. यासंबंधी अकलूजमधील अनेक ग्राहकांनी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना संपर्क साधत रेशनचा माल मिळाला नसल्याची कैफियत मांडली होती. याविषयी चौकशी करण्यासाठी ऑनलाइनला पाहिले असता मालाचे वितरण केल्याचा डेटा फीड केल्याचे दिसत असून प्रत्यक्षात मात्र ग्राहकांना मालच मिळाला नसल्याची भयानक परिस्थिती आहे.

रेशन वाटपात पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने निशुल्क ई. केवायसी प्रक्रियेचा अवलंब केला आहे. परंतु माळशिरस तालुक्यात ई-केवायसीच्या नावाखाली रेशनधारकांचे



फसवणुकीने फिंगरप्रिंट घेत त्यांच्या जुलै महिन्याच्या मालाचे अजूनही वाटप न करता रेशनचा काळाबाजार करण्याचा प्रकार समोर येत आहे. शासन निर्णयाप्रमाणे ग्राहकांचे फिंगरप्रिंट घेतल्याक्षणी त्यांना मालाचे वितरण होणे बंधनकारक असताना त्यांना ई-केवाङ्गसीचे नाव पुढे करीत त्यांची फसवणूक केलेली आहे. सर्वसामान्य ग्राहकांनी विचारणा केल्यास अजून माल आला नाही, असे फसवणूक करणारे उत्तर त्यांना दिले जात आहे. हा निव्वळ रेशनचा काळाबाजार करण्याचा गंभीर प्रकार असून शासनाच्या उद्देशाला केराची टोपली दाखवत रेशनधारकांच्या हक्काच्या मालावर डल्ला मारण्याचा प्रकार असल्याने वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी प्रांताधिकारी यांचेकडे मोर्चाच्या निवेदनाद्वारे ग्राहकांना जुलै महिन्याचा हक्काचा माल तात्काळ वितरीत करण्यात यावा आणि यातील संबंधितांवर कारवाई व्हावी अशा मागण्या केल्या.

### अकलूजमध्ये उद्या मोर्चा

ई-केवायसी प्रक्रिया निशुल्क असतानाही यासाठी माळशिरस तालुक्यात १००, २००, ३०० रुपयांची मागणी केली जात असल्याच्या घटना समोर आलेल्या असून अशा दुकानदारांवरही कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी या २ ऑगस्ट रोजी अकलूजमध्ये निघणाऱ्या रेशनधारकांच्या मोर्चाचे निवेदन देताना केलेली आहे.

---

## विनयभंगानंतर कीटकनाशक पाजून मुलीचा खून

**इंदापूर, दि. ३१ जुलै-**

विनयभंगानंतर कीटकनाशक पाजण्यात आलेल्या अल्पवयीन मुलीचा अकलूज येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरु असताना बुधवारी सकाळी मृत्यू झाला. आरोपीवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रणजीत दाजी जाधव (वय २७, रा. सराटी, ता. इंदापूर) असे या प्रकरणातील आरोपीचे नाव आहे. २८ तारखेला विनयभंगाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्याला इंदापूर पोलिसांनी अटक केली आहे. त्याला १ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. वकीलवस्ती (ता. इंदापूर) येथील चौदा वर्षांची मुलगी सराटी येथील विद्यालयात नववीच्या वर्गात शिक्षण घेत होती. रविवारी तिच्यावर बळजबरी करण्याचा व तिला कीटकनाशक पाजण्याचा प्रकार घडला. या घटनेनंतर तिला अकलूज येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे तिने त्याच दिवशी इंदापूर पोलिसांना दिलेल्या जबाबात रविवारी दुपारी ती एकटीच घरी असताना दीड वाजण्याच्या सुमारास ती शिकत असलेल्या विद्यालयात लिपिक असणारा आरोपी रणजीत जाधव घरी आला. तिला तिच्या घरात ढकलून तो तिचा विनयभंग करत शरीरसुखासाठी बळजबरी करु लागला. ती प्रतिकार करु लागल्याने त्याने मी म्हणतो तसे केले नाहीस तर कीटकनाशक पाजून तुला ठार मारेन अशी धमकी दिली. तिने प्रतिकार सुरुच ठेवल्याने त्याने खिडकीमध्ये ठेवलेली शेतीसाठी वापरण्यात येणारे कीटकनाशक त्या मुलीला पाजले. ती आरडाओरडा करत असताना तिच्या आजोबांनी बाहेरुन दरवाजा वाजवला. त्यानंतर आरोपी जाधव याने दरवाजा उघडला. तिच्या आजोबाना ढकलून तो तेथून पळून गेला, असे म्हटले आहे.

---

## जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेत व्हॅलेंटाईन स्कूलचा नयन रंगरेज प्रथम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर शहर आणि सोलापूर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने व जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने आयोजित जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेत व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलच्या नयन रंगरेज याने १० वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक पटकाविला.

नयन याने प्रायमरी चेस क्लासमध्ये पहिली व तिसरी फेरी पार करुन पाचव्या फेरीपर्यंत पोहचला आहे. स्मृतिचिन्ह, सुवर्ण पदक व प्रमाणपत्र देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. नयनला क्रीडा शिक्षक शिवाजी आवताडे, संतोष पाटील, लावण्या दुस्सा यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्यक्ष यमूना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व उपसचिव नागेश शेंडगे व इतर सर्व संचालक, मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

---




## जिल्हा थ्रोबॉल स्पर्धेत एस.आर.चंडकला तिहेरी मुकुट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

जिल्हा थ्रोबॉल स्पर्धेत एस. आर. चंडक स्कूलने सबज्युनियर मुले, मुली आणि ज्युनियर मुलांच्या गटात विजेतेपद पटकावित तिहेरी मुकुट संपादिला. ज्युनियर मुलींच्या गटात व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलने बाजी मारली.

थ्रोबॉल असोसिएशन सोलापूर व छत्रपती शिवाजी प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या स्पर्धेचे बक्षीस वितरण छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज चे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष गवळी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी थ्रोबॉलचे जिल्हा सचिव मारुती घोडके, संचालक राजाराम शितोळे, पर्यवेक्षक दत्तात्रय पाटील, नागप्पा मैंदर्गी, प्रशांत राणे, श्रीधर गायकवाड, प्रबुद्ध चिंचोळीकर, श्रीराम बरगंडे, धर्मराज कट्टीमणी, प्रसन्न काटकर आदी उपस्थित होते पंच म्हणून विठ्ठल सरवदे, संतोष पाटील, हर्ष लाहोटी, नागराज गुडदोर, सागर महापात्रो, ओंकार पुजारी, समर्थ उपळाईकर यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष खेंडे यांनी केले. मारुती घोडके यांनी आभार मानले.

**अंतिम निकाल (प्रथम, द्वितीय व तृतीय)** : सब ज्युनियर मुले : एस.आर. चंडक, शरदचंद्र पवार प्रशाला, अण्णप्पा काडादी हायस्कूल (सोलापर). मुली : एस.आर. चंडक, अण्णप्पा काडादी हायस्कूल, राज मेमोरिअल स्कूल (सोलापूर). ज्युनियर मुले : एस.आर. चंडक, राज मेमोरिअल, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स (सोलापूर). मुली : व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूल, एस.आर. चंडक अ संघ, एस.आर. चंडक ब संघ (सोलापूर).

---

**सेवानिवृत्त प्रादेशीक परिवहन अधिकारी डॉ. दुर्गाप्पा तुकाराम पवार यांची दैनिक तरुण भारतच्या वर्धापनदिनानिमित्त घेतलेली मुलाखत..**

**प्रश्न :- आपले शिक्षण कुठपर्यंत झाले आहे?**

**उत्तर :-** माझे शिक्षण बीएस.सी, एलएलएम, पी.एच.डी (लॉ) असे असून, पंढरपूर कॉलेज, वालचंद कॉलेज, दयानंद कॉलेज, पुणे विद्यापीठ येथून झाले आहे.

**प्रश्न :- आपण आतापर्यंत कोणत्या पदावर काम केले आहे ?**

**उत्तर :-** भारतीय हवाई सेना बँक ऑफ बडोदा मोटार वाहन विभाग येथे सेवा केलेली आहे. मोटार वाहन विभागात काम करीत असताना २५ वर्षे सतत रस्ता सुरक्षा उपक्रम राबविले आहे. सेवानिवृत्ती नंतर ए.एस. आर.टी.यु. दिल्ली येथे Consultant Road Safety म्हणून काही कालावधी काम केले.

**प्रश्न :- आपल्या समाजकार्यासाठी कोणकोणते पुरस्कार मिळाले ?**

**उत्तर :-** १) वडार समाज शिक्षण प्रसारण व प्रबोधन यासाठी समाजरत्न पुरस्कार २०१०.
२) प्रशासकीय सेवेसाठी राज्यस्तरीय श्री पुरस्कार २०१७.
३) डॉ. अब्दुल कलाम सुजान विद्यार्थी अभियान प्रमाणपत्र आणि रस्ता सुरक्षा उपक्रम संदर्भात पुस्तक उपलब्ध करुन दिल्यामुळे अभिनंदन ठराव जिल्हा परिषद कोल्हापूर येथे पारित करण्यात आले.
४) रस्ता सुरक्षा प्रबोधनासाठी गोवा सरकार मुख्यमंत्री प्रमोदजी सावंत यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार २०२४ नुकताच देण्यात आला.

**प्रश्न :- आपण आतापर्यंत कोणकोणते साहित्य लिहलेले आहे?**

**उत्तर :-** प्रकाश वाटेकडे सुरक्षित प्रवास, सतनाम सतकबीर, सेफ ट्रॅव्हल्स, संघर्षाकडून समाधीकडे हे रस्ता सुरक्षा अध्यात्म आणि आत्म चरित्रमध्ये विभागले आहे.

**प्रश्न :- पुस्तकांचे वाटप कुठे-कुठे करण्यात आले?**

**उत्तर:-** सांगली जिल्हा परिषद, कोल्हापूर जिल्हा परिषद, लातूर जिल्हा परिषद, याठिकाणी रस्ता सुरक्षा बाबतचे पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

**प्रश्न :- प्रादेशिक परिवहन विभागामध्ये उच्च पदावर काम करीत असताना महत्वाचे कोणकोणते निर्णय घेण्यात आले ?**

**उत्तर :-** रद्द झालेल्या रिक्षा परवाने गरजू रिक्षा चालकांना देण्यास कोल्हापुरातून सुरुवात केली मा. उच्च न्यायालय मुंबई आदेशानुसार सर्व महाराष्ट्रामध्ये रद्द झालेले रिक्षा परवाने गरजूंना देण्यात आले. नागपूरमध्ये असताना नागपूर शहरामधील हिंदी व मराठी भाषेचे सन्मान महत्व लक्षात घेऊन सर्व गरजूंना रद्द झालेले रिक्षा परवाने वाटप करण्यात आले. नागपूर शहरातील ई-रिक्षा समस्या सोडविण्यासाठी रस्ते परिवहन व राष्ट्रीय महामार्ग मंत्रालय यांना प्रस्ताव सादर करुन नागपूरसह महाराष्ट्रात ई-रिक्षा समस्या दूर केली.



डॉ. दुर्गाप्पा तुकाराम पवार
सेवानिवृत्त प्रादेशीक परिवहन अधिकारी
Bsc, LL.M.Ph.D (Law)

**प्रश्न :- प्रशासकीय सेवेत असताना सामाजिक कार्याकडे ओढ कशी लागली व कसे काम करण्याची संधी मिळाली ?**

**उत्तर :-** सामाजिक कार्यकरित असताना दलित-मुस्लिम व इतर मागासवर्गीय समाजातील नागरिकांचे वैचारिक संपर्क ठेवले शासन प्रणालीची प्रशासकिय माहिती असल्याने ग्राम स्तारापासुन ते जिल्हा स्तरापर्यंत शासन स्तरावरील वेगवेगळ्या योजना प्रभावपणे राबविण्याची क्षमता वडार समाजातले नागरिकांना सेवा संघाच्या माध्यमातून एक तरी पदवीधर निर्माण करण्याची वेळोवेळी आवाहन केले.

**प्रश्न : प्रशासनात उच्च स्तरावर असताना कोणकोणते विशेष कार्य आपण केले आहोत?**

**उत्तर :-** कोल्हापूर, सोलापूर, नागपूर (पूर्व) जमीन अधीग्रहण व बांधकाम निधीसाठी प्रयत्न केले आहे, उस्मानाबाद, कागल, कराड या शासकिय कार्यालयासाठी जमीन अधीग्रहण व बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन घेतले तसेच लातूर कार्यालयाच्या जागेसाठी २५ वर्षे जमीन अधिग्रहण प्रकरण पूर्णत्वास नेऊन शासनांचे ३ कोटी रुपये वाचविले.

**प्रश्न :- सोलापूरमध्ये सामाजिक कार्य करीत असताना कोण-कोणते महत्वपूर्ण निर्णय घेणार आहात?**

**उत्तर :-** गरजूंना पंतप्रधान घरकुल योजनेसाठी मार्गदर्शन आणि योजना राबविणे सोलापूर शहरातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी प्रयत्न करणे रस्ता सुरक्षा उपक्रम व प्रबोधन सर्व नादुरुस्त रस्ता संदर्भात जिल्हा रस्ता सुरक्षा समितीद्वारा प्रयत्न करणे व्यसनमुक्त योजना राबवणे, हिंदू-मुस्लिम समाजामध्ये सौहार्दापूर्ण वातावरण निर्माण करणे.

**प्रश्न :- आपण सामाजिक कार्यकरित असताना समाजासाठी कोणते संदेश देणार आहात?**

**उत्तर :-** मनुष्य जन्म रस्ता अपघातामध्ये मृत्युमुखी पडण्यासाठी नसुन भौतिक कर्तव्य पार पाडून गुरुप्रचिती अत्मप्रचिती आणि शास्त्र प्रचिती असलेल्या सतगुरुचा शोध घेऊन आत्म ज्ञान प्राप्त करण्यासाठी आहे. त्यामुळे मानवी जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी. मद्यपान करुन वाहन चालविणे टाळा रहदारीचे नियम पाळा आणि अपघात टाळा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





दै. सोलापूर 'तरुण भारत'च्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...




दै. सोलापूर 'तरुण भारत'च्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...



# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**!! जाहीर सूचना !!**

सोलापूर तरुण भारत जाहिराती तसेच सर्व विभागांसाठी ऑनलाईन रिसीट ॲप वापरण्यास सुरुवात केली आहे. ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, कोणतेही पैसे जमा करताना ऑनलाईन रिसीटची मागणी करावी. ऑनलाईन रिसीट शेअर करण्याची देखील सोय केली आहे. आमच्या प्रतिनिधीकडून याची माहिती घ्यावी. ऑनलाईन रिसीटची मागणी हक्काने करावी.

सहकार्याबद्दल धन्यवाद.




## क्राईम वृत्त...

### अंबिका नगरात हाणामारी सहाजणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.३१ जुलै-**

एमआयडीसी परिसरातील अंबिका नगरात हाणामारी करणाऱ्या सहाजणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस शिपाई योगेश भोसले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इक्बाल महिबुब शेख, मुस्ताक इब्राहीम शेख, अनिता रमेश जपले, अंबिका रमेश गायकवाड, शाहीन मुस्ताक शेख, कौसर मुस्ताक अहमद शेख (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. ३० जुलै रोजी दुपारी अंबिका नगरात इक्बाल शेख व इतर सर्वजण हे एकमेकांत मारामारी करीत होते. त्यावेळी पोलिश शिपाई योगेश भोसले यांनी त्यांना कारण विचारले असता त्यांनी ही जागा आमची आहे असे बोलले व जागेबाबत मारामारी व झोंबाझोंबी करून आरडाओरड करीत असलेले दिसून आले. हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

### पैशाच्या कारणावरून ढुसणी मारणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.३१ जुलै-**

पैशाच्या कारणावरुन नाकावर ढुसणी मारून तरूणास जखमी करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अशोक हरिचंद्र सोनेगार (वय ३५, रा. न्यु पाच्छा पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन दिपक (रा. कंबर तलाव जवळ, लॉन्ड्री दुकानात कामाला, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. २३ जुलै रोजी गणपती मंदीरजवळ अशोक सोनेगार हे डॉ. नेने यांच्या घराजवळ थांबले होते. त्यावेळी दीपक हा सोनेगार यांच्याजवळ आला व त्यांच्याशी वाद घालू लागला. त्यावेळी त्यास पैसे देणारच आहे, तु माझ्याबरोबर भांडण करू नकोस असे म्हणत असताना दीपकने सोनेगार यांच्या नाकावर डोक्याने ढुसणी देऊन त्यांना जखमी केले.

# रंगभवन, ७० फूट रोड परिसरात रस्त्यावरील अतिक्रमण हटविले

## लोखंडी टपरी, वजन काट्यासह इतर साहित्य जप्त



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि ३१ जुलै -**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज रंग भवन आणि ७० फूट रोड परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत लोखंडी टपरी, दोन वजन काटे, पाच लहान लाकडी अभ्यास टेबल, एक डिजिटल बोर्ड व इतर साहित्य जप्त करण्यात आले.

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आयुक्त शीतल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण हटविण्याची मोहीम नियमितपणे सुरू आहे. शहरात रस्त्याच्या कडेला, फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची कारवाई करण्यात येत आहे. आज या विभागाने कारवाईची मोहीम शहरातील रंग भवन आणि सत्तर फूट रोड परिसरात राबविली. पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही मोहीम राबवण्यात आली. या दोन्ही ठिकाणी कारवाई करून पथकाने एक लोखंडी टपरी, दोन वजन काटे, पाच लहान लाकडी अभ्यास टेबल, एक डिजिटल बोर्ड व इतर साहित्य जप्त केले. सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा येईल असे आणि इतर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण व्यापारी अथवा नागरिकांनी करू नये.


अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन या विभागाचे प्रमुख मुर्तुजा शहापुरे यांनी केले आहे.



**बाप्पाच्या आगमनाची तयारी...**

सोलापूर : शहरातील विविध शाळांमध्ये बाप्पाच्या आगमनाची तयारी सुरू झाली आहे. लेझीम, झांज, टिपऱ्या यांच्या सरावास सुरुवात झाली आहे. होम मैदानावर सराव करताना टिपलेले छायाचित्र (छायाचित्र : केवल तिवारी)

# पालकमंत्री चंद्रकांतदादांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची शनिवारी बैठक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जुलै-**

जिल्हा नियोजन समितीची बैठक राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार, दि. ३ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता नियोजन भवन सभागृह, शासकीय दुध डेअरी शेजारी, सात रस्ता सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस जिल्ह्यातील आमदार, खासदार आणि जिल्हा नियोजन समितीचे सदस्य उपस्थित राहणार असल्याची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे.

# सोलापूर शहर मध्यसाठी जोरदार रस्सीखेच

## काँग्रेसची उमेदवारी समाजाला मिळावी

## समाजाने घेतला एकमुखाने निर्णय



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

लोकसभेच्या निवडणुकीनंतर आता राज्यात आगामी विधानसभेचे पडघम वाजायला सुरुवात झाली आहे. शहर उत्तर, शहर मध्य आणि शहर दक्षिण या तिन्ही विधानसेसाठी सोलापूर शहर जिल्ह्यात इच्छुकांची भाऊगर्दी वाढत चाललेली आहे.

अशातच आता विधानसभेच्या निवडणुकीसाठी मोची समाजाने कंबर कसली आहे. मोची समाजाने शहर मध्य विधानसभेची उमेदवारी काँग्रेस पक्षाकडून मोची समाजाला मिळावी याकरिता मोट बांधण्यास सुरुवात केली आहे. मोची समाजाचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र भंडारे यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसप्रेमी मोची समाज बांधव व विभागीय अध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पाडली.

या बैठकीत काँग्रेस पक्षाकडून मध्य विधानसभा मतदारसंघात समाजाला उमेदवारी मिळावे याकरिता माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले या सर्वांना शिष्टमंडळद्वारे भेट घेऊन उमेदवारीची मागणी करणार आहेत असा एक मताने निर्णय घेण्यात आला. यावेळी संजय हेमगड्डी, प्रा. नरसिंह आसादे, सोलापूर शहर काँग्रेस कार्याध्यक्ष हणमंतु सायबोळू, अंबादास (बाबा) करगुळे, रतिकांत कमलापुरे, सिद्राम अट्टेलुर, बसवराज म्हेत्रे, सिद्राम कामाटी, बाबुराव म्हेत्रे, दिनेश म्हेत्रे, नागनाथ कासोलकर, बाबू विटे, यल्लप्पा बुगले, करेप्पा जंगम, विजय मरेड्डी, शिवराम जगले, अर्जुन साळवे, ईश्वर म्हेत्रे, नागेश म्हेत्रे, अंबादास नाटेकर, नरसिंग म्हेत्रे उपस्थित होते.


सोलापूर 'तरुण भारत'च्या
४० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...

Café Choco Craze
पिझ्झा, बर्गर, फ्रॉलिक्स, फ्राईज, पास्ता, मोमोज आणि खूप काही...
आजच भेट द्या !



Bonding Starts Here...
पत्ता : चैतन्य भाजी मंडई, विजापूर रोड, सोलापूर.

BEVERAGES



www.cafechococraze.com
Bonding Starts Here...

दै. सोलापूर 'तरुण भारत'च्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख

लोकमंगल बँक
लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर
॥ अखंड गतीतून सार्थकता ॥
लोकमंगल समूह १९९८-२०२२ २५ अखंड गतीचा रौप्य महोत्सव
रुक्मिणी कॉम्प्लेक्स, १९३ गोल्डफिंच पेठ, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०१/०२




३६५ दिवस अविरत सेवा



५ लाखांपर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण
एकाच कुटुंबांतील २ लाखांपर्यंत विमा संरक्षण

ठेवीवरील आकर्षक व्याजदर

| मुदत | व्याजदर | ज्येष्ठ नागरिक व सहकारी संस्थेसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ७ दिवस ते ४५ दिवस | ३.५०% | ४.००% |
| ४६ दिवस ते १७९ दिवस | ४.५०% | ५.००% |
| १८० दिवस ते २१० दिवस | ५.००% | ५.५०% |
| २११ दिवस ते १ वर्षापेक्षा कमी | ६.००% | ६.५०% |
| १ वर्षी ते २ वर्षापेक्षा कमी | ८.००% | ८.५०% |
| २ ते ३ वर्ष | ८.५०% | ९.००% |
| ३ वर्षापेक्षा जास्त | ७.००% | ७.५०% |
| दामदुप्पट | १२० महिने | ११२ महिने |

रिकरिंग ठेवीवरील व्याजदर

| | |
|---|---|
| १ ते २ वर्षापेक्षा कमी | ८.००% |
| २ ते ३ वर्षापेक्षा कमी | ८.५०% |
| ३ वर्षापेक्षा जास्त | ७.००% |

✻ ज्येष्ठ, सहकारी संस्था यांना अर्धा टक्का ज्यादा व्याज

Lokmangal Co-Operative Bank Ltd.
Google Pay PhonePe Paytm BHIM UPI

सर्व प्रकारची कर्जे उपलब्ध
- अण्णासाहेब पाटील महामंडळ मार्फत व्याजपरतावा कर्ज योजना
- फूड प्रोसेसिंग कर्ज (३५ % सबसिडी)
- गृहकर्ज
- वाहन / शैक्षणिक कर्ज
- व्यवसाय कर्ज, मशिनरी कर्ज, शेती कर्ज
- कॅश क्रेडीट कर्ज
- पीक कर्ज / वैयक्तिक कर्ज
- प्रॉपर्टी तारण कर्ज
- सोने तारण कर्ज



लॉकर सेवा उपलब्ध

टीप : आपले कार्ड, पासवर्ड, पीन, CVV हे तपशील फोन किंवा SMS व्दारे कोणाशीही शेअर करू नका

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८४७

**होईल की विसावा ।**
**सुख जीवा सेना म्हणे ।।**

ज्याची त्याची सुखाची परिभाषा काही प्रमाणात का होईना वेगळी असली तरीही जवळपास प्रत्येकाची धडपड ही सुखासाठीच असते. कोणाला इंद्रियाचे लळे पुरवण्यात सुख वाटते तर कोणाला इंद्रियनिग्रहणात सुख वाटते. कोणाचा ओढा सांसारिक सुखाकडे असतो तर कोणाचा अध्यात्मिकतेकडे असतो. इंद्रियाचे लळे पुरवण्यात सुख मानणारा माणूस सदैव अतृप्त असतो. कारण इंद्रियांचे लळे पुरवावे तेवढे कमीच असतात. त्यामुळे इंद्रिय सुखाकडे वळलेला माणूस क्षणभर सुखी तर उर्वरित काळात दुःखी, चिंताग्रस्त, तणावग्रस्त असतो. अशा माणसाच्या मनात सदैव नाशवंत, भौतिक सुखाचे गणित चालू असते. पण ज्याने इंद्रियावर विजय मिळवला आहे तो नाशवंत, भौतिक सुखाला कवडीचीही किंमत देत नाही. अर्थात, अशा व्यक्तिकडे ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, अहंकार, लोभ, मीपणा आदिला स्थान असत नाही. अशा अडचणी निमर्ाण करणा-या बाबींना स्थान नसणे म्हणजे आपोआप सुख, समाधान, आनंद आदी महत्वपूर्ण बाबींना



स्थान असणे होय. खरे म्हणजे हे जवळपास सर्वांनाच कळते तरीही मोठया संख्येने लोक चुकीच्या मार्गावर सहजपणे जात असतात. प्रयत्न केला तर आपण कोणीही सदैव आनंदी राहू शकतो.

इंद्रिय निग्रह हा विषय आवश्यक असला तरी तो तसा अवघड आहे. पण प्रयत्नांअंती तो साध्यही होऊ शकतो. संत सेनाजी हे त्यांचे मन आणि इंद्रिय ताब्यात ठेवण्यात यशस्वी झाले होते. या यशामागे समचरणी उभा राहून समतेचा संदेश देणाऱ्या पांडूरंगाची प्रेरणा व आशिर्वाद असल्याची त्यांची खात्री होती. म्हणून ते संसारात अडकलेल्या जीवालाही, होईल की विसावा । सुख जीवा सेना म्हणे ।।, अशा अनुभूतीस्वरूप शब्दांत ईर्षा, द्वेष, मत्सर आदिसारख्या मानवतेच्या शत्रूंपासून मुक्ती मिळावी व हा जीव सुखी व्हावा म्हणून पांडूरंग चरणी स्थिर होण्याचा संदेश देतात. भक्ती मार्गात असूनही अनेकांना खरे सुख कशात आहे, हे समजत नाही. म्हणून माणसाची नाशवंत सुखामागची धावाधाव संपत नाही. आनंदी जीवनासाठी नाशवंत वस्तुच्या जमवाजमवीत सुख नसून ते शाश्वत भगवंत भक्तीत आहे, हे कळायला हवे. तुकाराम महाराजांसारखे, तुका म्हणे कांही न मागों आणिक । तुझे पायीं सुख सर्व आहे ।।, असे जर सांसारिक जीवाला म्हणता आले, तर त्याच्या सुखाला, आनंदाला पारावारच असणार नाही. आपले जीवन सुखासाठी व खऱ्या आनंदासाठी आहे, याची आपणाला सदैव जाण असली पाहीजे. कारण गेलेला एकही क्षण आयुष्यात पुन्हा परत येत नाही. संत साहित्याच्या सहवासात राहणाऱ्याला वेळेचे महत्व आपोआप कळू लागते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरुवार**
**दि. १ ऑगस्ट २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - आषाढ**
**कृ. द्वादशी (१५.२८)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र- मृग (१०.२३)**
**योग - व्याघात (१०.४९)**
**करण - गर (२७.२४)**
**दिनविशेष - लोकमान्य टिळक पुण्यतिथी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : आरोग्याची काळजी घ्या. व्यापारात नवीन योजना आखताल. राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत.

**वृषभ** : प्रभावपूर्ण वातावरण राहील. जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**मिथुन** : अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका. आपल्या सल्ला घेतला जाईल. रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे.

**कर्क** : आर्थिक योजनेमध्ये यश मिळेल. कार्यकुशलते मुळे आपला फायदा होईल. विरोधकांपासून सावध रहा. कौटुंबिक संबंध चांगले राहतील. परमेश्वरावरील विश्वास वाढणार आहे.

**सिंह** : वडीलधाऱ्या व्यक्तिंच्या प्रकृतीची काळजी घ्या. आपले ध्येय्य साध्य करण्याच्या दिशेने हालचाल करा. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत. व्यापारत नवीन योजना सुरू होतील.

**कन्या** : सामाजिक स्थिती चांगली राहणार आहे. धावपळ केली तरच आपल्याला यश मिळणार आहे. स्वविवेक बुद्धीने निर्णय घेऊनच व्यवहार करा.

**तुळ** : आपली कार्यक्षमता वाढणार असून आपल्या योग्यतेची समाजात प्रशंसा होईल. कौटुंबिक स्थिती आनंददायी राहील. प्रवास करण्याचे शक्यतो टाळावे.

**वृश्चिक** : कोणत्याही प्रकारच्या जोखमीचे कामे करू नका. सकारात्मक परिस्थिती राहील. व्यापारात अपेक्षेप्रमाणे लाभ होईल. कौटुंबिक तणाव निर्माण होईल.

**धनु** : आपल्या ज्ञानात भर पडणार आहे. व्यावसायिक अडचणी दूर होतील. नवीन संबंध फायदेशीर राहतील. उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ ठेवा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मकर** : घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे. आर्थिक देणेघेणे व्यवहारात सावधानी बाळगा.

**कुंभ** : उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे.

**मीन** : सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. कोणाचाही राग करू नका.

# सिव्हिल हॉस्पिटलमध्ये लवकरच टोकन सिस्टीम

**मोठ्या स्क्रीनवर नाव, नंबर दिसण्याची करणार व्यवस्था : अधिष्ठाता डॉ. ठाकूर**

**रुग्णांना रांगेत तिष्ठत थांबायचा त्रास टळणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जुलै-**

येथील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयामध्ये (सिव्हील) ओपीडी विभागात रुग्णांची गर्दी असते. त्यांना रांगेत थांबायला लागू नये, यासाठी बँकांप्रमाणे टोकन सिस्टम करण्याचा प्रयत्न राहील. ज्याचा नाव, नंबर स्क्रीनवर येईल त्याला बोलावले जाईल, अशी माहिती अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी दिली.

ओपीडी विभागात रुग्णांची गर्दी असते. त्यांना रांगेत तिष्ठत थांबायला लागू नये यासाठी बँकांप्रमाणे टोकन सिस्टम करण्याचा प्रयत्न राहील. ज्याचा नाव नंबर स्क्रीनवर येईल त्याला बोलावले जाईल. उपचारासाठी आलेले रुग्ण त्यांच्यासाठी कक्षा बाहेर थांबतील. तिथे खुर्च्यांची व्यवस्था, पाणी, पंखा, उजेडाची सोय करण्यात येईल. याच ठिकाणी टीव्ही स्क्रीनवर विविध शस्त्रक्रिया, विविध आजार त्यांची माहिती पहावयास मिळेल. तसेच घ्यावयाची काळजी याचे छोटे-छोटे माहितीपट दाखवण्यात येतील.

अनेकदा पेशंट कोणत्या विभागामध्ये दाखल आहे. याची माहिती नसते. नागरिकांना फिरावे लागते. तसेच या विभागातून त्या विभागात जावे लागते. लवकरच व्हाट्सअप सारखा नंबर उपलब्ध करून देण्यात येईल. यावर रुग्णाचे नाव किंवा अन्य माहिती टाकली तर तो रुग्ण नक्की कोणत्या वार्डामध्ये उपचार घेत आहे. याची अद्ययावत माहिती मेसेज द्वारे संबंधितांना मिळू शकेल. यासाठीही आपण प्रयत्नशील आहोत, असे डॉ. ठाकूर यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयावर सोलापूरकरांचा विश्वास आहे. रुग्णांना दिलासा देणारे हे हॉस्पिटल व्हावे या दृष्टीने आपले प्रयत्न राहतील. रुग्णालयाच्या आवारात शक्य तिथे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी शक्य त्या सर्व सुविधा यामध्ये शेड, बसण्याचे बाक, मार्गदर्शन कक्ष अशा सुविधाही लवकरच उपलब्ध होतील. या हॉस्पिटलमध्ये एमआरआय मशीन घेण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. सिटीस्कॅन घेण्याबाबत टेंडर काढण्यात येत आहे, असेही डॉ. संजीव ठाकूर यांनी स्पष्ट केले.

# शनिवारी अवयवदान जनजागृती महा रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जुलै-**

जागतिक अवयवदान दिनानिमित्त सोलापुरात शनिवार दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता अवयव दान जनजागृती महारॅली काढण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कुंभारी, अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील विविध महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींची महारॅली काढण्यात येणार आहे.

या रॅलीस डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथून प्रारंभ होणार आहे. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते या रॅलीचे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर पुढे पोटफाडी चौक, सिद्धार्थ हाऊसिंग सोसायटी, कुंभार गल्ली, जगदंबा चौक, लष्कर , सात रस्ता, संगमेश्वर महाविद्यालय मार्गे गरुड बंगला, रोटरी बगीचा, भगतसिंग मार्केट मार्गे अश्विनी सहकारी रुग्णालय येथे या महा रॅलीचा समारोप होणार आहे. या निमित्त महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्यासाठी आयोजित केलेल्या स्लोगन स्पर्धा, निबंध, रांगोळी , वक्तृत्व, भित्तिपत्रक आदी स्पर्धांचा यावेळी बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. पत्रकार परिषदेस डॉ.औदुंबर मस्के, अशोक लांबतुरे, डॉ. संतोष हराळकर, डॉ.अभिजीत जगताप, डॉ. अभिजीत जिरगे आदी उपस्थित होते.

# 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा'मुळे पालकांमध्ये उत्तरदायित्वाची भावना

**उपशिक्षणाधिकारी रुपाली भावसार यांचे प्रतिपादन; मनपा शाळा क्रमांक २८ला ३ लाखाचे पारितोषिक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जुलै-**

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या स्पर्धात्मक अभियानामुळे शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांचा शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण झाली आहे. त्यायोगे स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी वातावरण तयार झाली आहे, असे प्रतिपादन उपशिक्षणाधिकारी रुपाली भावसार यांनी केले.

गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथे आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी उपशिक्षणाधिकारी



भावसार बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर गटशिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे, शिक्षण विस्तार अधिकारी अंकुश काळे, जयश्री सुतार, गुरुबाळ सणके आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक विजेत्या शाळांना रोख रक्कम प्रथम क्रमांक तीन लाख रुपये, द्वितीय क्रमांक दोन लाख रुपये व तृतीय क्रमांक एक लाख रुपये, प्रमाणपत्र, शाल व गुच्छ देऊन गौरव करण्यात आले. यावेळी गटशिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे म्हणाले, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियान अतिशय चुरशीने पार पडली. या स्पर्धेमुळे प्रत्येक शाळेच्या गुणवत्ता वाढीबरोबर शाळेच्या भौतिक सुविधांची वाढ होण्यासाठी मदत झाल्याचे दिसून आले. येत्या ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर पर्यंत पुन्हा शासनाच्यावतीने 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानाला सुरुवात होत आहे तरी सर्व माध्यमाच्या शाळांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.

यावेळी पारितोषिक विजेते मुख्याध्यापक महांतेश अतनुरे, मुख्याध्यापिका भांगे यांनी बक्षिसांची रक्कम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करणार असल्याचे मनोगतातून व्यक्त केले. सूत्रसंचालन शिक्षण विस्तार अधिकारी जयश्री सुतार यांनी केले तर शिक्षण विस्तार अधिकारी गुरुबाळ सणके यांनी आभार मानले.

### एसव्हीसीएस बोरामणी प्रशालाही तीन लाखाची मानकरी

पहिला गट - स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत- महानगर पालिका शाळा क्रमांक २८ सोलापूर (प्रथम क्रमांक-तीन लाख रुपये), जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विडी घरकुल ब उर्दू (द्वितीय क्रमांक-दोन लाख रुपये), जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचपूर (तृतीय क्रमांक एक लाख रुपये) व दुसरा गट - व्यवस्थापनांच्या शाळा अंतर्गत-एस.व्ही.सी.एस. हायस्कूल बोरामणी(प्रथम क्रमांक-तीन लाख रुपये), सिद्धाराम म्हेत्रे प्रशाला विडी घरकुल कुंभारी (द्वितीय क्रमांक-दोन लाख रुपये), श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला सोलापूर (तृतीय क्रमांक-एक लाख रुपये).

# एन.जी.मिल परिसरात पोशम्मा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

एन.जी.मिल चाळीतील पद्मशाली समाजाकडून आषाढ महिन्यातील पोशम्मा सण उत्साहात साजरा करण्यात आला.पद्मशाली समाजातील महिलांनी कलश घेऊन एन.जी.मिल चाळ, राम लाल चौक, परिसरातून मिरवणूक काढण्यात आली.

आषाढ महिन्यात देवी देवतांना नैवेद्य अर्पण करण्याची परंपरा कायम आहे. सोलापूर शहरात बेडर, लोधी, पद्मशाली, गवळी अशा विविध समाज बांधवांच्या वतीने आषाढ उत्सव सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील साजरा केला गेला. एन.जी.मिल परिसरात पद्मशाली समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहे. या समाजाकडून



हा आषाढ उत्सव सणाप्रमाणे साजरा करण्यात आला.

यावेळी सुवासिनी महिलांनी आपल्या डोक्यावर जलकुंभ, कडुलिंब घेऊन पोतराजसह हलगीच्या पारंपरिक वाद्यवर कलश मिरवणूक काढली. त्यानंतर मिल परिसरात असणाऱ्या पोशम्मा देवीच्या मंदिरात जलकुंभात आणलेल्या पाणी देवीच्या पायांवर ओतण्यात आले. त्यानंतर मंदिरात विविध धार्मिक विधी संपन्न करण्यात आले. यावेळी वेंकट वरकल, श्रीनिवास गुड्डू, रघु महाराज वरकल, रवी मेरगु, अविनाश निर्गु, अनु शिरसागर, श्रीनिवास तुम्हा, आयुष चोरमुले, विनायक वरकल, रोहन भीमरती, भरत बुड्डू, करुणा वरकल, पद्मावती वरकल, पुजा पोतु, मीनु वड्डेपल्ली, अश्विनी वड्डेपल्ली, रसिका भिमर्थी, उमा धारा, स्वप्ना मेरगु, भाग्यश्री फलमारी, विजया बोड्डु, स्वाती दुधगुडी, बबिता दावत आदींसह एन.जी. मिल चाळीतील रहिवासियांनी या उत्सवात सहभाग घेतला.

# येत्या सप्टेंबरपर्यंत लाड-पागे, अनुकंपाची प्रकरणे मार्गी लावणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

येत्या सप्टेंबरपर्यंत महापालिकेतील लाड-पागे आणि अनुकंपाची प्रकरणे मार्गी लावण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडून नियोजन करण्यात आले असून हालचालींना वेग आला आहे.

औरंगाबाद खंडपीठात लाड-पागे समिती योजने प्रकरणी बाब न्यायप्रविष्ठ असल्याने स्थगिती होती. दरम्यानच्या काळात नुकताच खंडपीठाने या प्रकरणी निकाल दिला आहे. त्यामुळे सोलापूर महापालिकेतील लाड-पागे समिती अंतर्गत असलेली प्रकरणे आता मार्गी लागणार आहेत. यामुळे महापालिकेतील सफाई कामगारांच्या वारसांना दिलासा मिळाला आहे.

लाड - पागे समिती अंतर्गत सफाई कामगारांना वारसा हक्काने काम देण्याची तरतूद आहे. सोलापूर महापालिका प्रशासनात लाड - पागे समितीची सुमारे ३२५ प्रकरणे आहेत. तर अनुकंपाअंतर्गत सुमारे ९५ प्रस्ताव आहेत.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी येथे ऑक्टोबर २०२४ मध्ये आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतुल यांच्या माध्यमातून या दोन्ही योजना अंतर्गत भरती प्रकरणाचा निपटारा करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### 'त्या' प्रकरणांचा निपटारा करण्याचे नियोजन



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी येत्या ऑक्टोबरमध्ये आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यापूर्वी सप्टेंबर मध्ये महापालिकेतील लाड-पागे समिती अंतर्गत आणि अनुकंपा योजनेअंतर्गत असलेल्या प्रकरणांचा निपटारा करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी सामान्य प्रशासन विभागाला आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत, अशी माहिती उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

# अण्णाभाऊ साठे जयंती मिरवणुकीनिमित्त वाहतूक मार्गात बदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जुलै -**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती सांगता मिरवणूक ४ ऑगस्ट रोजी शहरात काढण्यात येईल. मिरवणुकीमुळे मिरवणूक मार्गावर लोकांची गर्दी होणार आहे. या दरम्यान मिरवणुकीच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी येणाऱ्या वाहनांचा अडथळा निर्माण होऊन वाहतुकीची कोंडी होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहे. शहरातून वेगवेगळ्या ठिकाणाहून मिरवणूका निघून त्या अण्णाभाऊ साठे चौक येथे विसर्जित होणार आहेत. मिरवणूक मार्गावरून मिरवणुकीत सामील होणारी



वाहने वगळता इतर सर्व प्रकारच्या वाहनांना येण्या-जाण्यास दुपारी एक ते रात्री १२ वाजेपर्यंत वाहतुकीस बंद राहणार आहे.

### हा मार्ग राहणार बंद

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक रामलाल चौक डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक शहर होतात बापूतळा खान मज्जिद सरस्वती चौक नवीवेळेस पोलीस चौकी मेकॅनिक चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक ॲम्बेसेडर हॉटेल.

### जड वाहतूक जाण्यासाठी पर्यायी मार्ग

विजापूरकडून येणाऱ्या व जाणाऱ्या जड वाहनांनी नवीन बायपास रोडचा वापर करावा. अक्कलकोटकडून येणाऱ्या वाहनधारकांनी नवीन अक्कलकोट नाका, शांती चौक, जुना बोरामणी नाका, मार्केट यार्ड या मार्गाचा वापर करावा. तसेच मंगळवेढाकडून येणाऱ्या वाहनधारकांनी नवीन बायपास रोडचा वापर करावा असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### पर्यायी मार्ग

विजापूर रोडवरून मंगळवेढ्याकडे जाणाऱ्या वाहनांना पत्रकार भवन चौक, महावीर चौक, गुरुनानक चौक, संत तुकाराम चौक, अशोक चौक, शांती चौक, जुना बोरामणी नाका, मार्केट यार्ड, शेळगी क्रॉस रोड, जुना तुळजापूर नाका, कारंबा नाका, जुना पुना नाका, नवीन बायपास मार्गाने जाता येणार आहे. तसेस मंगळवेढ्याकडून येणाऱ्या वाहनांना नवीन बायपास रोडने पुणे हायवे बाळे, जुना पुना नाका, कारंबा नाका, जुना तुळजापूर नाका, शेळगी क्रॉस रोड, मार्केट यार्ड, हैदराबाद रोड मार्गाने येता येणार आहे. रेल्वे स्टेशनहून बसस्थानक छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना रेल्वे स्टेशन, सात रस्ता, रंगभवन चौक, विजापूर वेस, बाकळे प्रेस कॉर्नर, भावसार पथ, समाचार चौक, कोंतम चौक, कुंभारवेस, बलिदान चौक मार्गाने जाता येणार आहे. तर जुना पुना नाका येथून रेल्वे स्टेशनकडे येणाऱ्या वाहनांना जुना पुना नाका, जुना कारंबा नाका, जुना तुळजापूर नाका, बोरामणी नाका, शांती चौक, सात रस्ता ते रेल्वे स्टेशन किंवा ॲम्बेसेटर हॉटेल, निराळे वस्ती पूल, एम. एस. सी. बी. ऑफिस समोर, शेटे नगर, रेल्वे बोगदा, मरीआई चौक, नागोबा मंदिर, रामवाडी दवाखाना, मोदी स्मशानभूमी, मोदी पोलीस चौकीसमोर रेल्वे स्टेशन असे जाता येणार आहे.

# मनुष्य चैनीच्या वस्तूमागे लागून जीवनातील चैन हरवून बसतो

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जुलै -**

'मनुष्य चैनीच्या वस्तू मागे लागून जीवनातील चैन हरवून बसतो. वस्तू, व्यक्ती अथवा पदार्थांमुळे मिळणारे सुख हे क्षणिक सुख असते. ते सुख नसून फक्त सुखाभास म्हणजे सुखाचा आभास असतो,' असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका परमपूज्य साध्वी प्राचीश्रीजी महाराज यांनी केले.

संसारातील सर्व प्राण्यांना सुख हवे असते. सुखाची अभिलाषा पूर्ण करण्यासाठी जो तो धडपडत असतो. सुख शोधण्यासाठी तीर्थयात्रेला जातो, फिरायला जातो. परंतु काही दिवस आपण सुखी राहाल परत आल्यानंतर रुटीन दिनचर्या चालू होते आणि सुख गायब होते. ईश्वराने आपल्याला आपल्या कल्पनेपेक्षा जास्त दिलेले असते. आज सुधारणा जितक्या जास्त तितका माणूस जास्त असमाधानी झाला आहे. सुखाची परिभाषा पूर्वी सीमित होती. आज सुखाची परिभाषा बदललेली आहे. मानवाने आपल्या बुद्धीच्या




जोरावर बरीच प्रगती केली. परंतु या साऱ्या लौकिक गोष्टी मिळूनही मनुष्य सुखी होत नाही. तृप्ती ऐवजी तो अतृप्तीचाच शिकार होतो. मग मानव या साऱ्या आभासात्मक सुखाला कंटाळतो. या प्रपंचातून सुटका होण्याचा मार्ग शोधू लागतो. ज्याच्या गरजा कमी असतात त्याची अस्वस्थता कमी असते, तो सुखाने झोप घेतो. जीवन सुखावह होण्यासाठी संपत्तीची आवश्यकता असते मात्र संपत्ती कसे मिळवावे आणि मिळालेल्या संपत्तीचा वापर कसा करावा याचा विवेक माणसाजवळ असला पाहिजे. घरात अशांती निर्माण होईल एवढा पैसा किंवा रात्रीची झोप उडेल एवढी संपत्ती माणसाने जमवू नये. इतरांच्या सुखासाठीही पैशाचा वापर करा, म्हणजे धनाचा सदुपयोग होईल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# वैराग अप्पर तहसीलची मागणी प्रलंबित

## तब्बल २३ कि.मी.चे अंतर; कामकाजासाठी बैर्शीला मारावे लागतात हेलपाटे

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३१ जुलै-**

बार्शी तालुक्यामध्ये १३८ महसुली गावे असून यांची महसूल यंत्रणा सुरळीत पार पाडावी. यासाठी ११ मंडलांची निर्मिती करण्यात आली आहे. यातील चार मंडले वैराग भागातील आहेत. या मंडळातील नागरिकांना महसूलच्या प्रत्येक कामासाठी वैरागपासून २३ किलोमीटर अंतरावर असलेल्या बार्शी तहसील कार्यालयामध्ये जावे लागते. याकरिता वेळ, पैसा व श्रम या सर्वच गोष्टी शेतकऱ्यांसह ग्रामस्थांना खर्च कराव्या लागतात. कामे अनेक दिवसांपासून लटकली जात असल्यामुळे वैराग भागातून वारंवार अप्पर तहसील कार्यालय व्हावे अशी मागणी केली जात आहे.

सामाजिक कार्यकर्ते अमरराजे निंबाळकर यांनी १३ एप्रिल २०२३ रोजी बार्शी तहसील कार्यालयासह महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे मागणी करून वारंवार पाठपुरावा केला आहे. बार्शी तालुक्यातील एकूण ११ मंडलांपैकी वैराग, सुर्डी, पानगाव, उपळे दुमाला व गौडगाव या पाच मंडलांमध्ये एकूण ६२ गावे येतात. प्रशासकीय कामकाजामध्ये समतोल साधता यावा यासाठी अनेक वर्षांपासून वैरागमध्ये अप्पर तहसील कार्यालय व्हावे, अशी पूर्वीपासूनची मागणी असतानादेखील पाठीमागून मोहोळ तालुक्यातील अनगर येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर झाले आहे. मात्र वैरागला अद्यापही होऊ शकलेले नाही. नुकताच अनगर येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याचा आदेश शासन स्तरावरून निघाला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा वैरागमध्ये अप्पर तहसील कार्यालय होणार की नाही याबद्दल नागरिकांमध्ये जोरदार चर्चा रंगू लागली आहे.

लोकसंख्या समतोलाचा प्रश्न असेल तर प्रस्ताव तयार करतानाच वैराग भागातील पाच मंडले आणि बार्शी भागातील सहा मंडले यांचा अंतर्भाव करून प्रस्ताव तयार करावा म्हणजे लोकसंख्या समतोलाचा प्रश्नच उरणार नाही आणि मंजुरी देखील तात्काळ मिळू शकेल.

**-अमरराजे निंबाळकर, सामाजिक कार्यकर्ते**

### प्रस्तावित अप्पर तहसील मंडलातील गावे

**वैराग मंडल** - वैराग, लाडोळे, मुंगशी आर., राळेरास, धामणगाव, रातंजन, सर्जापूर, सासुरे व शेळगाव (आर).

**सुर्डी मंडल** - सुर्डी, रस्तापूर, मानेगाव, काळेगाव, उंडेगाव, इर्ले, इर्लेवाडी, ढोराळे, यावली, तडवळे, दहिटणे, मुंगशी वा., मालवंडी, तुर्कपिंपरी.

**गौडगाव मंडल** - गौडगाव, संगमनेर, रऊळगाव, रुई, मालेगाव, हत्तीज, चिंचखोपन, हिंगणी आर, जवळगाव, अंबाबाईची वाडी, जोतीबाची वाडी, आंबेगाव, भालगाव, मिर्झनपूर, आळजापूर, सारोळे, कासारी, भांडेगाव.

**उपळे दुमाला मंडल** - उपळे दुमाला, निंबळक, भातंबरे, तांबेवाडी, झाडी, झरेगाव, बोरगाव, मळेगाव, पिंपरी पा., हळदुगे नांदणी, जामगाव पा.

**पानगाव मंडल** - पानगाव, कळंबवाडी पा., घाणेगाव, साकत, गुळपोळी, महागाव, बावी, पिंपळगाव (पा).

वैराग अपर तहसीलकरिता लोकसंख्या समतोल साधने कठीण होत होते. याबाबतचा प्रस्ताव प्रांताकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला आहे. आता आम्हीदेखील मंजुरीची वाट पाहत आहोत.

**-एफ. आर. शेख, तहसीलदार, बार्शी**



# काळानुसार विखुरलेल्या गुरु-शिष्यांनी ४५ वर्षांनंतर दिला आठवणींना उजाळा

## १९८०-८१ सालच्या माजी ७२ विद्यार्थ्यांचा कुटुंबियांसमवेत स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ जुलै-**

ज्या व्यक्ती आपल्या कर्तव्याला महत्व देतात अशांचेच गोडवे गायले जातात. त्यांची पुस्तकेही लिहिली जातात. आज प्रत्येक क्षेत्रात आपल्या शाळेतील विद्यार्थी उत्तुंग यश संपादन करुन आपापल्या क्षेत्रात दिमाखात उभे आहेत, याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो, असे प्रतिपादन निवृत्त शिक्षक विश्वास शेटे यांनी केले.

रविवारी सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलच्या सन १९८०-८१ सालच्या माजी ७२ विद्यार्थ्यांचा कुटुंबियांसमवेत स्नेहमेळावा संपन्न झाला याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे होते. यावेळी निवृत्त शिक्षक विश्वास शेटे, एस. एम. गणाचार्य, बी. एस. गणाचार्य, एस. डी. जमाले, आर. एच. मुंढे, प्रभाकर तळे, बाबुराव नेवाळे, विजयकुमार निंबर्गी, प्रकाश तोरगलकर, पी. जे. होनमुटे, सुलभा हालकुडे, आशा कांदे, निर्मला पवार आदी शिक्षकांसह माजी सेवक गणपत विभुते, उपमुख्याध्यापक अनिरुध्द चाटी व्यासपीठावर उपस्थित होते. मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे यांनी संस्थेचा लेखाजोखा मांडला. एस.डी. जमाले म्हणाले, विद्यार्थी हेच आमची पुंजी आहे. एस. एम. गणाचार्य यांनी मैत्री जपण्याचा कानमंत्र दिला. पी. एल. तळे यांनी मुलांना वाहन देताना पालकांनी घ्यावयाची दक्षता सांगितली. आशा कांदे व निर्मला पवार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस घंटानाद, राष्ट्रगीत, सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणींसाठी क्रीडांगणाच्या कडेला वृक्षारोपण केले. दिनेश स्वामी यांनी प्रास्ताविक केले. दिलीप उदावंत यांनी सूत्रसंचालन केले, डॉ. लक्ष्मीकांत काबरा यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी साजीद करमाळकर, अरुण माने, वसंत बिडवे, विजय धारुरकर, माणिक सांगळे, शिवलिंग धारुरकर, संजय हिरेमठ, सोमनाथ कोरे, विवेक वायकर, राजेश महिंद्रकर, सुनिता कदम, मंजुषा कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले. माजी विद्यार्थ्यांनी आपला परिचय करुन देत गुरुजनांच्या आशीर्वादामुळेच सुखी व समाधानी असल्याचे मनोगते व्यक्त केली.

### माजी विद्यार्थ्यांकडून देणगी

माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील गुणवंतांसाठी शिष्यवृत्ती देण्यासाठी रोख २१ हजार तर माजी विद्यार्थीनी सुनिता कदम यांनी आईच्या स्मृतीप्रित्यर्थ रोख ११ हजारांची देणगी मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे यांच्याकडे सुपुर्द केली.

# बल्करच्या धडकेत महिला ठार; तीन गंभीर जखमी

**सांगवी खुर्द येथील घटना**

**घटनेनंतर चालक फरार, पोलिसांचा तपास सुरु**



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ जुलै-**

सांगवी खुर्द (ता. अक्कलकोट) ते वागदरी जाणाऱ्या रोडवर सिमेंट वाहतूक करणाऱ्या बल्कर वाहनाने समोरून धडक दिल्याने ३५ वर्षीय एक महिला मयत झाली तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घटना मंगळवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली.

फिर्यादीची पत्नी कविता रविंद्र लवटे (वय ३५) असे मयत महिलेचे नाव आहे तर भाऊ गणेश सुखदेव लवटे (वय ४५), वहिनी ललिता गणेश लवटे, (वय ४२) व पुतणी पल्लवी गणेश लवटे (वय १५) असे गंभीर जखमींची नांवे आहेत. याबाबत उत्तर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला आहे. मंगळवारी ३० जुलै रोजी दुपारी दोनच्या सुमारास सांगवी खुर्द शिवारातील शेतात बल्कर (क्र. एम. एच. ४५/ ए. एफ. ७३५०)च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने, भरधाव वेगात रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवुन फिर्यादीचा भाऊ गणेश लवटे, वहिनी ललिता लवटे, पुतणी पल्लवी लवटे, पत्नी कविता रविंद्र लवटे सर्व (रा. सांगवी (खु), ता. अक्कलकोट) यांना समोरुन जोराची धडक देवून गंभीर जखमी करुन तिघे फॅक्चर होण्यास व कविता रविंद्र लवटे हीस गंभीर जखमी करून तिचे मरणास कारणीभूत झाला. फिर्याद शेतकरी रविंद सुखदेव लवटे यांनी दिली. फिर्यादीचे सांगवी (खु) गावचे अगदी जवळ अक्कलकोट ते वागदरी रोडलगत शेत असून त्यावरच कुटुंबाची उपजिविका चालते. जखमींच्या वैद्यकीय उपचाराची सोय न करता बल्कर चालक पळून गेला. गावकऱ्यांच्या मदतीने बल्करखाली सापडलेली पुतणी व वहिनीस बाहेर काढून अक्कलकोट येथे उपचार करुन पुढील उपचारासाठी त्यांना सोलापूरमध्ये दाखल केले आहे.

### असा घडला अपघात

फिर्यादी हा गावात मजुरीचे कामावर असताना रोडवर वाहनाचा अपघात झाल्याचा आवाज आला. शेताजवळ एक पांढऱ्या रंगाचा बल्कर ट्रक रोडच्या बाजुला पडलेला होता. तेथेच बाजूला फिर्यादीचा भाऊ गणेश सुखदेव लवटे हा रडत जखमी अवस्थेत बसलेला दिसला. दुपारी सर्वजण शेतातून घरी येत असताना समोरुन एक बल्कर ट्रक भरधाव वेगाने वेडेवाकडे येत असताना दिसले. सर्वजण आणखी रोडचे बाजूला झाले. तरीही या बल्कर ट्रकने समोरुन धडक दिली आहे. त्यामध्ये भावाला बल्कर ट्रकची धडक बसल्याने तो बाजूला जावून पडला. बल्कर ट्रकखाली फिर्यादीची वहिनी ललिता, पुतणी पल्लवी व बायको कविता अडकले.

# संक्षिप्त वृत्त

## सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये एम.फार्मसी मोफत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु

**सांगोला, दि. ३१ जुलै-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे येथे एम. फार्मसी अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसाठी स्क्रुटिनी सेंटर म्हणून महाराष्ट्र शासनाकडून मंजुरी मिळाली आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले यांनी दिली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता एम. फार्मसी प्रवेशाबाबत मोफत मार्गदर्शन केंद्र व ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आले आहे. या सुविधा केंद्रामध्ये बी. फार्मसी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे एम. फार्मसी प्रवेशकरिता ऑनलाईन अर्ज २९ जुलै ते ५ ऑगस्टदरम्यान स्वीकारले जाणार आहेत. या स्क्रुटिनी सेंटरमध्ये विद्यार्थ्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन व मूळ कागदपत्रे पडताळणी, अर्ज निश्चिती होणार आहे. खुला प्रवर्गासाठी १,२०० रुपये तर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी १,००० रुपये प्रवेश प्रक्रिया शुल्क ऑनलाईन, नेट, बँकिंगद्वारे किंवा एटीएम कार्डद्वारे महाराष्ट्र शासनाकडे भरणा करायचा आहे. याचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. दिलीपकुमार इंगवले यांनी केले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी प्रा. एस. एस. काळे (९८२२०४७२३६), डॉ. ए. एम. तांबोळी (९९७५४०२४६५), पी. एस. लोखंडे (९८२३१०७३७१) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांनी केले आहे.



## वळसंग ग्रामपंचायतीच्या शिबिरात १४६ विविध दाखल्यांचे वाटप

**वळसंग, दि.३१ जुलै-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्रालयाच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये भटक्या विमुक्त जातीतील नागरिकांना विविध दाखले, प्रमाणपत्र व शासकिय योजनांचा लाभ देण्यासंदर्भात विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार दोन दिवस शिबीर घेऊन १४६ विविध दाखले देण्यात आले. तहसीलदार किरण जमदाडे यांच्या आदेशान्वये विमुक्त जाती व भटक्या जमातीतील नागरीकांना आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड, जातप्रमाणपत्र, आयुष्यमान भारत कार्ड, सामाजिक योजनांचे विविध लाभ उपलब्ध करुन देण्यासाठी शिबीर घेण्यात आले. मंडल अधिकारी आर. पी. पाटील, तलाठी नयना देशपांडे, भीमाशंकर भुरले, औजचे तलाठी सचिन सावळे, आचेगावचे तलाठी चव्हाण, तहसील कर्मचारी खंडू भोसले, मुजावर, सरपंच जगदीश आंटद, उपसरपंच आरिफ कुरेशी, कोतवाल उपस्थित होते.



## आजार होण्यापेक्षा त्याला प्रतिबंध करणे ही काळाची गरज : डॉ. संदेश शहा

**इंदापूर, दि. ३१ जुलै-**

आरोग्य हे बाजारात विकत मिळत नसल्याने आजार होण्यापेक्षा त्यास प्रतिबंध करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाने आरोग्य साक्षर व सजग होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आरोग्य संदेश बहुउद्देशीय समाजसेवी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संदेश शहा यांनी केले. इंदापूर ज्येष्ठ नागरिक भवनमध्ये जेष्ठ नागरिक संघ, आरोग्य संदेश प्रतिष्ठान व समाजभूषण शरदकुमार माणिकचंद शहा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित 'निरोगी शरीर हिच खरी संपत्ती' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बाळासाहेब पाटील, माजी अध्यक्ष बाबासाहेब घाडगे व नंदकुमार गुजर, दत्तात्रय चांदणे यांच्या हस्ते सामाजिक कार्याबद्दल डॉ. संदेश शहा व डॉ. राधिका शहा यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघाचे संस्थापक सदस्य सुभाष थोरात, भानुदास पवार, शहाजी बागल यांचा सत्कार करण्यात आला. स्वागत प्रमोद भंडारी यांनी तर प्रास्ताविक नंदकुमार गुजर यांनी केले. सूत्रसंचलन जेष्ठ नागरिक संघाचे सचिव हनुमंत शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन सुभाष महाजन यांनी केले. यावेळी अशोक गानबोटे, सुभाष थोरात, भानुदास पवार, भीमराव वणवे, पांडुरंग जगताप, कृष्णा ताटे सर, इंद्रेश्वर पलंगे, सलीम शेख, जावेद मोमीन, संतोष जामदार उपस्थित होते.



## तालुकास्तरीय हॉलीबॉल स्पर्धेत नागनहळ्ळी आश्रमशाळेचे यश

**अक्कलकोट, दि. ३१ जुलै-**

तालुकास्तरीय हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेत नागनहळ्ळी आश्रमशाळेने घवघवीत यश संपादन केले आहे. हॉलीबॉल स्पर्धेत वय वर्ष १४ मुले प्रथम क्रमांक,. वय वर्ष १७ मुले व वय वर्ष १७ मुली प्रथम क्रमांक या वयोगटातील मुलींच्या संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. वय वर्ष १९ मुले यांनी अंतिम विजय संपादन केला. या संघाचीसुद्धा जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली. या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रशांत राजट्टे, मोहन गुरव, राजेंद्र साखरे यांचे अनमोल असे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आश्रमशाळेचे संस्थापक सचिव जावेद पटेल, प्राचार्य इस्माईल मुजावर, मुख्याध्यापक रईस शेख यांनी अभिनंदन केले.

# बार्शीत डिजे साऊंड सिस्टिमच्या मशिनची चोरी

**बार्शी, दि. ३१ जुलै-**

त्रिवेणी मंगल कार्यालय येथे डिजेला आवश्यक असणाऱ्या साऊंड सिस्टींगच्या सुमारे १ लाख ६६ हजार रुपयाचे मशीनीची चोरी झाली आहे याबाबत विपुल विजय तुपे याने अज्ञात चोराविरुध्द शहर पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना दि. २८ ते २९ जुलैच्या दरम्यान घडली. सदर कार्यालय आवारात टेम्पोमध्ये ठेवलेली साऊंड सिस्टीमच्या मशिनी आदी साहित्यासह गाडी लॉक करुन ठेवली होती. दि. २९ रोजी कार्यालयचे मालक हेमंत सांवत यांनी गाडीचे लॉक तुटल्याचे फोनद्वारे फिर्यादीस कळविले. सदर ठिकाणी जाऊन साऊंड सिस्टीम चेक केले असता सदर सिस्टीम मधील ७ मशीनी चोरी गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस करत आहेत.

# वनीकरण विभागातील भ्रष्टाचाराच्या फेरचौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ जुलै-**

अक्कलकोट तालुक्यात सन २०१७ ते २०२३ दरम्यान सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून झालेल्या रस्ता दुतर्फा, वृक्ष लागवड, गट लागवड, रोपवाटिका, एनटीपीसी यासह विविध शासकीय योजना अंतर्गत कोट्यावधींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप लहुजी शक्ती सेनेने केलेला आहे. सप्टेंबर आणि डिसेंबर २०२३ मध्ये अक्कलकोट तालुक्यातील सामाजिक वनीकरण विभागातील भ्रष्टाचार तपासण्यासाठी चौकशी समितीचा दौरा दोन वेळेस झाला होता. मात्र चौकशी समितीच्या दौऱ्यात काहीही निष्पन्न झालेले नाही. या समितीने एनटीपीसीच्या विविध ठिकाणांना भेटी देऊन चौकशी केली नाही. स्थळ पाहणी नि:पक्षपातीपणे केली असती तर भ्रष्टाचाराचा भस्मासूर सापडला असता त्यामुळे चौकशी समितीच्या भोंगळ कारभाराची सखोल चौकशी करून शासनाने पुन्हा नव्याने फेर चौकशीची स्थापना करण्याची मागणी लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी प्रशासनाकडे लेखी निवेदनातून केलेली आहे.



सामाजिक वनीकरण विभागांमध्ये शासनाच्या विविध योजनेत झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी व्हावी. अक्कलकोट सामाजिक वनीकरण विभागाच्या कामकाजाची केलेल्या चौकशी समितीची फेरचौकशी करण्याच्या मागणीसाठी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष महादेव भोसले यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी जिल्हाधिकारी व सामाजिक वनीकरण कार्यालयावर हलगीनाद आंदोलन करण्यात आले. सोलापूर येथील पूनम गेट समोर लहुजी शक्ती सेनेच्या वतीने हलगीनाद आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनात शहराध्यक्ष योगेश सोनवणे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष महादेव महाराज भोसले, जिल्हाध्यक्ष वसंत देडे, वंचित बहुजन आघाडी शहराध्यक्ष विशाल ठोंबरे, पानमंगरूळ शाखाध्यक्ष अनिल केंगारे आदी सहभागी झाले होते.

# नूतन मुख्याधिकारी डाके यांच्यासमोर विकासकामांचा दर्जा सुधारण्याचे आव्हान

**टेंडर कुणालाही मंजूर होवो... कामे मात्र त्याच ठेकेदाराकडे**

**तिजोरीवर भुर्दंड टाकणारी कामे रोखणे गरजेचे**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ जुलै-**

अक्कलकोटचे अंत्यत कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी यांची नुकतीच बदली झाली. रिअल इस्टेट क्षेत्रातील दिग्गजांना फार दु:ख झाले. नूतन मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी पदभार घेताच तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये फेरफटका मारला. अक्कलकोट तीर्थक्षेत्रामधील स्वच्छता उघडे दुकानांमधील मांस विक्री यामुळे नूतन मुख्याधिकारी डाके फारच प्रभावित झाल्याचे स्पष्ठ केले. मात्र अद्याप प्रभावित होण्याची नव्हे तर अंत्यत आश्चर्यचकित होण्याची अनेक गौप्यस्पोट असल्याचे शिवसेना जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे यांनी म्हटले आहे.



नगरपालिकेत रोजच वर्षानुवर्षे त्याच ठेकेदाराची असणारी मोठी उठबस, नपामध्ये सक्षम विरोधी पक्षाचा अभाव सत्ताधारी विरोधकाचे साटेलोटे यामुळे नपामध्ये कोट्यावधी रुपयांची विकासकामे होऊनही दर्जाहीन कामामुळे अक्कलकोट तीर्थक्षेत्र अद्याप सुधारीत खेडेच राहिले आहे. यामुळे नूतन मुख्याधिकाऱ्यांना विकासकामांचा दर्जा सुधारण सार्वजनिक स्वच्छता वारंवारची नपाला भुर्दंड ठरणारी ठेकेदारांना पोसणारी विकासकामांना चाप लावणे याचे मोठे आव्हान असणार आहे. अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकासाबाबत विकास कामाबाबत सूक्ष्म नियोजन प्रधान्यक्रम ठरविणे गरजेचे आहे. रस्ते कॉंक्रीट करायचे. नंतर पुन्हा खोदून पाणीपुरवठा पाईप टाकायचे मलमपट्टीचे वारंवारची कामे ठेकेदारांना पोसणारी मोठ्या प्रमाणात कामे झाल्याचा आरोप शिवसेना जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे यांनी केला आहे. शहरातील विकासकामाचे प्राधान्यक्रम ठरवा. नियोजन करा अनावश्यक वारंवारची कामे टाळा असे जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे यांनी म्हटले आहे. ठराविक ठेकेदारांच्या हातात पालिकेचा आजपर्यत कारभार झाल्याचा आरोप लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी केला आहे. टेंडर कुणालाही मंजूर झाले तरी कामे त्याच ठेकेदारांना मिळतात. यामुळे नपाची कामे अंत्यत उत्कृष्ठ दर्जाची एकाच दर्जाची होतात. कामाचा दर्जाच नसतो. टक्केवारीची लालूच ठेकेदार मंडळींनी भल्याभल्याना लावून अलगद कामाची बिले तात्काळ काढण्यात ठेकदार माहिर आहेत. हयात अक्कलकोट नपामध्ये सत्ताधारी विरोधक बाहेर कितीही सत्ता मिळवण्यासाठी तुटून पडले तरी सत्ता कुणाचीही येवो सत्ताधारी कोण विरोधक कोण हेच समजून येत नाही. विरोधक सत्ताधारी यांचे मोठे साटेलोटे असल्याचा आरोप वसंत देडे यांनी केला आहे. नूतन मुख्याधिकाऱ्यांच्या समोर ठेकेदाराचे चक्रव्यूह भेदण्याचे मोठे आवाहन असल्याचे म्हटले आहे.

### याकडे सगळ्यांचे लक्ष

नूतन मुख्याधिकारी रमाकांत डाके अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकासाबाबत प्राधान्यक्रम कशाला देतात. ठेकेदाराना पोसणारी कामे रोखतात का? विकासकामांचा दर्जा सुधारतात का? सार्वजनिक स्वच्छता, वटवृक्ष मंदिर परिसरात भाविकांना सुरक्षित येण्या-जाण्यासाठी रस्ते आपत्कालीन मार्ग यंत्रणा, सुरक्षितता याबाबत काय नियोजन करतात, याकडे अक्कलकोट शहरवासीयांचे लक्ष लागून राहिले आहे.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मोडनिंब रोटरीचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ३१ जुलै-**

रोटरी क्लब ऑफ मोडनिंबचा पदग्रहण समारंभ उत्साहात पार पडला. नूतन अध्यक्ष डॉ. संतोष दळवी, सचिव सुनील रेपाळ यांच्याकडे पदभार सोपवला.



अध्यक्षस्थानी मोहन देशपांडे होते. ॲड. विकास बेले, आनंद कानडे, सरपंच लक्ष्मीबाई पाटील होते. गत वर्षीचे अध्यक्ष औदुंबर पाटील, सचिव डॉ. सुहास खडके यांनी मागील वर्षाचा आढावा मांडला. अध्यक्ष संतोष दळवी व सचिव सुनील रेपाळ यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. चार्टर प्रदान करून पदभार दिला. आनंद कानडे यांनी पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट यावर आपले मनोगत व्यक्त केले. विकास बेले यांनी डीजीचा संदर्भ स मांडला. प्रास्ताविक औदुंबर पाटील, डॉ. सुहास खडके यांनी केले. सूत्रसंचालन सुनील पुरवत, मनोज शहा यांनी केले. आभार सचिव रेपाळ यांनी मानले. कार्यक्रमासाठी भारत शिंदे, शिवाजी कांबळे, कैलास तोडकरी, बाबुराव सुर्वे, चंद्रकांत गिड्डे, अनिल शिंदे, दत्तात्रय सुर्वे उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



## लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सागर सोनवणे

**पंढरपूर, दि. ३१ जुलै-**

पंढरपूर तालुक्यातील आणि पंढरपूर शहरालगतच असलेल्या सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून लक्ष्मी टाकळी ची ओळख आहे. उपसरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली यावेळी दोन उमेदवार उपसरपंच पदासाठी रिंगणात उतरले होते सत्ताधारी पार्टी कडुन सागर सोनवणे आणि विरोधी पक्षांकडून समाधान देठे यांनी अर्ज दाखल केले होते. यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत चे सरपंच संजय साठे आणि ग्रामविकास अधिकारी जयंत खंडागळे यांनी काम पाहिले. अतिशय चुरशीच्या लढतीत विरोधी पक्षाच्या उमेदवाराला पराभूत करून सागर सोनवणे यांची लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत उपसरपंच पदी निवड झाली यावेळी सागर सोनवणे यांना १० मते पडली तर विरोधी पक्षाच्या समाधान देठे यांना ०७ मते मिळाली. यावेळी निवडणूक अधिकारी यांनी जास्त मते घेतलेल्या सागर सोनवणे यांना विजयी घोषित केले. उपसरपंचपदी निवडीनंतर मा.जि.प सदस्य रामदास ढोणे व शिवसेना नेते महेश साठे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी सरपंच संजय साठे उपस्थित होते. लक्ष्मी टाकळी पंढरपूर शहराचा एक महत्वाचा भाग असून शहराजवळच या गावाचा विस्तार होत आहे. यामुळे गाव झपाट्याने विकसित होत आहे. भविष्यात मूलभूत सोयीसुविधा देवून लक्ष्मी टाकळीचा कायापालट करण्यासाठी माझ्या पदाच्या माध्यमातून काम करणार आहे. आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, स्वच्छ गाव सुंदर गाव यासाठी प्रयत्न करणार असल्याचे उपसरपंच सोनवणे यांनी सांगितले.

## वाढदिवस कार्यक्रमानिमित्त दिलीप माने यांची गावागावात एंट्री

### भरगच्च कार्यक्रम; रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३१ जुलै-**

माजी आमदार दिलीप माने समर्थकांनी वाढदिवसाचे औचित्य साधत दक्षिण विधान म तदारसंघातील प्रत्येक गाव आणि शहरातील प्रत्येक प्रभागात विविध स्पर्धेचे व शुभेच्छांचे डिजिटलच्या माध्यमातून माने यांची छबी पोहोचवत असून जणू यानिमित्त निवडणुकीसाठीची वातावरण निर्मिती करताना दिसत आहेत.

दक्षिण सोलापूरातून आगामी विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी माजी आ. माने दक्षिण तालुक्यातील सर्वच गावातील त्यांचे समर्थक रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, चित्रकला स्पर्धा, भजन स्पर्धा यासह महिलांसाठी सुध्दा विविध कला केसरीच्या स्पर्धा आयोजित करण्यात आले आहे. भंडारकवठेत मित्र परीवारांकडून सायकल आणि शाळकरी मुलांसाठी स्कूल बॅगेचे वाटप करण्यात येणार आहे. तेलगांव-भीमा येथे माजी सरपंच श्रीशैल पाटील, सादेपूर येथे बाजार समितीचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कुबसंगे, निंबर्गीत माने बँकेचे संचालक गंगाधर बिराजदार, विंचूरचे सरपंच बाळासाहेब पाटील यांनी देखील लोकोपयोगी कार्यक्रम ठेवला आहे. अकोले-मंद्रुप येथे सामाजिक कार्यकर्ते रमेश आसबे यांनी देखील विविध सामाजिक उपक्रम राबवत आहेत. मंद्रूप येथे युवा उद्योजक धनंजय म्हेत्रे व निंबर्गी येथे गंगाधर बिराजदार यांच्यामार्फत विविध कार्यक्रम व वहया वाटप, कंदलगाव माजी सरपंच रावसाहेब पाटील, गुंजेगाव येथे विकास पाटील आणि सरपंच मीरा साळुंखे यांनी वारकऱ्यांचे सत्कार करून त्यांना दिंडी साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे.

#### महिलांसाठी विविध स्पर्धा

माजी आ. दिलीप माने यांच्या वाढदिवसासनिमित्त रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, भावगीत, चित्रकला, विविध खेळ यासह म हिलांसाठी पाककला स्पर्धा आणि होम मिनिस्टर असे अनेक कार्यक्रम आयोजित करून विधानसभा निवडणुकीची रंगीत तालीमच माजी आमदार माने आणि त्यांचे समर्थक करताना दिसत आहेत.



माळकवठेत माजी जिल्हा परिषद सदस्य अप्पासाहेब काळे, होटगी आसिम शेख, इंद्रजित लांडगे, आसिफ मुल्ला यांनी विधायक कार्यक्रम ठेवला आहे. हत्तुर, फताटेवाडी सरपंच हरिश्चद्र राठोड, आहेरवाडी येथे योगीनाथ दिंडोरे आदी शेकडो समर्थक विविध समाजहिताचे उपक्रम राबवत आहेत.

तसेच सोलापूर शहरातील हद्दवाढ भागात नागेश बिराजदार यांनी नेहरू नगरसह अन्य भागात मोठ्या प्रमाणावर माजी आ. माने यांच्या हस्तेच वृक्षारोपण केला आहे. माने बँकेचे संचालक शावरप्पा वाघमारे, व्यंकटेश पोतू, भरत आकेन, प्रसाद कदम, शुभम माने, नितीन भोपळे, अक्षय वाकसे, प्रदीप सुरवसे, अनिल हिबारे, युवराज चव्हाण, राहुल जाधव, शैलजा राठोड, महेश घाडगे, विकास कदम, उदय पाटील, प्रवीण साबळे, रवि कांबळे, विनोद बागल, सोरेगावचे माजी नगरसेवक राजू पाटील, संतोष राऊत, सतिश मस्के, संजय बनसोडे, धीरज खंदारे, इरेश खुने, भिकाजी गाजरे, कलशेट्टी, राजू बगाडे, विनायक बिराजदार, नारायण भोपळे, आनंदराव देटे, शाम पाटील, सचिन चौधरी असे असंख्य माने समर्थक कार्यकर्ते राबत आहेत.



## विविध उपक्रमांनी आ. संजयमामा शिंदे यांचा वाढदिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ३१ जुलै-**

विठ्ठल कॉर्पोरेशन लि. म्हैसगांव (ता. माढा) चे संस्थापक चेअरमन व करमाळा-म ाढा तालुक्याचे आ. संजयमामा विठ्ठलराव शिंदे यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त बुधवारी विठ्ठल कॉर्पोरेशन येथे आरोग्य तपासणी, रक्तदान व वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आले. ४५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले व तसेच विठ्ठल कॉर्पो रेशन येथील प्रांगणामध्ये २५५ वृक्षांचे रोपण करुन कार्यक्रमास येणाऱ्या सर्व पाहुण्यांना व सर्व कामगारांना स्नेहभोजन देण्यात आले.

याप्रसंगी विठ्ठल कॉर्पोरेशनचे कार्यकारी संचालक यशवंतभैय्या शिंदे, वामन उबाळे, सुहास पाटील, पोपट गायकवाड, हनुमंत पाडुळे, विजयकुमार पाटील, आप्पा पाटील, आप्पासाहेब उबाळे, शहाजी शिंदे, लक्ष्मण लोंढे, श्रीपाद दळवे, रंगनाथ म ाळी, गणेश बागल, शरद भागवत, जयंत लंबटकर, कैलास भगत, संतोष उरमोडे, प्रताप उरमोडे, खंडु आलदर, विजय खताळ, राज जाधव, संतोष काळे, दयानंद घरबुडे, काकासाहेब गोयकर, आबासाहेब सुरवसे, माऊली बागल, संभाजी चौधरी, शंकर तांबे, बंडु देशमुख, दत्तात्रय जगताप, विक्रम महाडिक, नाम देव भोसले, नवनाथ जगदाळे, बाबू जगदाळे, शिवाजी सोनवने, गणेश महाडिक, दादासाहेब पाटील, प्रकाश तांबे, राहुल बरडे, हर्षल बागल, हेमंत शिंदे, अर्जुन शिंदे, सिध्दटेक एन्टरप्रायजेस चे चेअरमन गणेश गुरव व ऊस उत्पादक शेतकरी व ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार यांच्यासह विठ्ठल कॉर्पोरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर. एस. रणवरे, टेक्सटाईल विभागाचे असि. जनरल मॅनेजर एन. टी. साका, वर्क्स मॅनेजर आर. डी. भोसले, केन मॅनेजर सुनिल बंडगर, मुख्य वित्तीय अधिकारी भास्कर गव्हाणे, डिस्टीलरी मॅनेजर अनिल शेळके, परचेस अधिकारी कल्याण पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रदीपकुमार पाटील, सुहास वेदपाठक, एच. आर. मॅनेजर परमेश्वर माळी, सुरक्षा अधिकारी सचिन शिंदे यांच्यासह विठ्ठल कॉर्पोरेशन मधील विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# कामिका एकदशीमुळे दर्शनासाठी तेरमध्ये भाविकांची अलोट गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.३१ जुलै -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री संत गोरोबा काका मंदिरात कामिका एकदशीमुळे भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

श्री संत गोरोबा काका यांच्या मंदिरात पहाटे पासूनच दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. दिवसभर मिळेल त्या वाहनाने भाविक भक्त दर्शनासाठी येत होते. श्री संत गोरोबा काका यांच्या मंदिराकडे जाताना व मंदिरातून दर्शन घेऊन घराकडे जाताना वाहानांची रस्त्यावर दोन्ही बाजूला प्रचंड गर्दीमुळे वाहानांना व भाविक भक्त यांना मार्ग काढण्यासाठी कसरत करावी लागली.



वाहातूक नियंत्रण पोलिस यांनी एकादशी दिवशी वाहनांच्या बेशिस्तीमुळे भाविक भक्त यांना होणारा त्रास याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### ढगपिंपरी ग्रा.पं. सरपंचपदी प्रज्ञा काळे यांची बिनविरोध निवड

**परंडा, दि.३१ जुलै -**

परंडा तालुक्याचे लक्ष लागून राहिलेल्या मौजे ढग पिंपरी ग्रामपंचायतच्या सरपंचपदी प्रज्ञा बप्पा काळे यांची मंगळवार दि.३० जुलै रोजी बिनविरोध निवड झाली आहे. माजी सरपंच गुंफा मासाळ यांनी आपल्या सरपंच पदाचा राजीनामा दिला होता. ओबीसी महिला राखीव असलेल्या या रिक्त झालेल्या सरपंच पदाची निवड करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात सर्व सदस्यांची मंगळवारी विशेष सभा घेण्यात आली. सरपंच पदासाठी प्रज्ञा काळे यांचा एकमेव अर्ज आल्याने सभेस ७ सदस्यापैकी रामराजे काकडे, प्रज्ञा काळे, गुंफा मासाळ, चंपावती जाधव हे ४ सदस्य उपस्थित होते. तर ३ सदस्य गैरहजर होते. काळे यांचा एकमेव अर्ज आल्याने यावेळी त्यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक अधिकारी तथा मंडल अधिकारी आबासाहेब सुरवसे यांनी केली. तलाठी ज्ञानेश्वर गुळमिरे, व ग्रामसेवक रूपाली पडचांडे यांनी निवडणूक प्रक्रियेसाठी सहाय्य केले. यावेळी नूतन सरपंच प्रज्ञा काळे व बप्पा काळे यांचा सत्कार समर्थकांनी व ग्रामस्थांनी केला.



### मुरूम येथे शेळी पालन प्रशिक्षण कार्यक्रमाला सुरुवात

**मुरूम, दि.३१ जुलै -**

ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था धाराशिव आणि मुरूम येथील भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेच्या संयुक्त विद्यमाने शेळी पालन प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. शहरातील मुरूम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात बुधवार दि.३१ जुलै रोजी सदरील प्रशिक्षण सुरू झाले आहे. या प्रशिक्षणात महिला व पुरुष मिळून एकूण ३५ प्रशिक्षणार्थी सहभागी आहेत. प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थाचे संचालक मुकेशकुमार तसेच संस्थेचे प्रशिक्षक अवधूत पॉल यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना शेळी पालन व्यवसायबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच भारतीय स्टेट बँक मुरूम शाखाचे शाखा प्रमुख संजू जालिंदर यांनी शेळी पालन व्यवसायासाठी बँके मार्फत कर्ज पुरवठा बाबत माहिती सांगितले. आयोजित कार्यक्रमात बँकेचे विस्तार अधिकारी नितेश शेंडे, बँक सखी रिना महामुनी आदींनी पुढाकार घेतले.



### जिल्हा परिषद कन्या प्रशालेत शिक्षण सप्ताह साजरा

**तेर, दि.३१ जुलै -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळेत २२ जुलै ते २८ जुलै पर्यंत शिक्षण सप्ताह साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचा कला गुणांचा विकास करण्यासाठी सांस्कृतिक, क्रीडा, शैक्षणिक साहित्य, पायाभूत साक्षरता व संख्या ज्ञान, पाककृती, स्नेह भोजन अशा विविध सहशालेय उपक्रमात विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी आनंद लुटला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा कदम यांनी केले.सप्ताहातील प्रत्येक दिवशी घेतलेल्या उपक्रमाविषयी मालोजी वाघमारे यांनी माहिती सांगितली. सूत्रसंचलन सुशिल क्षिरसागर यांनी केले. पालक, शिक्षक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे ज्योती गाढवे यांनी आभार मानले. हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी काशीनाथ नरसाळे, प्रतिभा जोगदंड, पल्लवी पवार यांनी परिश्रम घेतले.



### शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी परमेश्वर किलजे

**जळकोट, दि.३१ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुलांची या शाळेच्या शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी परमेश्वर किलजे यांची दुसऱ्यांदा फेरनिवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी प्रवीण सगर यांची निवड करण्यात आली. जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळा व्यवस्थापन समिती निवडीसाठी पालक सभा घेण्यात आली. या पालक सभेत अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांची निवड करण्यात आली.

# सुधीर पाटील यांची घरवापसी; मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जुलै -**

धाराशिव येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आणि भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य सुधीर पाटील यांनी काल (दि.३०) मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या निवासस्थानी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला.

यावेळी त्यांचे आणि त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेमध्ये स्वागत केले.

१९८८ साली वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते त्यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश करून त्यांनी दोनदा विधानसभा निवडणूक लढवली.

तर २००९ साली त्यांनी लोकसभा निवडणूक प्रचार प्रमुख म्हणून धुरा सांभाळली होती. त्यांच्या शिवसेना प्रवेशामुळे धाराशिव जिल्ह्यातील शिवसेना अधिक मजबूत होणार असून स्थानिक पातळीवर शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न अधिक परिणामकारकरित्या सोडवता येतील असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी त्यांच्यासह त्यांचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# तुळजापूरातील विकास आराखडा कामाला विरोध

## मंदिर कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ जुलै -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान तर्फे होत असलेल्या प्रस्तावित विकास आराखडाला विरोध म्हणून एकदिवसीय लाक्षणिक उपोषण आंदोलन मंगळवार दि.३० रोजी मंदीर प्रशासकीय कार्यालयासमोर करण्यात आले.

या लाक्षनिक उपोषणात अशोक मगर, माधवराव कुतवळ, देवानंद रोचकरी, सचिन रोचकरी, विपीन शिंदे, बुबासाहेब पाटील, प्रा. धनंजय लोंढे, नागनाथ भांजी, जीवनराजे इंगळे, राहुल खपले, अमर चोपदार, अमोल कुतवळ, रुषी मगर, अजित क्षिरसागर, दत्ता धुमाळ, श्रीकांत धुमाळ, विजय भोसले, विशाल रोचकरी, किशोर गंगणे, चिन्मय मगर, विकास शिंदे, शुभम क्षिरसागर, अण्णासाहेब क्षिरसागर, अविनाश गंगणे यांच्यासह आदिंनी यात सहभाग नोंदवला.

# भागवतेश्वर बेळे यांना धर्मप्रचारक पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.३१ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील किलज येथील शिव कथाकार व गेल्या अनेक वर्षापासून धर्मप्रचाराचे कार्य करणारे शि.भ.प., परमपूज्य श्री. भागवतेश्वर बेळे महाराज यांचा औसा येथील हिरेमठ संस्थांनच्यावतीने धर्मप्रचारक हा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

औसा येथील हिरेमठ संस्थानचा ८४ वा वार्षिक महोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त शिवदिक्षा सोहळयाचे आयोजन करण्यात आले. या वार्षिक महोत्सव कार्यक्रमात भागवतेश्वर महाराज बेळे यांना उज्जैन पीठाचे जगद्गुरु श्री. श्री.श्री. १००८ सिद्धलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते धर्मप्रचारक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# तेर येथे साथरोगाचा फैलाव; आरोग्य यंत्रणाकडून तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.३१ जुलै -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे साथरोगाचा फैलाव झाला असल्याने आरोग्य विभागाच्या वतीने घरोघरी जाऊन पाण्यासाठयाची तपासणी करून अबेट टाकून निर्जंतुकीकरण करण्यात येत आहे.

धाराशिव तालुक्यातील तेर येथे कोंदट वातावरण असल्याने ताप, सर्दी, खोकला या रोगाचे प्रमाण वाढते असून रुग्न ग्रामीण रुग्णालय व खाजगी दवाखान्यात मोठ्या प्रमाणात उपचार घेत आहेत.

आरोग्य विभागाच्या वतीने साथरोगाचा फैलाव होऊ नये म्हणून तेर येथे घरोघरी जाऊन जागजी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय



अधिकारी डॉ. श्याम पाटील, डॉ. प्राची माळी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी आरोग्य सहाय्यक मानाजी नागलबोणे, संतोष खुणे, प्रकाश शिरसाट, शर्मिला ठवरे, संगिता डोलारे, राणी शिराळ, कविता आंधळे, दैवशाला भोरे, पुष्पा झिंजे, सुषमा सरवदे, लतिका कोरबु, राणी वाघ, रेश्मा नान्नजकर, रेखा पागरकर, स्वाती पवार, मिरा गाढवे, पोर्णिमा झाडे घरोघरी जाऊन पाण्याचे साठे तपासून निर्जंतुकीकरण होण्यासाठी अबेट पाण्यात टाकत आहेत.



# महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाची नुतन कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.३१ जुलै -**

जि.प. प्राथमिक शाळा, शेलगाव (दि.) येथे कार्यरत असलेले सुधीर देशमुख यांची महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या कळंब तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

त्यावेळी त्यांचा शेलगाव (दि.) येथील प्राथमिक शाळेमध्ये सत्कार करण्यात आला. शिक्षक संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे, जिल्हा अध्यक्ष संतोष देशपांडे, उपाध्यक्ष अनिल बारकुल यांच्या मार्गदर्शनाखाली कळंब तालुका संघाच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. संघाच्या कळंब तालुकाध्यक्ष म्हणून प्रशांत घुटे यांची निवड करण्यात आली. तालुका कार्यकारिणीमध्ये अध्यक्षपदी प्रशांत घुटे, नेते म्हणून गणेश कोठावळे, कार्याध्यक्षपदी महादेव मेनकुदळे, सरचिटणीसपदी संतोष लिमकर, कोषाध्यक्षपदी प्रशांत निन्हाळ, संपर्क प्रमुख म्हणून संतोष मोहीते, संजय गरड, प्रसिद्धी प्रमुखपदी मुकुंद नांगरे, अविनाश खरडकर, प्रवक्तेपदी सचिन तामाने, अविनाश पवार, उपाध्यक्षपदी सुधीर देशमुख, राजाभाऊ गुंजाळ, विजयसिंह रणखांब, हरिदास पांचाळ, ढेपे, प्रदिप येडके, सचिन पवार, रामहरी कांबळे, गोकुळदास मैंदाड यांची निवड करण्यात आली.

या निवडीबद्दल शाळेचे मुख्याध्यापक रवि शिनगारे व शिक्षक वृंद यांनी सत्कार करून अभिनंदन केले.

# चार वर्षाच्या बालिकेवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशी द्या

## दि लॉर्ड बुद्धा रिलिजियसची निवेदनाद्वारे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३१ जुलै -**

शहरातील चार वर्षाच्या बलिकेवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा पीडित बलिकेला व कुटुंबाला जलद न्याय देऊन शासन स्तरावरून आर्थिक मदत देण्यात यावी या मागणीचे निवेदन बुधवारी (दि.३१) रोजी समस्त बौद्ध समाज व दि लॉर्ड बुद्धा रिलिजियस अँड चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने देण्यात आले आहे.



तहसीलदार डॉ. अमित भारती, रतन काजळे यांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, उमरगा शहरात एका चार वर्षीय बलिकेवर एका नराधमांने अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला असून त्यात मुलगी जखमी झाली असून नागरिकांच्या सतर्कतेमुळे सदरील आरोपीचे गैरकृत्य उघडकीस आले आहे. हा आरोपी अनिल देवेंद्र कांबळे हा पर राज्यातील असून याच्यावर जलद गती न्यायालयात खटला चालवून फाशीची शिक्षा देण्यात यावी व पीडितेस आर्थिक मदत मिळवून द्यावी असे म्हटले आहे.

या निवेदनावर ट्रस्टचे कोषाध्यक्ष कैलास शिंदे, रिपाइंचे नेते हरिष डावरे, एस.के. कांबळे, बाबा गायकवाड, गुणरत्न भालेराव, शहाजी मस्के, दगडू भोसले, दत्ता गायकवाड, दत्तात्रय कांबळे, जगन्नाथ कांबळे, उमाजी गायकवाड, अॅड. हिराजी पांढरे, एस.आर. गायकवाड, अभिमन्यू भोसले, धीरज बेळंबकर, डी.टी. कांबळे, संजय कांबळे, किशोर नाईकवाडे, वैजीनाथ सूर्यवंशी यांच्यासह आदींच्या सह्या आहेत.



कारवाई न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा...

# गोरक्षकांचे उपोषण तिसऱ्या दिवशी लेखी आश्वासनानंतर स्थगित

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जुलै -**

जिल्ह्यातील सर्व गोशाळा, संस्था चालक, जिल्ह्यातील सर्व गोरक्षक, सर्व हिंदुत्ववादी संघटना, यांच्या वतीने अमरण उपोषण दि.२९ जुलैपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पाच जणांनी अमरण उपोषण सुरू केले होते. आज दि.३१ जुलै रोजी प्रशास माने लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषणकर्त्यांनी उपोषण सोडले आहे. तर १५ ऑगस्ट रोजी सामूहिक आत्मदहनाचा करण्याचा इशारा देखील यावेळी दिला आहे.

यावेळी नवजीवन गोशाळेच्या वैशाली बारकुल, प्रशांत मगर, गणेश सदाफुले, भाऊसाहेब तंबिले, रोहित बागल, चेतन माने, ज्योतिबा मुळे, सुदर्शन पंडित, ज्ञानराज गुंड, अभिजीत कदम, सुरत गायकवाड उपोषणास्थळी उपस्थित होते.

# माजी नगराध्यक्षाच्या स्टोनक्रेशरवर चोरट्यांचा डल्ला; दोघे पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ जुलै -**

येथील लातुर रस्तावर असणाऱ्या काक्रंबा शिवारातील कणे स्टोन क्रेशर केंद्रातुन ४ लाख २२ हजार रुपयाचे साहित्य छोट्या हत्तीमध्ये चोरुन नेत असताना चोरट्यांनी तिथे जवळ असणाऱ्या मंडळी वाहनावर दगडफेक केली. यात दोघे जण जखमी झाले असुन वाहानांचे नुकसान झाले आहे. यावेळी वाहनाला धडक देवुन पळुन जात असताना दोघांना पकडले व चारजण पळुन जाण्यात यशस्वी झाले. ही घटना सोमवार दि.२९ रोजी रात्री १०.३० वा. घडली या घटनेने परीसरात खळबळ उडाली असुन व्यवसायीकामध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

याबाबत माहिती अशी की, तुळजापूर शहरापासुन सहा किलोमीटर अंतरावर तुळजापूर नगरीचे नगराध्यक्ष बापुसाहेब कणे यांचा मुलगा अक्षय चंद्रकांत कणे यांचे स्टोन स्केशर व विटभटटी आहे. सोमवार दि.२९ रोजी रात्री १०.३० वाजण्याचे सुमारास या खडी स्केशर अक्षय कणे आण्णासाहेब राजकुमार कणे व मॅनेजर दयानंद धोंडीबा जगदाळे असे काम करीत असताना आमचे बाजुलाच छोटा हात्तीमध्ये सहा लोक चोरी करण्याच्या उद्देशाने स्टोन स्केशरचे स्पेएरपार्ट वाहनामध्ये भरत असल्याचे दिसल्यानंतर तेथे जवळ गेले असता त्या काही लोकांनी दगड फेकून मारले. मॅनेजर दयानंद जगदाळे याला छातीवर, पोटावर दगड लागले व चार चाकी गाडी (एमएच २५/के १०१०) च्या काचा फुटल्या. तेंव्हा चोरट्यांनी छोटा हात्तीमध्ये सामान भरुन चारचाकी वाहनाला जोरात धडक मारुन तेथुन निघुन गेले. तेथे उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांनी गाडीचा पाठलाग केला. छोटा हात्ती काक्रंबा गावाकडे जात असताना जगदाळे यांनी सुदाम भिसे, तानाजी खांडेकर यांना फोन करुन सर्व प्रकार सांगितला. सुदाम भिसे, तानाजी खांडेकर यांनी काक्रंबा गावात मोटर सायकल आडव्या लावल्या असता छोटा हात्तीने मोटर सायकलला धडक देवुन बंद पाडुन थोडे अंतरावर जावून थांबला. त्यानंतर दोन व्यक्तीना पकडले व चार लोक पळुन गेले. पकडलेल्या दोन व्यक्तीचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्याचे नावे स्वराज बाळासाहेब कांबळे (रा.हाडको) व राहुल विष्णु शिंदे (दोघे रा. मांतग नगर, शुक्रवार पेठ तुळजापुर) असे असल्याचे सांगितले. तसेच पळुन गेलेले साहिल सुनिल




साठे, कुमार गुणवंत लोंढे, कुमार शंकर पौळ, दिनेश बब्रुवान कसबे (सर्व रा. मातंग नगर तुळजापुर) असे असल्याचे सांगितले.

सदरील दोना आरोपींना तुळजापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून वरील चोरट्यांवर जबरी चोरी, मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्षपदी काटीचे सयाजीराव देशमुख यांची निवड

**परंडा, दि.३१ जुलै-**

धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी तुळजापूर तालुक्यातील काटी गावचे भूमिपुत्र तथा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते सोसायटीचे माजी चेअरमन सयाजीराव विजयसिंह देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. माजी मंत्री अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांच्या प्रमुख उपस्थित जिल्हाध्यक्ष ॲड.धीरज पाटील यांनी लातूर येथील काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात निवडीचे पत्र दिले असून, यावेळी तुळजापूर काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रामचंद्र अलुरे तसेच काटीचे उपसरपंच जुबेर शेख, प्रगतशील शेतकरी प्रदीप साळुंके, चंद्रकांत काटे, भैरीनाथ काळे, प्रकाश गाटे, रामहरी लोंढे, तानाजी हजारे, आबा गाढवे आदीसह काटीगावचे मान्यवर मंडळीसह महाविकास आघाडीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते . या निवडीमुळे धाराशिव जिल्हा काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यात आनंदाचे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र सयाजीराव देशमुख यांचे अभिनंदन होत आहे. काटी गावचे हे भूमिपुत्र काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून जिल्हाभरात तसेच मराठवाड्यात ही ओळखले जातात. त्यांनी संजय गांधी निराधार योजना कमिटीचे सदस्य म्हणून तर सोसायटीचे चेअरमन पदीही काम केले आहे ते सध्या कुलस्वामिनी सहकारी सुतमीलचे विद्यमान संचालक आहेत त्यांची काँग्रेस पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी झालेल्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे. येणाऱ्या तुळजापूर विधानसभा निवडणुकीत ही जागा महाविकास आघाडीत काँग्रेस पक्षाला सुटली तर काँग्रेसचे सच्चे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून काँग्रेस कोर कमिटी तुळजापूर विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी काटीचे भूमिपुत्र सयाजीराव विजयसिंह देशमुख यांच्या उमेदवारीचा विचार करू शकते अशी चर्चा जिल्हा भरातून होत आहे.



### शेखापुरचे सरपंच अतिक शेख यांचा वंचित बहुजन आघाडीत प्रवेश

**भूम, दि.३१ जुलै-**

वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष प्रवीण दादा रणबागुल यांच्या भूम परंडा वाशी तालुक्यातील झंजावात पाहता त्यांच्यावर विश्वास ठेवून शेखापुर येथील सरपंच अतिक शेख यांनी वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश केला. त्यांचा मराठवाडा उपाध्यक्ष प्रविण रणबागूल यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. यावेळी बोलताना पक्ष वाढीसाठी वेळ देऊन कार्य करणार असल्याचे अतिक शेख म्हणाले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हा उपाध्यक्ष वैभव गायकवाड, तालुकाध्यक्ष अक्षय गायकवाड, भूम शहराध्यक्ष रोहित गायकवाड यांच्यासह शेखापुर शाखाध्यक्ष सादिक सय्यद, विनोद हिवरे, प्रशांत दोडके, रवी गिलबिले, रहिम शेख, अनवर शेख, यासीन शेख, मजनू पठाण, फैयाज शेख, तोफिक शेख यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.



### सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार सोहळा

**मुरुम, दि.३१ जुलै-**

मुरूम येथील नगर शिक्षण विकास मंडळाने संस्थेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना स्वातंत्र्य दिल्याने या संस्थेतून गुणात्मक व दर्जात्मक विद्यार्थी घडले आहेत, नवीन शैक्षणिक धोरणात तंत्रकौशल्य आधारित अभ्यासक्रम आल्याने विद्यार्थी व पालकांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून शिक्षण घेणे आवश्यक आहे असे मत उमरगा गट शिक्षण अधिकारी शिवकुमार बिराजदार यांनी मुरूम येथे व्यक्त केले.नगर शिक्षण विकास मंडळ संचलित प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यरत असलेल्या प्राचार्य महानंदा रोडगे, प्रा.डॉ.रमाकांत पाटील, सहशिक्षक कांत सोमवंशी, शिवानंद पाटील यांचा सेवानिवृत्तीबद्दल संस्थेकडून सेवापूर्ती सत्कार सोहळा बुधवारी (ता.३१) रोजी प्रतिभा निकेतन विद्यालयात पार पडला. यावेळी गट शिक्षण अधिकारी बिराजदार यांनी आपल्या भाषणात मत व्यक्त केले.

### राज ठाकरेंच्या इंद्रप्रस्थवर भूम-परंडा-वाशीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

**वाशी, दि.३१ जुलै-**

मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार मनसे नेते नयन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात भूम-परंडा-वाशी विधानसभा मतदारसंघातील सर्व पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक इंद्रप्रस्थ कार्यालय वाशी येथे घेण्यात आली. यावेळी बैठकीला हेमंत



कांबळे (प्रवक्ता, विभाग अध्यक्ष) दिनेश साळवी (विभाग अध्यक्ष) अवधूत चव्हाण (उपाध्यक्ष) यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच जिल्हा अध्यक्ष राजेंद्र गपाट वाशी तालुकाध्यक्ष अक्षय चेडे, भुम तालुकाध्यक्ष बाळू भुईंगल, विद्यार्थी सेना अध्यक्ष राज कवडे, कामगार सेना जिल्हा चिटणीस अजय तांबिले, सुमित उंदरे, आशिष शिंदे, सुजित कवडे, संतोष चेडे, शंभू गायकवाड, आदित्य चेडे, रोहन उंदरे, योगेश शिंदे, कुणाल विभुते, गोपाळ घोगरे व सर्व पदाधिकारी व सहकारी उपस्थित होते.

# नळदुर्ग पोलिसांनी महामार्गावर पकडला १ कोटी ५ लाखाचा गांजा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ जुलै-**

उमरग्याहुन सोलापुरकडे जाणाऱ्या स्कार्पिओ गाडीतुन १ कोटी ५ लाख ७८ हजार ८०० रुपयाचा गांजा नळदुर्ग येथील राजा बागसवार दर्गाहसमोर राष्ट्रीय महामार्गवर नळदुर्ग पोलिसांनी मोठ्या शिताफीने पकडला आहे. नळदुर्ग पोलिसांच्या या कारवाईचे सर्व स्तरातुन स्वागत होत आहे.

सोलापुर -हैद्राबाद राष्ट्रीय महाम ार्गवरून नेहमीच गांजासाह गुटख्याची कायम तस्करी सुरु असते. दि. ३० जुलै रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुम ारास नळदुर्ग पोलिसांची रात्री राष्ट्रीय महामार्गावर गस्त सुरु होती यावेळी उमरग्याहुन सोलापुरकडे भरधाव वेगात स्कार्पिओ गाडी क्र. एम. एच. ०८ झेड ५६८४ ही जात असताना पोलिसांना संशय आल्याने त्यांनी नळदुर्ग येथील



राष्ट्रीय महामार्गवर ही गाडी अडविली. गाडी थांबल्यानंतर गाडीची तपासणी केल्यानंतर गाडीत मोठ्याप्रमाणात गांजा आढळून आला. यावेळी अतिष राजकुम ार माने याला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर हा गांजा आपण सोलापुरला घेऊन जात असल्याचे सांगितले. त्यांचबरोबर त्याच्याकडे चौकशी केले असता यामध्ये भीमराव दिलीप खडसुळे, राम दिलीप खडसुळे, डी.जे.चहाविक्रेता, कळवे, रवी सर्व रा.सोलापुर व राहुल रा. अहमदनगर हे यामध्ये सहभागी असल्याचे निष्पन्न झाले. या सर्व आरोपीवर नळदुर्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन यातील अतिष राजकुमार माने याला अटक करण्यात आली आहे.

स्कार्पिओ गाडीतुन पोलिसांनी एकुण ५२८ किलो गांजा जप्त केला आहे त्याची किमत १ कोटी ५ लाख ७८ हजार ८०० रुपये इतकी किमत आहे. गांजा व स्काकर्पिओ गाडी असा एकुण १ कोटी १५ लाख ७८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अलीकडच्या काळात राष्ट्रीय महामार्गवर इतक्या मोठ्या किमतीचा गांजा पकडण्याची ही पहिलीच वेळ आहे.याबाबतचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक कांगुने हे करीत आहेत. कारवाई नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे, सहाय्यक पोलिस निरीक्षक कांगुने, सुरज देवकर आटुळे, पोलिस उपनिरीक्षक ईश्वर नांगरे, गिते यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी केली आहे.

## सोलापूर- तुळजापुर-धाराशिव रेल्वेमार्गासाठी संपादित जमीनीचा मावेजा थेट खरेदीप्रमाणे द्या:खा.राजेनिंबाळकर

**धाराशिव, दि.३१ जुलै-**

लातूर- मुंबई, या गाडीस कळंब रोड (तडवळा) व नांदेड- पनवेल या गाडीस ढोकी येथे थांबा देण्यासह सोलापूर- तुळजापुर- धाराशिव रेल्वे मार्गाकरीता जमीनीचे भुसंपादन ८० टक्के पुर्ण करुनच रेल्वे मार्गाची निविदा काढण्यात यावी अशा मागण्या खासदार ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी लोकसभेत केली.

धाराशिव -तुळजापूर - सोलापूर या रेल्वे मार्गाकरीता संपादित केलेल्या जमीनीचा मावेजा आकांक्षीत जिल्हा म्हणून थेट खरेदी प्रस्तावाप्रमाणे शेतकऱ्यांना द्यावा. या रेल्वे मार्गाचे भुसंपादन ८० टक्के पुर्ण झालेले नसतानाही रेल्वे मार्गाचे टेंडर काढण्याच्या हालचाली सुरु असल्याची बाब खा. ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी निदर्शनास आणुन दिली.

कोरोना महामारीमध्ये जेष्ठ नागरीक, दिव्यांग, पत्रकार यांसाठी असणाऱ्या रेल्वेच्या सवलती पुर्ववत सुरु कराव्यात, लातूर- म ुंबई, बिदर-मुंबई रेल्वे गाडयांना अतिरिक्त जनरल डब्बे जोडावेत,या दोन्ही गाडयांमध्ये मोठया प्रमाणात प्रवाश्यांची ये जा सुरु असते त्यामुळे रेल्वे गाडयांचे जनरल डब्बे ओव्हर क्राऊड असतात. त्यामुळे धाराशिव व बार्शी स्थानकावरुन जनरल बोगीने प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांना जागा मिळत नाही. दोन्ही गाडयांना जनरल बोगीची संख्या वाढवण्यात यावी अशा मागण्या खासदार राजेनिंबाळकर यांनी यावेळी केल्या.

## अबकी बार सिर्फ रोजगार हाच जाहीरनामा राबवण्याची गरज : ॲड.भोसले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जुलै-**



देशातील बेरोजगारी हा कधीही फुटू शकणारा टाईमबॉम्ब असून वेळीच त्याबाबत उपाययोजना न केल्यास देशातील कुटुंब व्यवस्था तसेच सामाजिक आणि आर्थिक जीवन उध्वस्त होईल त्यामुळे आता अबकी बार सिर्फ रोजगार हेच धोरण राबवण्याची गरज असल्याचे स्पष्ट मत समाजवादी पार्टीचे प्रदेश महासचिव तथा प्रवक्ते ॲड.रेवण भोसले यांनी व्यक्त केले आहे.

देशात दरवर्षी हजारोंच्या संख्येने लोक मोठ्या उमेदीने व्यवसाय सुरू करण्याचा प्रयत्न करतात. परंतु बरेच जण एक-दोन वर्षात व्यवसाय बंद पडून कर्जाच्या सापळ्यात अडकतात. त्यामुळे नोकरी देणारे बना... या वाक्याच्या सापळ्यात न अडकता हाताला काम देणे, ही शासनाची जबाबदारी आहे, हे तरुणांनी सरकारला ठणकावून सांगायला हवे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये अबकी बार सिर्फ रोजगार हाच जनतेचा जाहीरनामा असला पाहिजे आणि त्यावर सर्व राजकीय पक्षांना भूमिका घ्यायला भाग पाडले पाहिजे, असे ड भोसले यांनी म्हटले आहे. रस्ते, रेल्वे, पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, शिक्षण, आरोग्य पर्यावरण रक्षण, याच्याशी निगडित ग्रीन टेक्नॉलॉजीमध्ये भविष्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागणार आहे. यातील नफ्याचे प्रमाण कमी असणार आहे. त्यामुळे सरकारनेच या क्षेत्रात गुंतवणूक करून रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, त्याचबरोबर शेतीतील गुंतवणूक वाढवावी. बेरोजगारीच्या समस्या अतिशय गंभीर बनली असून त्यावर वेळीच उपाययोजना न केल्यास म हाराष्ट्रातील तरुण सरकारच्याविरुद्ध पेटून उठल्याशिवाय राहणार नाही असे स्पष्ट मतही भोसले यांनी व्यक्त केले.

# धाराशिव जिल्ह्यात आज महसूल दिनापासून महसूल सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जुलै-**

धाराशिव जिल्ह्यात १ ऑगस्ट या म हसूल दिनापासून १ ते ७ ऑगस्ट २०२४ दरम्यान महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.या सप्ताहादरम्यान विविध घटकातील नागरिकांसाठी शिबिरे,उपक्रम व महसूल अदालती आयोजित करण्यात येणार आहे.विविध योजनांची नागरिकांना माहिती देऊन म हसूल विभागात कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

१ ऑगस्ट २०२४ रोजी महसूल दिनाचे आयोजन करून महसूल सप्ताहाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मि ळण्यासाठी अर्जदारांना राज्याचे अधिवास प्रमाणपत्र /जन्म दाखला सक्षम,सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंबप्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड,आधारकार्ड इत्यादी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ अधिकाधिक महिलांना मिळावा यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे त्यांना तातडीने उपलब्ध व्हावी यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज पोर्टल/मोबाईल ॲप/ सेतू सुविधा केंद्र येथून ऑनलाईन भरण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.या योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक असणारी काही कागदपत्रे, दाखले आपले सरकार पोर्टलद्वारे, महा-ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रदान करण्यात येतात.या योजनेच्या अनुषंगाने लाभार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान म हामंडळाशी समन्वय साधून पोर्टल व डेटा सेंटर सुरळीतपणे सुरू राहील. या योजनेअंतर्गत अर्ज करण्यासाठी सरकार सेवा केंद्र/ई-सेवा केंद्र/सेतू केंद्र/तहसील कार्यालय इत्यादी ठिकाणी उपस्थित राहणाऱ्या महिला अर्जदारांना आणि त्यांच्या प्रतिनिधींना मदत व सहकार्य करण्यात येणार आहे. २ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री सेवा कार्य प्रशिक्षण योजनेबाबत युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्याची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी या योजनेचा लाभ अधिकाधिक युवकांना प्राप्त व्हावा,यासाठी अधिवास प्रमाणपत्र,आधार कार्ड इत्यादी आवश्यक असणारी कागदपत्रे त्यांना तातडीने उपलब्ध व्हावीत यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.यासाठी आवश्यकतेनुसार मनुष्यबळ देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ३ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना - सर्वसामान्य ज्येष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थस्थळांना जाऊन मनशांती तसेच अध्यात्मिक पातळी गाठणे सुकर व्हावे यासाठी सर्व धर्मातील ज्येष्ठ नागरिक जे ६० वर्ष किंवा त्याहून अधिक वयाचे आहे,त्यांना राज्य आणि देशातील तीर्थस्थळांना मोफत भेटीची दर्शनाची संधी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेतून मिळणार आहे.या योजनेच्या लाभासाठी अर्जदारांना राज्याचे अधिवास प्रमाणपत्र,जन्म दाखला सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड,आधार कार्ड इत्यादी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ अधिकाधिक ज्येष्ठ नागरिकांना प्राप्त व्हावा यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. या योजनेचे अर्ज पोर्टल/ मोबाईल प/सेतू सुविधा केंद्र येथून भरण्याची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ अधिकाधिक ज्येष्ठ नागरिकांना प्राप्त व्हावा,यासाठी विशेष कक्ष तयार करून अर्ज भरण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन आणि सहकार्य करण्यात येणार आहे. सेतू केंद्र आणि तहसील कार्यालय येथे उपस्थित राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना आणि त्यांच्या प्रतिनिधींना योग्य ते मदत आणि सहकार्य करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री वयोश्री योजनेबाबत जिल्हा, तालुकास्तरावर व्यापक प्रसिद्धी देऊन त्याची जनजागृती निर्माण करण्यात येणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने संबंधित विभागासोबत समन्वय साधून योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत. या योजनेसाठी आवश्यक असलेले उत्पन्नाचे दाखले शासनामार्फत ओळख पटविण्यासाठी विहित केलेले अन्य कागदपत्रे संबंधित लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ४ ऑगस्ट - स्वच्छ व सुंदर माझी कार्यालय -यासाठी विशेष म ोहीम राबवून जिल्हास्तरावरील,तालुका स्तरावरील,मंडळ स्तरावरील व ग्राम स्तरावरील कार्यालयाची व परिसराची साफसफाई करण्यात येणार आहे.

कार्यालयाचे अभिलेख व दस्तऐवज यांचे वर्गीकरण व व्यवस्थापन निंदनीकरण व महत्त्वाच्या दस्तऐवजांचे स्कॅनिंग व संगणकीकरण करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. सेवा हक्क अधिनियमानुसार अधिसूचित सेवा,यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे,शुल्क सक्षम, सक्षम प्राधिकारी इत्यादी माहिती दर्शवणारे फलक अद्यावत करण्यात येणार आहे.शासनाच्या विविध योजनांची माहिती देखील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे. विविध कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या विभाग प्रमुख/कर्मचारी यांची नावे व संपर्क असलेले फलक व माहिती पुस्तके अद्यावत करण्यात येणार आहे.कार्यालयातील अनावश्यक फर्निचर,कागदपत्रे विहित कार्यपद्धत अवलंब दुरुस्त व आवश्यकतेनुसार नष्ट करण्यात येणार आहे. ५ ऑगस्ट - सैनिक हो तुमच्यासाठी राष्ट्रीय सुरक्षिततेच्या कामी सीमावर्ती भागामध्ये व सुरक्षिततेच्या दृष्टीने अन्य संवेदनशील भागांमध्ये तैनात असणारे संरक्षण दलातील अधिकारी,सैनिक यांना व त्यांच्या कुटुंबीयांना आवश्यक असणारे,महसूल कार्यालयाकडून निर्गमित होणारे विविध दाखले/ प्रमाणपत्रे मिळणेबाबत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी किंवा समादेशक अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार आहे. संरक्षण दलात कार्यरत असताना शहीद झालेल्या कर्मचाऱ्यांना जमीन वाटप करण्याबाबत प्रलंबित असलेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच संरक्षण दलातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी कर्मचारी यांना घरासाठी / शेतीसाठी जमीन वाटपाबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात येणार आहे. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयाशी समन्वय साधून संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांचे महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यात येणार आहे.

६ ऑगस्ट - एक हात म दतीचा- दिव्यांगाच्या कल्याणाचा दिव्यांग व्यक्तीकरिता शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमांची माहिती या दिवशी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शासनाच्या विविध विभागातील योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या व महसूल विभागाशी संबंधित विविध दाखले/प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

विविध योजनेअंतर्गत येणाऱ्या लाभांच्या अनुषंगाने जिल्हा/ तालुकास्तरावर शिबिराचे आयोजन करून स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने उपकरणांचे वाटप करण्यात येणार आहे. अनाथ मुले -मुली आई-वडील मृत्युमुखी पडल्यामुळे अनाथ झालेली व कोणत्याही शासकीय/ निमशासकीय/शासन अनुदानित अनाथ आश्रमात न राहणारे मुले मुली यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने अनाथ असल्याचे तलाठी व ग्रामसेवक यांचे व संबंधित म हिला व बाल विकास अधिकारी यांचे प्रम ाणपत्र देण्याच्या अनुषंगाने विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.तसेच अनाथ म ुलांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळण्याच्या अनुषंगाने या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांची आवश्यकतेनुसार म दत घेण्यात येणार आहे.

७ ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील कार्यरत,सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी यांना पुरस्कार देण्यात येणार आहे. या दिवशी महसूल सप्ताहाचा समारोप करण्यात येणार आहे. उत्कृष्ट काम करणाऱ्या उपजिल्हाधिकारी, तहसीलदार,नायब तहसीलदार, अव्वल कारकून,मंडळ अधिकारी, महसूल सहाय्यक,तलाठी,पोलीस पाटील व कोतवाल यांचा उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी म्हणून गौरव करण्यात येणार आहे. जिल्ह्यात कार्यरत असलेला सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी कर्मचारी यांच्या विविध प्रलंबित सेवाविषयक बाबी निकाली काढण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालय,उपविभागीय अधिकारी व तहसील कार्यालय तहसीलदार यांनी व्यक्तिशा त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या निकाली काढण्याच्या दृष्टीने संबंधितांना सूचना देऊन आवश्यक ते मार्गदर्शन करणार आहे.

महसूल यंत्रणेकडून विविध कार्यक्रम ाच्या सात दिवसाच्या आयोजनातून म हसूल सप्ताहाचा समारोप करण्यात येणार आहे. तहसील कार्यालयामध्ये महसूल दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन नागरिकांना विविध योजनांचा लाभ घेण्याच्या दृष्टीने अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**जाहीर प्रकटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणीय/कावि-** **दिनांक २५/०७/२०२४**

समस्त गावकरी मौजे. उमरगा ता.उमरगा जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात अर्जदार महेबुब इसाक हलसंगी रा. महात्मा गांधी विद्यालय पाठीमागे उमरगा ता.उमरगा जि. धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नावः महेबुब इसाक हलसंगी

सदरील व्यक्तीचा मौजे. उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव या ठिकाणी दि. ०५/०६/१९८८ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक. १४/०५/२०२४ रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार**

**जाहीर प्रकटन**

सोलापुर व परिसरातील तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे आशिल सोनल महावीर मुथा रा. माणिक चौक, धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी मुमताज शफी अहमद मुल्ला रा. सोलापुर यांच्या स्वः कष्टार्जीत खरेदी मालकी व कबजेवहिवाटीची मौजे नान्नज ता. उत्तर सोलापुर जि. सोलापुर येथील जमिन गट नं. ७८/२ मधील क्षेत्र ०० हे ४१ आर, आकार ०० रु. ३२ पैसे वर नमुद मिळकत तदंगभूत वस्तुसह जमिन रितसर हस्तांतरण होणार असुन वर नमुद मिळकती व क्षेत्रफळाबाबत कोणाचे कांही हक्क, अधिकार, वारसाहक्क तसेच सदर खरेदीबाबत कोणाचा कांही आक्षेप हार-हारकत, उझर, बोजा, चोळी बांगडी, येणे देणे, गहाणखत, करार, इत्यादी अथवा इतर मार्गाने सदर मिळकतीवर कोणास कोणत्याही प्रकारचा आक्षेप तसेच आपला कायदेशीर हक्क वा अधिकार सांगावयाचा झाल्यास सदर जाहिर प्रगटन प्रस्तुत झाल्यापासुन १५ दिवसांच्याआत प्रस्तुत जाहिर प्रगटन देणार किंवा विधिज्ञ यांचेशी संपर्क साधुन तुमचा आक्षेप / हक्क सक्षम पुरावा, कागदपत्र, इतर ही कांही असल्यास प्रत्यक्ष सादर करावे व निरसन करावे. अन्यथा वर नमुद मुदतीत कोणत्याही प्रकारचे आक्षेप न आल्यास कोणाचे ही काही हरकत वा हक्क संबंध नाही असे समजुन आमचे आशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतरचे कोणतेही हरकत आक्षेप तसेच हित संबंध उद्भवल्यास त्याची कोणतीही कायदेशीर जबाबदारी आमचे आशिलावर बंधनकारक असणार नाही. सबब हे जाहिर प्रगटन जनतेची दिशाभुल वा फसवणुक होवु नये म्हणुन दिले असे.

**दि. ३१/०७/२०२४.**

**जाहीर प्रगटन देणार**
**सोनल महावीर मुथा**

**तर्फे,**
**ॲड. अमरसिंह प्रतापराव जगताप, धाराशिव.**
**मो. नं. ७७२१०५८५५५.**

**जाहीर प्रकटन**

सोलापुर व परिसरातील तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे आशिल सोनल महावीर मुथा रा. माणिक चौक, धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी राजेंद्र दगडु सातपुरे यांच्या वडिलोपार्जीत मालकी व कबजेवहिवाटीची मौजे नान्नज ता. उत्तर सोलापुर जि. सोलापुर येथील जमिन गट नं. ७८/२ मधील क्षेत्र ०१ हे ५९ आर, आकार ०१ रु. २३ पैसे वर नमुद मिळकत तद्गभूत वस्तुसह जमिन रितसर हस्तांतरण होणार असुन वर नमुद मिळकती व क्षेत्रफळाबाबत कोणाचे कांही हक्क, अधिकार, वारसाहक्क तसेच सदर खरेदीबाबत कोणाचा कांही आक्षेप हार-हारकत, उझर, बोजा, चोळी बांगडी, येणे देणे, गहाणखत, करार, इत्यादी अथवा इतर मार्गाने सदर मिळकतीवर कोणास कोणत्याही प्रकारचा आक्षेप तसेच आपला कायदेशीर हक्क वा अधिकार सांगावयाचा झाल्यास सदर जाहिर प्रगटन प्रस्तुत झाल्यापासुन १५ दिवसांच्याआत प्रस्तुत जाहिर प्रगटन देणार किंवा विधिज्ञ यांचेशी संपर्क साधुन तुमचा आक्षेप / हक्क सक्षम पुरावा, कागदपत्र, इतर ही कांही असल्यास प्रत्यक्ष सादर करावे व निरसन करावे. अन्यथा वर नमुद मुदतीत कोणत्याही प्रकारचे आक्षेप न आल्यास कोणाचे ही काही हरकत वा हक्क संबंध नाही असे समजुन आमचे आशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतरचे कोणतेही हरकत आक्षेप तसेच हित संबंध उद्भवल्यास त्याची कोणतीही कायदेशीर जबाबदारी आमचे आशिलावर बंधनकारक असणार नाही. सबब हे जाहिर प्रगटन जनतेची दिशाभुल वा फसवणुक होवु नये म्हणुन दिले असे.

**दि.३१/०७/२०२४.**

**जाहीर प्रगटन देणार**
**सोनल महावीर मुथा**

**तर्फे,**
**ॲड. अमरसिंह प्रतापराव जगताप, धाराशिव.**
**मो.न. ७७२१०५८५५५.**

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# केरुळमध्ये सशस्त्र दरोडेखोरांचा हल्ला


## कुटुंबात दोघे जखमी ;एक गंभीर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जुलै**

आष्टी तालुक्यातील किन्ही येथील दरोड्याची घटना ताजी असतानाच तालुक्यातील केरुळ येथील भागवत वस्तीवर दोरडखोरांनी सोमवारी मध्यरात्री रात्री १ ते २ च्या दरम्यान दशहत माजवत अज्ञात दरोडेखोरांनी सशस्त्र दरोडा टाकला.मारहाण करत दरोडखोरांनी सोने,चांदीचे, दागिने रोख रक्कम लुटली दरोडेखोरांच्या मारहाणीत राजू महादेव भागवत (वय ३०) यांच्यावर सुमारे ९ चाकुचे वार झाल्याने त्यांना अहमदनगर येथील खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर,श्वान पथक,फिंगर प्रिंट पथक,आष्टी चे सहाय्यक पोलिस निरीक्षक विक्रांत हिंगे ,नरवडे, पोलिस शिंदे,वाणी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व दरोडेखोरांच्या तपासासाठी पोलिस अधीक्षकांनी ४ ते ५ पथकांची नेमणूक केली आहे



तालुक्यातील केरुळ येथील टेंभीच्या माळाजवळील राजू महादेव भागवत यांच्या घरामध्ये सोमवारी मध्यरात्रीनंतर अज्ञात ५ ते ७ दरोडेखोरांनी काठी, कुर्हाड,चाकू अशी हत्यारे घेऊन घरात घुसले. कुटुंबातील मुलासह सर्वांना काठीने मारहाण करत चाकूचा धाक दाखवून दहशत माजवली.दरोडेखोरांनी भागवत यांच्या घरातील रोख रकमेसह सोन्या-चांदीचे दागिने लूटले.भागवत यांच्या घरात दरोडेखोरांना विरोध करणार्या राजू महादेव भागवत यांना मारहाण करत त्यांच्यावर जवळपास नऊ चाकूने वार केल्यामुळे ते गंभीर जखमी झाले असून त्यांना अहमदनगर येथील खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.दरोडा टाकल्यानंतर दरोडेखोर पसार झाले.गावात दरोडा पडल्याचे समजताच अनेकजण जमले.नागरिकांनी डायल ११२ वर माहिती दिली.त्यामुळे पोलिसांची गाडी घटनास्थळी दाखल झाली.तोपर्यंत दरोडेखोर दूरवर गेले होते.दरोडेखोरांना पकडण्यासाठी पहाटेपासून पोलिसांचा फौजफाटा सर्वत्र फिरत आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण,आष्टी पोलिस ठाण्याचे पोलिस शोध घेत होते. घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर,श्वान पथक,फिंगर प्रिंट पथक,आष्टी चे सहाय्यक पोलिस निरीक्षक विक्रांत हिंगे ,नरवडे, पोलिस शिंदे,वाणी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व दरोडेखोरांच्या तपासासाठी पोलिस अधीक्षकांनी ४ ते ५ पथकांची नेमणूक केली आहे.आष्टी पोलिस जखमींचे जवाब आणण्यासाठी अहमदनगर कडे रवाना झाले आहेत.



संभाजीनगर-मागील मोठ्या कालावधी पासून बीड शहरातील बाह्यवळण रस्त्यावर स्लिप रस्ता व शहरातील दोन्ही प्रमुख मार्गावर उड्डाणपूल तयार व्हावा यासाठी आ.संदीप क्षीरसागर पाठपुरावा करत आहेत. यासंदर्भात मंगळवारी (दि.३०) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक श्री. इंगोले यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी लवकरात लवकर काम सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी माजी आमदार सय्यद सलीम साहेब उपस्थित होते.

## सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी उमेदवारांना सहा महिन्याचा वाढीव कालावधी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जुलै**

राज्यात सध्या सुरु असलेल्या सन २०२४-२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी ( अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन सदर शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायीक अभ्यासक्रमां सहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासुन सहा महिन्यांचा कालावधी देण्यात येत आहे.



स्वामी गणेश चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय डोणगांव (दर्गा) ता.अंबड येथील शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य रुस्तुम खेडकर सर आज दि.३१ जुलै २०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा कुलकर्णी परिवाराच्या वतीने सपत्नीक सत्कार करताना श्रीकांत कुलकर्णी

# शिवसेनेच्या वतीने बीड शहरातील पंधरा हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जुलै**

सामाजिक उपक्रमामध्ये प्राधान्याने पुढाकार घेऊन समाजसेवेचा तप पूर्ण करणारे शिवसेना जिल्हप्रमुख मा. अनिलदादा जगताप तथा सचिनभैय्या मुळूक यांनी शिवसेना वर्धापन दिनानिमित्त बीड शहरातील पंधरा हजार शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. बीड शहरातील कंकालेश्वर विद्यालय, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, केएसपी विद्यालयासह अनेक शाळांमधील तब्बल पंधरा हजार विद्यार्थ्यांना काल दि. ३० जुलै रोजी शालेय साहित्य वाटप केले. याबरोबरच शाळेतील विद्यार्थी तथा शिक्षकांच्या समस्या जाणून घेतल्या व त्या समस्या सोडवण्यासाठी शिवसेना कठीबद्ध असल्याचे आश्वासन अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी दिले.

यादरम्यान शाळा व्यवस्थापनाकडून अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक यांचा पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन शिवसेनेचे धनुष्य आम्ही उचललेले आहे. आदरणीय बाळासाहेब ठाकरे आणि दिघे साहेब यांनी ऐंशी टक्के समाजसेवा आणि वीस टक्के राजकारण करण्याचे संस्कार आम्हा शिवसैनिकांना दिलेले आहेत.



# आई वडिलांची सेवा हिच खरी ईश्वर सेवा - ह.भ.प.अक्रुर महाराज साखरे

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ जुलै**

केज तालुक्यातील चिंचोलीमाळी येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अंखड हरिनाम सप्ताह व संत सावता महाराज जीवन चरित्र कथा वाचन सोहळ्याचे आयोजन दि. २०/०७/२०२३ ते दि. ०३/०८/२०२४ या काळात करण्यात आले आहे.



याविषयी सविस्तर वृत्त असे की दरवर्षी प्रमाणे याही वर्षी संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ह. पुण्यतिथीनिमित्त येथील श्री संत सावता महाराज मंदिरात वैकुंठवासी ह.भ.प. रामकृष्ण महाराज वरपगावकर व वैकुंठवासी ह. भ. श्री प. ज्ञानेश्वर माऊली महाराज उत्रेश्वर पिंप्रीकर यांच्या कृपा आशिर्वादाने व जेष्ठ नेते तथा सामाजिक कार्यकर्ते राम प्रभु राऊत (मेजर) यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व संगीत विशारद भागवत कथाकार ह.भ.प. सुमंत महाराज डाके व भ. प. वैभव महाराज फुलझळके व ह.भ.प. बाळु महाराज कोरडे, यांच्या सुमधुर गायनाने आणि ह.भ.प. विलास महाराज कोरडे यांच्या पखवाज वादनाने व संत सावता यंग ग्रुप व गावातील तरुण मंडळींच्या सहकार्याने भव्य दिव्य अंखड हरिनाम सप्ताह व संत सावता माळी जीवन चरित्र वाचन सोहळ्याचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांना मिळत आहे.

दि. ३० जुलै वार मंगळवार रोजी महाराष्ट्रातील सुरु किर्तनकार ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे यांचे रात्री ९.३० ते १२.०० या वेळेत किर्तन संपन्न झाले. यावेळी आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ।।१।। कुळीं कन्यापुत्र होती जी सात्त्विक । तयाचा हरीख वाटे देवा ।।ध्रु.।। गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचें ।।३।। तुका म्हणे मज घडो त्याची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ।।४।। या अभंगावर विवेचन करताना आई वडिलांची सेवा करा, ईश्वर सेवा, देश भक्ती करा असे मोलाचे मार्गदर्शन केले.

यापुढील कार्यक्रमांचा ही सर्व गावातील व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक जेष्ठ नेते राम प्रभु राऊत मेजर, अभिजित राऊत, बाळु राऊत, यांच्यासह श्री. संत सावता यंग ग्रुप व तरुण मंडळ, व गावकरी यांनी केले आहे.

# क्षीरसागरांच्या कर्तुत्वामुळे बीडकरांना प्यायला पाणी नाही!

## उड्डाणपूल व स्लीप रोड कामाच्या श्रेयासाठी क्षीरसागरांनी रिकामी लुडबुड करू नये - राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जुलै**

बीडकरांना गेली पंचवीस वर्षापासून पंधरा दिवसाला एकदा प्यायला पाणी मोठ्या मुश्किलीने मिळते. कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च झाला. तीस वर्ष सत्ता भोगूनही आज बीड करांचा पाण्याचा प्रश्न मिटला नाही. बीड शहराची बकाल अवस्था करण्याचे श्रेय सर्व क्षीरसागरांना जाते. निवडणुका डोळ्यासमोर पाहून, पुन्हा एकदा विकासाच्या नावाखाली क्षीरसागरांनी सुरु केलेली लुडबुड निष्फळ ठरेल. नागरिकांचे मुलभूत प्रश्न सोडवण्या ऐवजी उड्डाणपूल व स्लीप रोड कामाचे श्रेय घेण्यासाठी लुडबुड करू नये. असा सल्ला भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष क्षीरसागरांना दिला आहे.

भाजपा राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे, आ. नमिताताई मुदंडा, आ. लक्ष्मण पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, रमेशराव आडसकर, अक्षय मुंदडा यांच्या शिष्ट मंडळाने भूपृष्ठ वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांची दिल्ली येथे दि. २०/१०/२०२१ रोजी भेट घेऊन बीड जिल्हातील नागरिकांच्या सोयीसाठी रस्ते आणि पुलांचे प्रश्न मार्गी लावावेत अशी मागणी केली होती. छत्रपती संभाजीनगर ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगत स्लीप रोड, बाह्य वळण रस्त्यावर उड्डाण पूल, बिंदुसरा नदीवर पूलकम बंधारा, बीड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीसाठी लागणारा निधी अशा विविध कामांना प्राधान्य देऊन, रस्ते विकासाची कामे मार्गी लावावेत अशी मागणी केली होती. ना. गडकरी यांनी त्यावेळी तात्काळ दखल घेऊन, रस्ते विकासाचे काम हाती घेतले होते. त्या निर्देशानुसार आज कार्यवाही सुरु असून, केवळ पंकजाताई मुंडे व प्रितमताई मुंडे यांच्या प्रयत्नातून विकास कामांना गती मिळाली आहे. परंतु जसजशी विधानसभा जवळ येत आहे. क्षीरसागर कुटुंबीयांची स्वार्थी धडपड सुरू झाली.

## आवसगावचे जेष्ठ व्यक्तिमत्त्व श्रीधर आप्पा शिनगारे पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ जुलै**

केज तालुक्यातील आवसगाव येथील जेष्ठ व्यक्तिमत्त्व तथा सर्वांचे आप्पा या नावाने सुपरिचित असणारे मनमिळाऊ स्वभावाचे स्वाभिमानी व्यक्तीमत्व तथा श्री. प्रदिप शिनगारे , डॉ.प्रशांत दादा शिनगारे व आवसगावचे सरपंच विश्र्वास शिनगारे यांचे वडील मा.श्रीधररावजी गणपत शिनगारे पाटील यांचे काल दि.३०/७/२०२४ रोजी मंगळवारी सायंकाळच्या सुमारास वृध्दापकाळाने दुःख निधनाची वार्ता माहिती होताचा सर्वांनी आप्पांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत एक दिलखुलास व शिनगारे परिवारातील स्वाभिमानी व्यक्तीमत्व हरपल्याची मनोगत नागरिकांनी व्यक्त केले.



**सर्वांच्या सहवासात असणारे आप्पा काळाच्या पडद्याआड**

सदैव गावातील सर्वांना आपलेसे वाटणारे व सतत भेटलेल्या प्रत्येक नागरिकांची आस्थेवाईकपणे विचारपूस करणारे आप्पा आज आपल्यात राहिले नसल्याचे दुःख सर्वांच्या तोंडी ऐकायला आले आप्पांनी आपल्या हायातीत कधीच आपल्या स्वाभिमानी स्वभावाशी कधीच तडतोड केली नाही अशा या आवसगावच्या जेष्ठ व्यक्तिमत्त्वास भावपूर्ण श्रद्धांजली.


## नगर परिषद परळी वैजनाथ

## ई-निविदा क्र.(०३), (०४), (०५) / बांधकाम विभाग/२०२४-२५

मुख्याधिकारी नगर परिषद परळी वैजनाथ यांनी ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा सुचना दिनांक ३०.०७.२०२४ रोजी खालीलप्रमाणे www.mahatenders.gov.in या सांकेतीक स्थळावर प्रसिध्द केली आहे.

| अ.क्र | ई-निविदा | निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | निविदा स्विकृतीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| 1 | 03 | 30.07.2024 सकाळी 11.00 | 13.08.2024 सायं.06.00 |
| 2 | 04 | 30.07.2024 सकाळी 12.00 | 05.08.2024 सायं.06.00 |
| 3 | 05 | 30.07.2024 सकाळी 05.00 | 07.08.2024 सायं.06.00 |

तरी वरीलप्रमाणे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर निविदा नमुना पहावा. निविदा बाबत सुचना सदर सांकेतीक स्थळावर प्रसिध्द केल्या आहेत. तेंव्हा इच्छुक निविदा धारकांनी वरीलप्रमाणे निविदा भरावी.

स्वाक्षरीत
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद परळी वैजनाथ


# भाजपाने तिकीट नाकारले तरकेज विधानसभेची निवडणूक लढवणारचं : काय म्हणाल्या माजी आमदार संगिता ठोंबरे ?

## माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी अंबाजोगाईत माध्यमांशी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३१ जुलै**



केज मतदारसंघातील जनतेनं माझ्यावर विश्वास टाकीत त्यांची सेवा करण्याची संधी मला दिली आहे. केज मतदारसंघाच्या विकासासाठी मी निवडणूक लढविण्याचा निर्धार केला असून यंदाच्या निवडणुकीत मी पुर्ण ताकदीने निवडणूकीला सामोरे जाणार आहे, अशी स्पष्ट भूमिका केज मतदारसंघाच्या माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी माध्यमांशी बोलताना विषद केली.

केज विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाईत आज माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या पत्रकार परिषदेला भाजपाचे दिलीप काळे, विजयप्रकाश ठोंबरे, लोकजनशक्ती पार्टीचे राजेश वाहुळे, 'भिमशक्ती' चे भिमराव सरवदे यांच्यासह आदींची यावेळी उपस्थिती होती.

पत्रकार परिषदेत बोलताना माजी आमदार संगिता ठोंबरे म्हणाल्या की, केज विधानसभा मतदारसंघाची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. या निवडणुकीत एक व्हिजन डोळ्यासमोर ठेवून निवडणूक लढविण्याचा निर्धार केला आहे. केज विधानसभा मतदारसंघात अजूनही विकासाची बरीच कामं प्रलंबित आहेत. त्यासोबतचं केज मतदारसंघातील जिव्हाळ्याचे प्रश्न अजूनही मार्गी लागले नाहीत. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी विधानसभेची निवडणूक लढवणार आहे. निवडणूक लढताना मतदारसंघातील जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणार असल्याचे माजी आमदार ठोंबरे यांनी सांगितले.केज मतदारसंघातील धनेगाव येथील प्रकल्पात मराठवाड्याचं हक्काचं ३ टीएमसी पाणी आणण्यासाठी मी प्रयत्न करणार असून युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'एमआयडीसी' ची निर्मिती अंबाजोगाई आणि केज या ठिकाणी करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासोबतच अंबाजोगाई जिल्ह्याचा प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून रखडला आहे. त्याही प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी मी कटीबद्ध असल्याचे ठोंबरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

विविध प्रश्नांवर भूमिका केली स्पष्ट

केज विधानसभा निवडणुकीत भाजपाने तिकीट नाकारले तर आपण कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवणार ? असं पत्रकारांनी विचारले असता त्यांनी आज तरी पर्याय नसल्याचे सांगत येणाऱ्या काळात जो चांगला पर्याय असेल त्या पक्षाकडून निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले. दरम्यान, संगिता ठोंबरे यांनी मतदारसंघातील विविध प्रश्नांवर मनमोकळ्यापणाने चर्चा करून विविध प्रश्नांवर आपली भूमिका स्पष्ट केली. या पत्रकार परिषदेला मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.

CMYK

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



## महसूल सप्ताह अंतर्गत आजपासून विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.३१ जुलै-**

महसूल विभागामार्फत १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये शासनाच्या पथदर्शी व अभिनव योजनांचा प्रचार, प्रसार व अंमलबजावणी ही या सप्ताहाची वैशिष्ट्ये असणार आहे.

महसूल सप्ताहामध्ये प्रत्येक दिवशी महसूल विभागामार्फत समाजाच्या विविध घटकातील नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये १ ऑगस्टला महसूल सप्ताहास सुरवात होणार असून यादिवशी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, २ ऑगस्टला मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, ३ ऑगस्टला मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, ४ ऑगस्टला स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, ५ ऑगस्टला सैनिक हो तुमच्यासाठी, ६ ऑगस्ट रोजी एक हात मदतीचा दिव्यांगाच्या कल्याणाचा, तर ७ ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी पुरस्कार वितरण व महसूल सप्ताह सांगता समारंभ घेण्यात येणार आहे.

### संक्षिप्त वृत्त



## माजीमंत्री विनायकराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

**अहमदपूर, दि.३१ जुलै-**

माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त प्रदीप संतुकाराव खोमणे यांनी खंडाळी परिसरातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अभिनंदन सोनकांबळे, खंडाळी गावचे जेष्ठ नागरिक लक्ष्मणराव पाटील, मुख्याध्यापक बी.डी.गुळवे, जिल्हा परिषद प्राथमिक विद्यालय वामननगर मुख्याद्यापक गिरी, एस.एच.पालकुर्तावार, एम.ए.रुद्रवाड, व्ही.व्ही.दराडे, घोडके, नाईक, आगलावे, आढे, घोगरे, कांबळे, माद्देवाड, गुट्टे, पठाण, सलीम, अजय स्वामी उपस्थित होते.



## यशवंतराव चव्हाण विद्यालयात सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**देवणी, दि.३१ जुलै-**

कै.यशवंतराव चव्हाण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बोरोळ तालुका देवणी येथील विद्यालयातील शाळेच्या स्थापनेपासून आज तागायतपर्यंत कार्यरत असलेले सहशिक्षक सेवानिवृत्त झाले. यावेळी या तिघांचा सेवानिवृत्ती व सेवापूर्ती गुणगौरव सोहळा संपन्न झाला. शिक्षक बिरादार बालाजी पांडुरंग, घनपाठी विनोद गोविंदराव व गुंजोटे वैजनाथ दत्तात्रेय यांनी स्व. इच्छा निवृत्ती घेतली. या त्रिमूर्तींचा विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सहपत्नीक सत्कार व निरोप समारंभ देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्था सचिव शिवाजीराव संभाजीराव शेंडगे उपस्थित होते व प्रमुख पाहुणे म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तोगरीच्या प्राचार्य श्रीमती वंदना येरनाळे व उपप्राचार्य काळगापुरे गुणवंत, प्राध्यापक सतीश क्षीरसागर, शिवाजीराव शेंडगे विद्यालय भोपनीचे मुख्याध्यापक संतोष शेंडगे, कै.यशवंतराव चव्हाण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य एस.एस. शेंडगे, डॉक्टर सुजित शेंडगे, मुख्याध्यापक सुधाकर पाटील-लासोनकर, मुकुंदराज विद्यालय विळेगाव मुख्याध्यापक बोडके मुरलीधर, जि.प.प्रशाला बोरोळचे मुख्याध्यापक जी.आर.राठोड, बोरोळचे उपसरपंच प्रमोद मनोहरराव पाटील माजी सरपंच ज्ञानेश्वर शेंडगे, दत्ता हुरूस नाळे, शेतकरी संघटनेचे युवा लातूर जिल्हा उपाध्यक्ष सत्यदेव गरड, कालिदासराव देवणे, राहुल बालुरे, संजय खुळे, सुंदर राज शिंदे इंजिनियर सोमवंशी अशोक राव मुख्याध्यापक दत्तात्रेय पारवे, डॉक्टर रामेश्वर कदम, हभप दोडके मामा, प्रतापराव शेंडगे नरेंद्र घनपाठी, शार्दुल घनपाठी, सुनंदा घनपाठी, स्नेहल घनपाठी सत्कार मूर्तींच्या पत्नी सुनिता बिरादार प्रतिभा घनपाठी विजयमाला गुंजोटेआनंद पाटील किरण बिरादार, अजित बिरादार व्यंकटेश गुंजोटे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सह पत्नी सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सहशिक्षक प्रदीप पाटील व कांबळे मीनाक्षी यांनी केले व आभार प्रदीप पाटील यांनी मानले.



## आ. देशमुख यांनी विविध संस्था, पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या घेतल्या भेटी

**लातूर, दि.३१ जुलै-**

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आ. अमित देशमुख यांनी दि. ३० जुलै रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी मराठवाड्यासह लातूर जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन निवेदनाचा व निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. यावेळी माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा.चेअरमन समद पटेल, नांदेड काँग्रेसचे प्रा.यशपाल भिंगे, २१ शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रवींद्र काळे, कल्याण पाटील, शिवाजीराव हुडे, गोपाळराव बोराडे, गणेश एस.आर. देशमुख, सुनील पडिले, अजित माने, चंद्रशेखर दंडीमे, गोविंद डूरे-पाटील, गोविंद बोराडे, अनंत बारबोले, गिरीश पाटील, निनाद भिंगे, सौहार्द भिंगे, श्रीहरी मुंदकर, पत्रकार राजकुमार दाभाडे, दगडूसाहेब पडीले, नईम शेख, शामराव जगताप, दत्तराव भवर, सुनिता सोनकांबळे, सत्यभामा कासले, सलीम पठाण, नांदेड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक विठ्ठल पाटील, सुभाष रायबोले, अब्दुल रशीद, सखाराम तुपेकर, संदीप सोनकांबळे, लक्ष्मण पाटील, प्रशांत सोनकांबळे, सतीश साळुंखे, भालचंद्र सोनकांबळे, मुन्ना शिंदे, आनंद मालू, संजय माने, अमर पवार, लक्ष्मीकांत पाटील, सदाम बागवान, संतोष नाईकवाडे, शोभा सोनकांबळे उपस्थित होते.

## जनतेच्या सुरक्षतेची काळजी घेणे आमदारांचे कर्तव्य

### दिनकर मानेंच्या टीकेला आ. अभिमन्यू पवारांचे उत्तर

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ३१ जुलै-**

औसा मतदारसंघात गॅस सुरक्षा अभियान राबविण्यात येत असून याअंतर्गत घरोघरी जाऊन शेगडीचे सर्व्हिसिंग, खराब झालेले बर्नर, बटन, गॅस पाईप बदलून दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत. या जनहिताच्या सामाजिक उपक्रमात शेगड्या दुरुस्त करून देणं आमदारच काम आहे का अशा या माजी आमदार दिनकर माने यांच्या टिकेचा खरपुस समाचार घेत बरेच वर्ष आपण राजकारणापासून दूर असल्यामुळे किंवा राजकारणात समाजकारणाचा अंतर्भाव नसल्यामुळे तुम्हाला बहुधा विसर पडला आहे. जनतेच्या सुरक्षिततेची काळजी घेणं हे सुद्धा आमदारांचं कर्तव्य आहे . दिनकरराव, तुम्हाला औसा मतदारसंघातील माता भगिनींची चिंता नसेल पण मला आहे अशा शब्दात आ. अभिमन्यू पवार यांनी प्रसिध्दी पत्रकातून मार्मिक उत्तर दिले आहे.



आ अभिमन्यू पवार म्हणाले ,विरोधक म्हटलं की टिकाटिपण्णी करणं आले. पण त्या टिकाटिपण्णीत संवेदनशीलता लोप पावणार नाही. याची काळजी राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्यांनी घेतली पाहिजे. एका सामान्य कुटुंबातून पुढं आलो असल्यामुळे माझ्यावर नेहमी अवास्तव टीका होत असते . पण त्याकडे आम्ही कटाक्षाने दुर्लक्ष करत असतो. असे सांगून ग्रामीण भागात गॅस वापराचे प्रमाण अलीकडच्या काळातच वाढले आहे .व गॅस वापराच्या सुरक्षित पद्धतीविषयी फार जागरूकता नाही.तसेच ग्रामीण भागात गॅस दुरुस्तीची, सर्व्हिसिंगची काही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे सिलिंडर स्फोट दुर्घटना होण्याची शक्यता जास्त असते. हे दिनकरराव माने यांना माहीत नसेल. वर्षाकाठी आपल्या देशात ३ ते ४ हजार महिलांचे मृत्यू घरातील गॅसचा स्फोट झाल्याने होतात, भविष्यातील अशा संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी अभियान हाती घेतले असून मतदारसंघातील माता भगिनींच्या सुरक्षिततेची काळजी घेणं. हे मी माझं कर्तव्य समजतो. आत्तापर्यंत १७ हजार कुटुंबांना या अभियानामुळे गॅस सुरक्षा प्रदान झाली आहे, अशी माहिती आ अभिमन्यू पवार यांनी यावेळी दिली आहे.

**'या' अभियानाला दिनकर माने यांनी प्रसिद्धी मिळवून दिली**

या अभियानाची अद्याप म्हणावी तशी प्रसिद्धी झाली नव्हती. लोकहिताच्या या उपक्रमावर विनाकारण टीका करत दिनकर माने यांनी या अभियानाला प्रसिद्धी मिळवून दिली आहे. यामुळे या उपक्रमाची माहिती तर जनतेपर्यंत पोहोचलीच आहे अशी खोचक टिका आ. अभिमन्यू पवार यांनी केली आहे .

## सततच्या पावसामुळे सोयाबीन पडले पिवळे

**तभा वृत्तसेवा,**
**येरोळ, दि.३१ जुलै -**

येरोळ मागील आठ ते दहा दिवसांपासून सतत सुरू असलेल्या संततधार पावसामुळे खरिपातील सोयाबीन पिकांचे नुकसान होत आहे. शेतात पाणी साचत असल्यामुळे पिके पिवळी पडत आहेत. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

मागील काही दिवसांपासून सूर्यदर्शन झाले नाही. ढगाळ वातावरणामुळे पिकांवर परिणाम होत असून, सोयाबीनचे पीक पिवळे पडत असल्यामुळे पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तत्काळ मदत देण्याची मागणी केली जात आहे.

अनेक गावांमध्ये अतिपावसामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीत पाणी थांबले आहे. परिणामी, सोयाबीन, तूर, मूग,उडीद यांसह भाजीपाला पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. येरोळसह सुमठाणा, चामरगा, दैठणा शेंद कानेगाव तळेगाव बोळेगाव, धामणगाव, नागेवाडी, कारेवाडी, साकोळ, राणी अंकुलगा या गावांत मोठ्या प्रमाणात सोयाबीनची पेरणी केली आहे. पीक जोमात असतानाच आता सततच्या ढगाळ वातावरणामुळे पिकांवर विपरीत परिणाम पडत असल्याने नुकसानीची शक्यता समस्त शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे. खरिपातील पिके जोमाने आली आहेत. त्यामुळे भरघोस उत्पन्न होऊन पुढील वर्षाची चिंता मिटेल, अशी शेतकऱ्यांची आशा असतानाच मागील आठ ते दहा दिवसांपासून ढगाळ वातावरण सततचा पाऊस कोसळत आहे. त्यामुळे आता पिके पिवळी पडत आहे. तर काही ठिकाणी शेतात पाणी जमा झाले आहे.

## दैठणा येथे संभाजी पाटील-निलंगेकर यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. ३१ जुलै-**

निलंगा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय विद्यमान आमदार संभाजी भैया पाटील निलंगेकर यांच्याकडून दैठणा येथे भेट देण्यात आली. पाटील-निलंगेकर यांनी नवनिर्वाचित शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सदानंद पाटील यांची भेट घेऊन शुभेच्छा देण्यात आल्या आणि नंतरच्या काळात शाळेच्या संदर्भात येणाऱ्या प्रत्येक अडचणीत आपण लक्ष घालू तसेच शाळेला काही निधी लागत असेल तर तोही उपलब्ध करून देऊ असे अनेक आश्वासक शब्द संभाजी पाटील-निलंगेकर यांच्याकडून यावेळी प्राप्त झाले.

यावेळी या शाळेतील मुख्याध्यापक म्हणून विलास हसबे सर यांच्याकडून शाळेची प्रगती आणि भविष्यातील शाळेच्या गरजा अशा अनेक गोष्टी वरती संवाद झाला. शाळेत घेतले जाणारे अध्यापनाचे प्रत्येक कार्य त्यांच्या मोबाईल वरती दिसले पाहिजे अशा पद्धतीचे नियोजन आमच्याकडून पुढील काळासाठी करण्यात आलेले आहे असे पाटील यांना सांगण्यात आले.

यानंतरची भेट तुकाराम उर्फ आबा प्रल्हाद पाटील यांच्या घरी जाऊन यांच्या प्रकृतीबद्दल असते वायिकपणे विचारपूस करण्यात आले कारण तुकाराम पाटील यांचे काही दिवसापूर्वी बायपास झालेले आहे



म्हणून यांच्या घरी स्वास्थ्य चौकशी भेट घेण्यात आली आणि मग शेवटी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक व्यंकटरावजी बिरादार यांच्या घरी जाऊन सांत्वन भेट देण्यात आली मागील काही दिवसांपूर्वीच या ठिकाणी घडलेली दुःखद घटना म्हणजे लक्ष्मीबाई व्यंकटराव बिरादार यांचे झालेले निधन ही अत्यंत दुःखद घटना या दुःखद घटनेचे सांत्वन म्हणून या ठिकाणी भैया साहेबाकडून भेट देऊन झालेल्या घटनेचे सांत्वन पर संवाद झाला.

भारतीय जनता पार्टीचे शिरूर अनंतपाळ तालुक्यातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष मंगेश पाटील येरोळकर पोतदार आबा माजी सभापती गोविंदराव चिलकुरे चेअरमन दगडू साळुंके बालाजी तोटे संजय गांधी निराधार योजनेचे तालुका अध्यक्ष अनिल शिंदे नागूचलमले, चेअरमन पंडित शिंदे प्रसाद पाटील मनोज पाटील सदानंद पाटील पांडुरंग पाटील उपस्थित होते.



## स्वयं प्रकाशित व्हा ही बुध्दाची शिकवण : भिक्खु पय्यानंद थेरो

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ३१ जुलै-**

तथागत भगवान बुद्धानी समस्त मानवी जीवनाला उद्देशून मानव कल्याणकारी शिकवण दिली आहे. भगवान बुध्द यांनी मानवाच्या कल्याणासाठीच सर्व स्तरावरील उपदेश दिले आहेत. मनुष्याने स्वकर्तुत्वाने ज्ञान मिळवले पाहिजे. या करिता भगवान बुद्ध यांनी अत्त: दीप भव अर्थात स्वयंप्रकाशित व्हा असा मौलिक उपदेश त्यांनी समस्त समाजाला दिला, असे प्रतिपादन पू. भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले.

दर रविवार, चलो बुद्ध विहार अभियानांतर्गत कुशिनारा बुद्ध विहार, म्हाडा कॉलनी, बाभळगाव रोड, लातूर येथे सामूहिक बुद्ध वंदनेचे आयोजन करण्यात आलेले होते. प्रारंभी सर्व उपस्थित उपासक उपासिका यांच्या हस्ते तथागत भगवान बुद्ध व बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुष्पाने, धुपाने, दिपाने पूजा झाली. त्यानंतर त्रिसरण पंचशील ग्रहण करून सामूहिक बुद्ध वंदना करण्यात आली. यावेळी बावीस प्रतिज्ञा, भारतीय संविधानाचे प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन देखील करण्यात आले. यावेळी सुनीता कसादे, बबीता कांबळे, शिला ससाने, करुणा कांबळे, सुरेखा कांबळे, शकुंतला बटनपुरकर, सरिता हरणे, कस्तुराबाई सूर्यवंशी, सत्यकला मोरे, नैना कांबळे, कांचन कांबळे, आम्रपाली सुर्यवंशी, कविता भालेराव, मनिषा वाघमारे, पंचशीला बनसोडे, अंजली सोनकांबळे, निर्मला थोटे, कांता काकडे, शामल कांबळे, सुमन उडानशिव, सरिता बनसोडे, दिलिप हरणे, उत्तम कसादे, विजय कांबळे, गौतम गायकवाड, सुर्यकांत कालेकर, राजाराम बटनपुरकर, प्राचार्य प्रशांत भोपणीकर, भानुदास कांबळे, राहुल सुर्यवंशी, संजय भालेराव, अर्जुन वाघमारे, ज्योतीराम लामतुरे, करन ओव्हाळ, सुधाकर कांबळे, अशोक कांबळे, चंद्रसेन भडके, अनिरुद्ध बनसोडे उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ.दुष्यंत कटारे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद धावारे यांनी केले तर आभार दयानंद बटनपुरकर यांनी मानले.

## मराठवाड्यातील कोळी समाज सवलती पासून वंचित : ॲड. आंबेडकर

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि.३१ जुलै-**

निझामा कालीन नोंदी नुसार मराठवाड्यातील कोळी महादेव, कोळी मल्हार, कोळी टोकरे यासह तत्सम जमातीवर आरक्षण सवलती बाबत मोठा आन्याय होतोय याची जाणीव मला आहे, अशी खंत वंचित बहुजन विकास आघाडीचे सर्वे सर्वा ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली.

लातूर जिल्ह्यातील आदिवासी कोळी महादेव समाजाच्या वतीने त्यांना निवेदन देण्यात आले त्या निवेदनात असे नमुद केले आहे की, मराठवाडा व राज्यातील आदिवासी कोळी समाजाच्या बाधवाना जातप्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सुलभतेने मिळत नाही अनुसूचीत जाती व इतर मागासवर्गीय जाती प्रमाणे अनुसूचीत जमातीसाठीही रक्त नात्यातील वैधता देण्यात यावी राज्यातील एस.सी. व इतर मागासवर्गीयांना रक्त नात्यात जात पडताळणी झाली असेल तर (म्हणजे वडील, काका, आजोबा, चुलत चुलते, आत्या) त्यांच्या पाल्यांनाही त्वरीत वैधता प्रमाणपत्र देण्याचा शासन निर्णय आहे. परंतु एकमेव अनुसूचीत जमाती (एस.टी.) ची जातपडताळणी आहे त्याना रक्त नात्याचा निर्णय लागू नाही हा मोठा भेदभाव आहे. मराठवाड्यातील महादेव कोळी समाज मोठ्या प्रमाणात आहे. छत्रपती संभाजीनगर व किनवट समितीकडून मोठा अन्याय सुरू आहे. रक्त नात्यात वैधता प्रमाणपत्र असतानाही वैधता दिली जात नाही लाभार्थ्यांना अनेकवेळा चौकशीला सामोरे जावे लागते त्यांचा वेळ, मानसिक त्रास पडताळणी समितीचा सहन करावा लागतो, रक्त नात्याची वैधता देणे तर दुरच उलट नोटीसा पाठवून छळवणूक केली जाते. याबाबत शासनाने ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. अनेकवेळा या समाजाच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जातात. (आदिवासी २५ आमदार विरोध करतात) विधानसभा मतदार संघ अनेक वर्षापासून तेच आरक्षित आहेत. एस.टी. मतदार संघासाठी राज्यातील लोकसंख्या गृहीत धरली जाते लाभ मात्र ठराविक



लोकांना/समाजाला मिळतो हे दुर्दैव आहे. मराठवाड्यासह विस्तरित क्षेत्रातील आदिवासी कोळी महादेव मल्हार कोळी आणि टोकरे कोळी आदी जमातीच्या आरक्षणाच्या प्रशांवर शासनास आपल्या पक्षा मार्फत जाब विचारून आमच्यावरील होणार हा अन्याय दूर करण्यास मदत करावी असे निवेदन त्यांना आले. यावेळी त्यांनी शिष्ट मंडळाला उत्तर देतांना म्हणाले की, या समाजावर मोठा अन्याय होत आहे ठराविक जातीचेच लोकांना फायदा होत असून राजकीय आरक्षणासाठी मात्र राज्यातील संपूर्ण जनगणनेचा आधार घेतला जातो. सवलती मात्र दिल्या जात नाहीत याबाबत शासनाने विचार करावा असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी कोळी महासंघाचे राज्य सचिव सतीश धडे, जिल्हाध्यक्ष पंडीत फुलसूरे, अमोल सारगे यासह कोळी महासंघाचे शिस्टमंडळ होते.

## अण्णा भाऊ साठे जयंती मिरवणुकीनिमित्त शहरातील वाहतूक मार्गात बदल

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ३१ जुलै-**

साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे जयंती उत्सवनिमित्त लातूर शहरात दि. १ ऑगस्ट रोजी जयंती उत्सव साजरा होणार असून विविध जयंती समिती व संघटनेतर्फे वाजत गाजत मिरवणुका काढतात. त्यामुळे जनतेच्या सोईच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने लातूर शहरातील खालील मार्गावर वाहतुक बंद करणे व वाहतुक वळविणे आवश्यक आहे.

१ ऑगस्ट रोजी मिरवणुका या पी.व्ही.आर चौक ते एक नंबर कॉर्नर, पाण्याची टाकी(संविधान चौक), दयानंद गेट, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अशोक हॉटेल,महात्मा गांधी चौक, गंजगोलाईमार्गे साहीत्य सम्राट अण्णाभाऊ साठे चौक व जुना रेणापूर नाका मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक, अशोक हॉटेल,महात्मा गांधी चौक,गंजगोलाईमार्गे साहीत्य सम्राट अण्णाभाऊ साठे चौक व तसेच गरुड चौक ते गाव भागातील मिरवणुका विवेकानंद चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, शाहू चौक मार्गे साहीत्य सम्राट अण्णाभाऊ साठे चौक येथे येणार आहेत. त्यामुळे दि.१ ऑगस्टला दुपारी १ ते रात्री ११ वाजे पर्यंत सदरचे रोड हे सर्व प्रकारच्या वाहनांना (मोटार सायकल, थ्री व्हीलर, एस.टी.बसेस, ट्रक, टॅम्पो, टॅक्सी, ट्रॅव्हल्स, मिनीडोअर इ.) वाहतुकीसाठी बंद करण्यात यावेत.

**पर्यायी मार्ग :**

१) पी.व्ही.आर चौकातून शिवाजी चौक व शहरात येणारे एस.टी.बसेस पी.व्ही.आर. चौकातून रिंगरोडने नवीन रेणापुर नाका मार्गे जुना रेणापूर नाका येथिल बसस्टॅन्डचा वापर करतील.बाकी सर्व वाहने रेणापूर नाकाकडे किंवा खाडगाव टी पॉईंट मार्गे वाडा हॉटेल किंवा खाडगाव टी पॉईंट, साई धाम, आशियाना बंगला, जुना औसा रोड याचा वापर करतील.

२) औसा रोडने शहरात येणाया एस.टी.बसेस या छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील बसडेपोचा वापर करतील. तसेच चार चाकी,तीन चाकी व दोन चाकी वाहने जुना औसा रोडवरुन आशियाना बंगला, साई धाम मार्गे खाडगाव टी पॉईंट किंवा नाईक चौक मार्गे सुतमील रोड या मार्गाचा वापर करतील.

३) अंबाजोगाई रोडने लातूर शहरात येणाया एस.टी.बसेस जुना रेणापुर नाका येथिल बसस्थानकाचाच वापर करतील. अंबाजोगाई रोडने येणारी चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहने ही सिध्देश्वर मंदिराकडील रोड मार्गे गरुड चौकाकडे किंवा गाव भागात जातील व तसेच जुना रेणापुर नाका येथून बालाजी मंदीर या मार्गाचा वापर करतील.

४) नांदेड रोडने शहरात येणाया एस.टी.बसेस या गरुड चौक. सिद्धेश्वर चौक,नविन रेणापूर नाका मार्गे जुना रेणापूर नाका येथिल बसस्थानकाचा वापर करतील. नांदेड रोडने येणारे ट्रक, चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहने ही सिध्देश्वर मंदिराकडील रोड मार्गे नविन रेणापूर नाका, रेल्वे स्टेशन मार्गे पीव्हिआर चौक या मार्गाचा वापर करतील किंवा गरुड चौक, बाभळगाव नाका, बश्वेवश्वर चौक मार्गे राजीव गांधी चौक या मार्गाचा वापर करतील.

५) तसेच शहरातील वाहतुकीसाठी जनतेस १) राजस्थान विद्यालय ते पॅरलल रोडने बेद्रे कॉम्पलेक्सच्या पाठीमागून औसा रोड, आशियाना बंगला - खाडगाव रोड ते रिंगरोडचा २) गांधी चौक ते बस्वेश्वर महाविद्यालय - रमा चित्रपटगृह - खोरी गल्ली - शिवनेरी लॉज अशा मार्गाचाच अवलंब करावा. जुना रेणापूर नाका बसस्थानक येथे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व बसेस परत त्याच मार्गे रिंग रोडने जातील.

सोलापूर तरुण भारत

# ४०वा वर्धापन दिन विशेष

गुरुवार, १ ऑगस्ट २०२४

www.tarunbharat.org

सोलापूर तरुण भारत

### वर्धापन दिन विशेष...

गेल्या ४० वर्षांपासून सोलापूर जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाठा, विदर्भात नावारुपास आलेल्या लोकप्रिय अशा दैनिक सोलापूर तरुण भारतचा वर्धापन दिन साजरा होत आहे. या निमित्ताने येत्या गुरुवारी ८ ऑगस्ट रोजी वर्धापन दिन कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. १ ते ८ ऑगस्ट दरम्यान दररोज वर्धापन दिन विशेष पुरवणी प्रसिध्द होत आहे. या विशेष पुरवणीतून सोलापूर जिल्ह्याच्या विकासासह धार्मिक पर्यटनाचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

# विकसनशील सोलापूर



प्रशांत माने
निवासी संपादक
मो. ९८८११९१४४३

**सोलापूर हे नाव प्रत्येक सोलापूकरांच्या जिव्हाळ्याचे असून मार्शल लॉ आणि चार हुतात्म्यांच्या बलिदानाने ऐतिहासिक बनलेल्या सोलापूरची वाटचाल आता गतीने विकासाकडे सुरु आहे. सध्या चोहोबाजूंनी होत असलेल्या सोलापूरचा विकास हा आगामी काळात सोलापूरकरांच्या अभिमानाचा विषय असणार हे नक्की होय. विकसीनशिल सोलापूर आता लवकरच विकसीत सोलापूर बनेल आणि महाराष्ट्राच्या नकाशावर सोलापूरची पताका पुन्हा डौलू लागेल यात शंका नाही.**

देश स्वातंत्र्य होण्यापूर्वी सोलापूरने स्वातंत्र्य उपभोगून इंग्रजांच्या छाताडावर देखील देशभक्तीचा माज गाजवलेला आहे. इंग्रजांनी फासावर चढवलेल्या चार हुतात्म्यांची नगरी ही श्री सिध्दरामेश्वरांच्या वास्तव्याने पावन झालेली पुण्यनगरी आहे. सोलापूरलगतच पंढरीची विठ्ठल-रुक्माई, तुळजापूरची तुळजाभवानी, अक्कलकोटचे स्वामी, बार्शीचे भगवंत, मंगळवेढ्याचे दामाजीपंत, करमाळ्याची कमलाई, माढ्याची माढेश्वरी, अकलूजची आकलाई, माचणूरचे शिव, संगमावरील श्रीनृसिंह, अरणचे सावतामाळी, मोहोळचे नागनाथ आदींच्या आशिर्वादाने सोलापूर शहर व जिल्ह्याची विकासाची वाटचाल जोमाने सुरु आहे. जिल्ह्यामध्ये असलेले वरदायिनी उजनी धरण सोलापूरची शान तर आहेच पण सोलापूरच्या कृषी, औद्योगिक विकासाचा पायाय देखील आहे.

एकेकाळी गिरणगाव अशी ओळख असलेल्या सोलापूरने आता कात टाकली असून मेडिकल हब, शैक्षणिक हब, साखर कारखान्यांचा जिल्हा, धार्मिक पर्यटन, भुईकोट किल्ला हे भूषण सोलापूर मोठया डौलाने मिरवत आहे. उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणारे महत्वाचे शहर अशी ओळख असलेल्या सोलापूरला रेल्वेचे जाळे तर खूपच मजबूत आहे. पण आता गेल्या काही वर्षात




सोलापूरच्या आठही दिशांनी येणारे महामार्ग आता चौपदरी झालेले आहेत. १२५ टीएमसी पाणीसाठा क्षमता असलेले उजनी धरण सोलापूर जिल्ह्यात असल्याने पाण्याची कमतरता नाही. सोलापूर शहरालगत आणि जिल्ह्यात मोठ्या औद्योगिक वसाहती देखील आहेत. आंतरराष्ट्रीय उद्योग देखील सोलापुरात आहेत.

सोलापूरची कृषी प्रगती वाखाणण्याजोगी आहे. जिल्ह्यात सहकारी आणि खासगी असे एकूण ३९ साखर कारखाने कार्यरत आहेत.

जिल्ह्यातील अनेक प्रगतशिल शेतकरी कृषीभूषण आहेत. सोलापूरचे डाळिंब, द्राक्ष, बोर, पपई आदी फळ पिके तर एक्स्पोर्ट होतात. डाळिंब संशोधन केंद्र, रेशील उद्योगाला चालना देणारे केंद्र आहे. उजनी धरणातील पाण्यामुळे औद्योगिकसह कृषीक्षेत्रातही सोलापूर जिल्हा नावारुपास येत आहे. साखर कारखानदानी मजबूत असल्याने सोलापूर जिल्ह्याचा राजकीय ग्रॉफ नेहमीच चढता राहिलेला आहे. सोलापूर जिल्ह्याने महाराष्ट्राला एकाचवेळी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अशी दोन महत्वाची पदे दिलेली आहेत. देश आणि राज्यात सोलापूरचा राजकीय डंका सातत्याने गाजलेला आहे.

सोलापूर जिल्ह्यासाठी एक असे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आहे. सोलापुरात मेडिकल म हाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालय, शासकीय पॉलिटेक्निक आदीसह मोठ्या संख्येने ब्रॅन्डेड शैक्षणिक संस्था देखील कार्यरत असल्याने सोलापूर हे शैक्षणिक हब म्हणून ओळखले जात आहे. सोलापूर हे कर्नाटक आणि मराठवाड्याच्या सीम `वर असल्याने या भागातील दळणवळण येथे मोठे आहे. सोलापुरातील नामांकित मोठ्या हॉस्पिटल्समुळे विविध भागातून उपचारासाठी सोलापुरात येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी आहे. सोलापूर हे तुलनेने परवडणारे मेडिकल हब बनलेले आहे. जिल्ह्यातील एक मोठे आंतरराष्ट्रीय विमानतळ बोरामणी येथे बनत आहे. तर सोलापूर शहरातच होटगी रोडस्थित विमानतळावरून लवकरच विमानसेवा सुरु होत असल्याने भविष्यात सोलापूर हे आयटी हब देखील निश्चित बनेल याबाबत आता शंकाच नाही.







# विकासात्मक सोलापूर



**काटक नगरी, कणखर नगरी**
**संतांची नगरी, हुतात्मा नगरी**

असं सोलापूर शहराचं वर्णन करता येईल. जुन्या काळात ही कष्टकरी, मजुरांची नगरी होती. मागील ३०२-४० वर्षांपासून सोलापूर शहर व एकूणच जिल्हा आपली कात टाकताना दिसत आहे. सोलापूर शहराची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे सोलापूर हे दक्षिण भारताचे प्रवेशद्वार असून ते सबंध उत्तर भारत व दक्षिण भारताला रेल्वे मार्गाने व रस्ते मार्गाने जोडले गेलेले आहे. सोलापूर शहरातून मुंबई- बेंगलोर -हैदराबाद असे महामार्ग जातात. यामुळे रस्ते मार्गाने हे शहर जोडले गेलेले आहे. रस्ते व रेल्वेतील मुलभूत झालेल्या सुधारणा, मर्यादित लोकवस्ती, शिक्षण व तंत्रज्ञानात झालेल्या सुधारणा, एनटीपीसी सारखे प्रकल्प, सिंचनाच्या वाढलेल्या सुविधा,



यामुळे शेती इतर व्यवसाय, शिक्षण व आरोग्य, पर्यटन, इत्यादी अनेक क्षेत्रात सोलापूरला विकासात्मक संधी येत्या काही वर्षात खुणावत आहेत.

## शेतीतील विकासात्मक संधी :

सोलापूर जिल्ह्याला लाभलेल्या भीमा- सिना इत्यादी नद्या तसेच उजनी जलाशयातून होणारा कालव्यांद्वारे पाणीपुरवठा यामुळे सोलापूर जिल्ह्यातील लाखो हेक्टर जमीन लागवडीखाली आली आहे. सिंचनाच्या वाढलेल्या सुविधा, शेतीतील आधुनिक प्रयोग, तंत्रज्ञानाचा केलेला वापर, सुधारित बी बियाणे, कुशल मजूर यामुळे सध्या सोलापूर जिल्हा ऊस, केळी, द्राक्षे, डाळिंब इत्यादी फळे व भाजीपाल्यात स्वयंपूर्ण होण्याकडे वाटचाल करत आहे. आपली गरज भागून उरलेला शेतीमाल इतरत्र विक्रीस पाठवल्यामुळे शेतीमालाला योग्य बाजारभाव मिळत असून शेतीचे दरडोई उत्पन्न वाढल्याचे दिसून येत आहे. एकेकाळी केवळ आणि केवळ ज्वारीचे कोठार म्हणून ओळखला जाणारा आपला सोलापूर जिल्हा आता धान्य, फळे, भाजीपाला यातून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळवताना दिसत आहे. या वाढणाऱ्या शेती व्यवसायाला पूरक दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, वराहपालन, मेंढीपालन इत्यादी प्रकारात विकासात्मक अनेक संधी उपलब्ध होत आहेत. बँकांचे वित्तीय सहाय्य, सरकारी सेवा सुविधांचा सुयोग्य वापर केल्यास सोलापूर जिल्हा शेती व्यवसायात आघाडीवर बाजी मारू शकतो.



## शिक्षणातील विकासात्मक संधी :

सोलापूर शहर व जिल्ह्यात सरकारी व खाजगी क्षेत्रातील विविध शिक्षण संस्था आपापलीदारे उघडून विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत आहेत. यात मुख्यत्वे इंजीनियरिंग आणि मेडिकल बरोबरच शेतीविषयक, औषधनिर्माण, अकाउंट इत्यादी क्षेत्रातील नामांकित संस्था सोलापुरात दाखल झाल्यामुळे ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांना अल्पखर्चात दर्जेदार शिक्षण मिळू लागले आहे. यात रात्र शाळा, रात्र महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ इत्यादींनी आपापल्या विविध विषयांची व सोयीस्कर शिकण्याची संधी उपलब्ध करून दिल्यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांबरोबरच युवक, इतर व्यवसायिक, महिला, ज्येष्ठ नागरिक विविध कोर्सेसना प्रवेश घेऊन आपापली गुणवत्ता वाढवताना दिसतात. यामुळे सोलापूरची शैक्षणिक भरभराट होत आहे. तसेच, शिक्षणातून अल्प, मध्यम व उच्च वेतनावर आधारित नोकरी किंवा व्यवसायात विकासात्मक संधी निर्माण होत आहेत.



## आरोग्यविषयक विकासात्मक संधी :

सोलापूर हे दक्षिण व उत्तर भारताला रेल्वे व रस्ते यांनी जोडले गेलेले असल्यामुळे कर्नाटक, आंध्र प्रदेश येथील भागातून आरोग्यविषयक सेवांसाठी गरजू रुग्ण सोलापुरात येत आहेत. सोलापुरात अल्प दरात दर्जेदार आरोग्य विषयक सेवा सुविधा पुरविल्या जातात. उच्चशिक्षित डॉक्टर्स, नर्सेस, आरोग्य क्षेत्रात वाढलेला तंत्रज्ञानाचा वापर, आधुनिक दवाखान्यांची उपलब्धता, यामुळे बाहेरून येथे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. येथील आरोग्य विषयक खर्चही इतर मोठ्या शहरांच्या तुलनेत कमी असल्याने आरोग्य विषयक विकासात्मक संधी सोलापूरला आयत्याच चालून येत आहेत.



**मयुरेश कुलकर्णी**
**मो. ९४२१०२४८८१**

## व्यावसायिक विकासात्मक संधी :

सोलापुरात होऊ घातलेला आयटी पार्क, टेक्स्टाईल पार्क तसेच, सुरू असलेले एनटीपीसी येथे स्थानिक युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. रस्ते महामार्गाचे होणारे सहा पदरी किंवा आठ पदरीकरण, वाढलेल्या रस्त्यांचे जाळे, रेल्वेचे दुहेरीकरण, विजेवर चालणाऱ्या वेगवान व अति वेगवान उच्च सेवा सुविधांसहित रेल्वेगाड्या यामुळे आता सोलापूरशी इतर शहरे अति जलद गतीने जोडली गेलेली आहेत. यामुळे पुढील काळात सोलापूर येथे चादरी, टॉवेल, साड्या इत्यादी कापड उद्योग, सिमेंट उद्योग, औषध निर्मिती, आयटी क्षेत्र अशा अनेक विविध व्यवसायात पुढील काळात उच्चशिक्षित अल्प किंवा मध्यम शिक्षित मनुष्यबळाला रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होऊ शकतात.

## पर्यटन विषयक विकासात्मक संधी:

सोलापूर ही संतांची भूमी आहे. पंढरपूर, अक्कलकोट, मंगळवेढा, अरण, सोलापूर शहर इत्यादी ठिकाणी ही धार्मिक पर्यटनासाठी कायमच गजबजलेली असतात. तसेच नान्नज येथील माळढोक पक्षी अभयारण्य येथेही पर्यटकांचा राबता असतो. आता सोलापूरलगत कृषी पर्यटनही वाढू लागले आहे. स्वच्छ व प्रदूषण विरहित वातावरण, उत्तम खानपान व्यवस्था, वाहतूक सुविधा यामुळे कृषी पर्यटनाला सोन्याचे दिवस येऊ लागले आहेत. धार्मिक व इतर पर्यटन ठिकाणी स्वच्छ व दर्जेदार सुविधांनी युक्त निवास व्यवस्था, आरोग्यपूर्ण रुचकर भोजन व्यवस्था, गाईडची सोय, वाजवी मूल्य आकारल्यास सोलापूर पुढील काळात पर्यटनात देशपातळीवर आपले नाव उंचावू शकेल.

एकंदरीत सोलापूर येथे पुढील काळात नियमित विमानसेवा, रोजगाराभिमुख उद्योग व्यवसायांचे एकत्रीकरण झाल्यास सोलापुरातून रोजगारासाठी होणारे स्थलांतर १००% थांबेल व सोलापूर शहर हे उत्तम विकसित शहर म्हणून सबंध महाराष्ट्रातच नाही तर, देशपातळीवर उंचावेल असा १००% विश्वास वाटतो.

# सोलापूर शहर व जिल्हा आणि जवळचे धार्मिक पर्यटन

**सोलापूर ही पुण्यनगरी म्हणून ओळखले जाते. श्री. सिद्धरामेश्वर यांचे वास्तव्य सोलापूर येथे आहे तर सोलापूर जिल्हात अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत, गोरगरिबांचा, कष्टकऱ्यांच्या, वारकऱ्यांचा देव असलेल्या विठ्ठलाचे पंढरपूर, तसेच श्री स्वामी समर्थांनी पावन झालेली भूमी अक्कलकोट या धार्मिक स्थळांचा समावेश होतो. सोलापूर पासून अवघ्या ४६ किलोमीटरवर माय तुळजाभवानी तुळजापूर येथे आहे तर ८६ किलोमीटरवर दत्ताचे प्रसिद्ध धार्मिक स्थळ गाणगापूर आहे. त्यामुळे सोलापूर हे धार्मिक पर्यटन म्हणून अवघ्या महाराष्ट्राला नव्हे तर सोलापूरला लागून असलेल्या कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या राज्यामध्ये देखील प्रसिद्ध आहे. हजारो नव्हे तर लाखो पर्यटक या सर्व ठिकाणी दर्शनासाठी वर्षभर गर्दी करत असतात.**



**श्री. सिध्दरामेश्वर :** श्री. सिध्दरामेश्वर हे सोलापूरचे कुलदैवत म्हणून प्रसिद्ध आहे. सिद्धरामेश्वर हे १२व्या शतकातील महान संत व समाजसुधारक होते. त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक लोकोपयोगी कार्य केले. शेवटी सोलापूर येथे त्यांनी जिवंत समाधी घेतली. लोकांनी तेथे मंदिर उभे केले तेच आज सिद्धेश्वर मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. संक्रातीला येथे मोठी यात्रा भरते. ती गड्डा यात्रा म्हणून प्रचलित आहे. या यात्रेत काठीविवाह सोहळा संपन्न होतो. पाच दिवस सिद्धरामेश्वरांच्या नावाने घरोघरी सोलापूरात दिवा बसवला जातो. सिद्धरामेश्वर महाराजांच्या हातातील योगदंडाच्या



**महेश रायखेलकर**
**९३२६६१२४३६**


पूजेने यात्रेची सुरुवात होते. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि कर्नाटक येथील भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या या यात्रेला तब्बल ९०० वर्षांची परंपरा आहे. मंदिर परिसर देखील खूपच रम्य असा आहे. चहुबाजूने पाणी आणि मधे मंदिर असे याचे स्वरूप आहे. दर्शनासाठी आलेले भाविक दर्शनानंतर जवळ असलेल्या तलावात नौकाविहाराचा आनंद लुटू शकतात. बाहेरील आलेल्या भाविकांना राहण्यासाठी धर्मशाळेची सोय देखील देवस्थानाने करून दिली आहे. देवस्थाना द्वारे अन्नछत्र देखील चालवले जाते. भाविक तेथील प्रसादाचा आस्वाद मोठया भक्तीने घेतात.

**अक्कलकोट :** श्री. स्वामी समर्थांचा भक्त संप्रदाय खूप मोठा आहे. श्री स्वामी समर्थांची पावन समाधी अक्कलकोट येथे आहे आणि असे हे अक्कलकोट सोलापूर जिल्ह्यातच येते. ' भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' असे सांगणारे श्री. स्वामी समर्थ हे एकमेव होत. श्री. स्वामी समर्थ हे दत्ताचे तीसरे अवतार आहेत अशी मान्यता आहे. वर्षभर येथे भक्तगण स्वामींचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. गुरुपौर्णिमा, दत्त जयंतीला येथे भक्तगणांची मोठी गर्दी असते. येथील अन्नछत्र देखील अन्नदानासाठी प्रसिद्ध आहे.

**श्री. क्षेत्र गाणगापूर :** कर्नाटकातील गुलबर्गा जिल्ह्यातील अफझलपूर तालुक्यात भीमा नदीच्या काठावर आहे असेलेले श्री. क्षेत्र गाणगापूर हे दत्तात्र्याचे एक प्रसिद्ध मंदिर आहे. दत्त संप्रदाय देखील खूप मोठा आहे. दत्त जयंतीला हजारो दत्तगण दिंड्या घेऊन गाणगापूरला जात असतात. प्रत्यक्ष देव गाणगापूरात आहेत म्हणून येथे आलेल्या भक्तांना संकटातून तारण्याचे कार्य गेली अनेक वर्ष दत्त महाराज करीत आहेत. कोणाला काही बाधा झाली असेल तर येथे आल्यानंतर त्याचे निरसन होते अशी भक्तांची श्रद्धा आहे. येथे देखील उत्तम अशी धर्मशाळा आलेल्या भक्तांना राहण्यासाठी आहे. भीमा नदी देखील खूप रम्य आहे.

**श्री. क्षेत्र पंढरपूर :** पंढरपूरचा पांडुरंग माहित नाही असा महाराष्ट्रीयन नाही. वारकऱ्यांचा सखा, देव विठ्ठल व माता रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी वर्षभर पंढपूर येथे गर्दी असते. विठ्ठल रुक्मिणीची पावन भूमी पंढरपूर हे सोलापूर जिल्ह्यात येथे हे सोलापूर वासियांसाठी अभिमानाची





आणि आनंदाची बाब आहे. आषाढी वारी आणि कार्तिकी वारी या दोन वारी वारकरी समुदायासाठी आपुलकीच्या आहेत. लाखो वारकरी ही वारी करत पंढरपूरला जात असतात. विशेषतः आषाढी वारीला अनेक संतांच्या पालख्या अनेक दिवसांचा प्रवास करत लाखो वारकरी सोबत घेऊन पंढपूरला जात असतात. हा एक नयनरम्य सोहळा असतो. आषाढी एकादशीला पहाटे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री सपत्निक श्री विठ्ठल आणि रुक्मिणीची महापूजा करतात. याला शासकीय पूजेचा दर्जा दिलेला आहे. त्यांच्या बरोबरच वारकरी समुदायातील एका दाम्पत्याला प्रतिवर्षी पूजेचा मान मिळतो. असा मान मिळणे वारकरी संप्रदायात आदराचे समजले जाते. भक्तांना राहण्यासाठी धर्मशाळा येथे उपलब्ध आहेत.

**तुळजापूर :** भवानी मातेचे मंदिर असलेले तुळजापूर हे एक महाराष्ट्रातील प्रसिद्ध धार्मिक ठिकाण आहे. तुळजाभवानीला महाराष्ट्राची कुलस्वामिनी असे देखील संबोधले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांना हि देवी प्रसन्न होती व तीने त्यांना भवानी तलवार दिली अशी आख्यायिका आहे. देवीच्या नवरात्रात येथे भक्तांची खूप मोठी गर्दी असते. दसऱ्याला येथे सीमोलंघन खेळले जाते. त्यावेळी देवीची पालखी निघते. वर्षभर येथे विविध धार्मिक कार्यक्रम चालत असतात. कोजागिरी पौर्णिमेस लाखो देवी भक्त पायी तुळजापूरला जातात. महाराष्ट्रात जे काही देवींची शक्तिपीठे आहेत त्यात तुळजाभवानी हे एक आहे. अशाप्रकारे धार्मिक स्थळांनी सोलापूर हे वेढले आहे. सर्व धार्मिक ठिकाणे जवळपास असल्याने व सोलापूर येथे सर्व प्रकारची सोय असल्याने या ठिकाणी धार्मिक पर्यटन मोठया प्रमाणात होते. धार्मिक पर्यटनामुळे सोलापूरच्या एकंदरीत विकासात याचा मोठा हातभार लागला आहे लागत आहे. रेल्वे, बस, खाजगी वाहने, उत्तम हॉटेल्स, बाजारपेठ सोलापूर येथे आहे त्याच बरोबर विमानाची सोय सोलापूरला झाली तर या धार्मिक पर्यटनास आणखी वाढ होईल. नजीकच्या काळात विमानाची सोय देखील होईल अशी आशा करूया.

**श्री अंबिका देवी ही सांगोल्याची ग्रामदेवता आहे. मंदिरात पूर्वाभिमुख गाभाऱ्यात दर्शनास गेल्यावर तीन मूर्ती दिसतात. त्यामध्ये दक्षिणेकडील औंधची यमाई देवी मध्यभागी तुळजापुरची तुळजाभवानी व उत्तर दिशेकडे ग्रामदैवत अंबिकादेवी आहे. मंदिरापुढे मोठा सभा मंडप आहे. त्याला एकूण आठ स्तंभ आहेत. समोरील बाजूस दोन दीपमाळ आहेत. नवरात्रामध्ये नऊ दिवस देवीचा मोठ्या प्रमाणात नवरात्र उत्सव केला जातो. पुरोहित दुर्गा सप्तशतीचे या काळात पठण केले जाते व अष्टमीला मध्यरात्री होम प्रज्वलित करतात. त्यावेळी होमात पहिल्यांदा नारळ अर्पण करण्याचा बहुमान श्री पाटील घराण्याकडे आहे.**

# सांगोल्याचे ग्रामदैवत श्री अंबिका देवी



**सर्व सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके**
**शरण्ये त्रंबके गौरी नारायण नमोस्तुते**

देवीची यात्रा दरवर्षी माग शुद्ध प्रतिपदेपासून दशमी पर्यंत असते. या यात्रेमध्ये राज्यातील जनावराचा मोठा बाजार भरतो व कुस्त्यांचे



**श्रीकृष्णराज गुरव**
**मो. ९५७९३०५६५७**

फड ही या यात्रेतील मोठे आकर्षण असते. प्रदक्षिणा मार्गावर मारुतीमंदिर, खर्जाई, खोकलाई याही देवता आहेत. चिंतामणी एक गोलाकार दगड आहे. याला नमस्कार करून श्रद्धायुक्त अंतकरणाने हळुवार पद्धतीने त्याला दोन्ही हाताने धरतात तो कौल देतो. भाविकांचे विशेष महिलांची चिंतामणी पासून कौल जाणून घेण्याची गर्दी असते. अंबिका मातेला प्रामुख्याने पान पूजेचा नवस भाविक करतात. चोळीसाडी व तोरण,तसेच अपत्य प्राप्तीसाठी चांदीचा पाळणा अर्पण करतात. मंदिरामध्ये नित्य पूजा श्रीकृष्णराज तुकाराम गुरव (देवीपूजक) व गुरव बंधू वंशपरंपरेने करत आहेत.

**- संकलन-दिपक लक्ष्मण भाकरे, सांगोला**

# वैराग भागाच्या विकासासाठी वैराग तालुका होणे काळाची गरज



**वैराग तालुका निर्मिती ह्या विषयाशिवाय बार्शी तालुक्यात निवडणुक पार पडणे शक्यच नाही. तालुका निर्मितीचा विषय शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, कॉग्रेस आणि भाजप अशा सर्व पक्षानी हाताळल्यानंतर वैराग तालुका होऊ शकला नाही .**



रामदास पवार

मो. ७७५७०४८६०१

खासदारकी असो वा आमदारकी, जिल्हा परिषद असो वा पंचायत समिती प्रत्येक निवडणूकीत वैराग तालुका निर्मितीचा विषय गाजतोच, वैराग तालुका निर्मितीचा विषय आजपर्यंत प्रत्येक पक्षाने सोयीप्रमाणे चिघळला आहे पण वैराग तालुका मात्र निर्माण करू शकले नाहीत ही वैराग भागाची शोकांतिका म्हणावी लागेल .

वैराग भाग तसा स्वयंपूर्ण आहे, मात्र संपूर्ण शासकीय यंत्रणा बार्शी शहरात आहे. परिणामी लहानसहान गोष्टी पासून मोठ्या घटनांपर्यंत बार्शीलाच जावे लागते. हा त्रास टाळण्यासाठी आणि वैराग भागाच्या स्वतंत्र सर्वांगीण विकासासाठी वैराग तालुका होणे महत्वाचे आहे. त्यासाठी सुमारे तीस वर्षापासून वैराग भाग तालुका होण्याची वाट बघत आहे.

तालुक्यातील एकमेव मुख्य असलेली भोगावती नदी, तीन मध्यम प्रकल्प, संतनाथ कारखाना, शैक्षणिक संस्थाचे माहेरघर, उपबाजार समिती, पोलीस ठाणे, प्रशस्त शासकीय इमारती व मोकळ्या जागा, तुळजापूर -उस्मानाबाद - मोहोळ - माढा -बार्शी - उ.सोलापूर अशा सर्व तालुक्यांना जोडणारे मध्यवर्ती ठिकाण, शेती -प्रगतीचा चढता आलेख, आवश्यक असलेली लोकसंख्या, दळणवळणाच्या सुविधा , जिल्ह्याला जोडणारा जवळचा मार्ग, अध्यात्मिक वारसा अशा अनेक वैशिष्टपूर्ण बाबी लाभल्या असतानाही अद्याप तालुका होऊ शकलेला नाही. ह्यापेक्षा लहान असणाऱ्या ग्रामपंचायतीचे तालुक्यामध्ये रूपांतर झाले. मात्र, वैरागचा विषय रेंगाळतच राहिला. तालुका निर्मितीसाठी अनेक वेळा मागण्या, आंदोलने झाली. मात्र, राजकीय अनास्थेमुळे आजपर्यंत पदरी निराशाच पडली. स्वर्गीय मा.आ.चंद्रकांत नाना निंबाळकर खरे तर शेकापचे मात्र वैराग तालुक्याच्या निर्मितीसाठी शिवसेनेत प्रवेश केला. त्यावेळी शिवसेनेचे तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी वैरागमध्ये येऊन वैराग तालुक्याची घोषणा केली. मात्र ती घोषणा घोषणाच राहीली. त्यानंतर नारायण राणे मुख्यमंत्री झाले आणि मागणी तशीच राहीली. दरवेळी विविध पक्षांनी तालुका निर्मितीची आश्वासने दिली मात्र हालचाल कुणीच केली नाही.

दरम्यान शिवसेनाही तशी स्वनिर्णय घेण्यापर्यंत सत्तेत नव्हती. पाच वर्षापूर्वी विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी जेव्हा शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे बार्शीमध्ये आले होते. तेव्हा वैराग तालुका करू असा शब्द दिला होता. त्यावेळी ते राज्याचे मुख्यमंत्री झाले होते. त्यावेळी वैराग तालुका निर्मितीच्या आशा बळावल्या होत्या. परंतू त्यांचा कांही उपयोग झाला नाही. ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी धन्यकुमार भूमकर आणि आ. चंद्रकांत निंबाळकर यांनी वेळोवेळी आपआपल्या पध्दतीने मागण्या केल्या. आज त्यांच्या पश्चात त्यांचे पक्ष एकत्र आहेत. त्यामुळे तालुका निर्मितीचा निर्णय घेणे सोपे होणार आहे.स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे तीस वर्षापूर्वी शिवसेनेने केलेल्या घोषणेची पुर्तता त्यांचेच पुत्र माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे पूर्ण करतील अशी वैरागभागाला आशा निर्माण झाली होती पण वैरागकरांचा भ्रमनिरास झाला.

राजकीय उलथापालथ होऊन महाविकास आघाडीचे सरकार गेले आणि महायुतीचे सरकार आले पण आजपर्यंत वैराग तालुक्याचा विषय तसाच रेंगाळत राहीला आहे. छोटी छोटी राज्य, जिल्हा, तालुका निर्मितीतून विकास अधिक साधता येतो असा भाजपवाल्यांचेही म्हणणे आहे. आता तीन महिन्यामध्ये पुन्हा विधानसभेच्या निवडणूका होणार आहेत सर्वच पक्षाचे नेते पुढारी प्रचाराला येणार आणि वैरागभागाला वैराग तालुकानिर्मितीचे गाजर दाखविणार तरी वैरागभागातील सर्वच पक्षाचे नेते, पुढारी, जनता यांनी राजकीय मतभेद बाजूला ठेऊन वैराग भागाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र येणे गरजेचे आहे. यापुढे वैराग भागातील सर्वच पक्षाचे नेते पुढाऱ्यांनी एकत्रीत येऊन वैराग तालुका निर्मितीसाठी लढा देणे गरजेचे आहे.

वैराग तालुका निर्माण झाला तरच वैरागाचा सर्वांगीण विकास होऊन कायापालट होणार आहे.

---

**श्री सच्चिदानंद संतनाथ महाराज हे वैराग नगरीचे आराध्य दैवत असून महाराजांचा प्रवास हा नेपाळ प्रांतातून सुरू झाला. संतनाथ महाराज हे नाथ संप्रदायातील असून मच्छिंद्र गोरक्षनाथ यांच्या रूपात विराजमान आहेत. संतनाथ महाराज मार्गक्रमण करीत करीत ते महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या सानिध्यात आले. त्यानंतर वैराग येथील नगरीत साधनेस जाण्याचा आई तुळजाभवानीने आदेश दिला. त्यावेळी वैराग नगरी दंडकारण्यामध्ये विराजमान होती.**

## वैरागचे जागृत ग्रामदैवत

# श्री सच्चिदानंद संतनाथ महाराज





या दंडकारण्यामध्ये हिंस्र पशु, पक्षी ही होते. एक नदी ही वाहत होती.त्यामुळे संतनाथ महाराजांचा मुक्काम या नगरीत वाढला. संतनाथ महाराजांनी याच अभयारण्यात आपली साधना सुरू केली. त्यावेळी काही गुराखी पशु चालण्यासाठी अभयारण्याच्या आसपास येत होते. त्यामध्ये तात्याबा घोंगडे हे देखील होते. तात्याबा घोंगडे यांना साधुसंतांची सेवा करायला खूप आवडत असे, त्यांनी संतनाथ महाराजांना पाहिल्यानंतर त्यांच्या सेवेत रममान झाले. त्यांची भक्ती आणि निष्ठा पाहून पुढे संतनाथ महाराजांनी त्यांच्यावर प्रसन्न होऊन लक्ष्मीपुत्र असे वरदान दिले. त्यानंतर संतनाथ महाराजांची जाण्याची वेळ आली त्यावेळेस घोंगडे यांनी संतनाथ महाराजांना थांबण्याची विनंती केली.

त्या विनंतीचा मान करून महाराजांनी सध्याच्या मंदिरात संजीवन समाधी घेतली. संतनाथ महाराजांना अष्टसिद्धी प्राप्त असल्यामुळे एकाच वेळी आठ ठिकाणी प्रकट होऊ शकत. त्यांच्या आशीर्वादानेच तात्याबा घोंगडे यांनी संतनाथ महाराजांची बरीच मंदिरे व घाट बांधले. आजही ती बघायला मिळतात. संतनाथ महाराजांच्या संजीवन समाधीनंतर तेथे भव्य दिव्य मंदिर उभारण्यात आले. त्यांच्यानंतर नाथ संप्रदायाचे अनेक विद्वान साधुसंत या मंदिरात येऊन गेले आहेत. त्यात फुलनाथ, भूतनाथ त्रिवेणीनाथ महाराजांचा समावेश आहे. महाराजांच्या या यात्रेचा इंग्रजांच्या गॅझेट बुकमध्ये देखील समावेश आहे. राज्यातील सर्वात मोठी चौथ्या क्रमांकाची यात्रा अशी नोंद या गॅझेट मध्ये आढळते.

हे मंदीर प्राचीन असुन मंदीराची संपूर्ण बांधणी हेमाडपंथी दगडी आहे. हे मंदिर ई.स१६०२ मधील असुन मराठा कालखंडातील उल्लेख आढळतो. या मंदिरात संतनाथ महाराज यांची संजीवन समाधी घेतली आहे, असा इतिहासात दाखला मिळतो. या मंदीरावर उत्कृष्ट दगडी कलाकृती पाहून मन प्रसन्न होते. मंदिराच्या आतील मोकळ्या परीसरात नयनरम्य फुलांचा बगीचा भाविक भक्तांच्या सहकार्यातुन साकरण्यात येत आहे. श्री सच्चिदानंद संतनाथ महाराजांचा संजीवन समाधी सोहळा म्हणजे यात्रा श्रावण शुध्द नारळी पौर्णीमेला हा मुख्य दिवस संजीवन समाधी सोहळा म्हणून साजरा केला जातो. श्रावण महिन्यातच यात्रेचे पाच दिवस कार्यक्रम चालतात सर्व मानकरी एकत्र येऊन ही यात्रा साजरी केली जाते. सर्व जाती धर्माच्या लोकांना या यात्रेत मानकरी म्हणून मानाचे स्थान दिले जाते. संतनाथ महाराजांच्या अनेक आख्यायिका प्रसिद्ध असून भाविक भक्तांच्या मदतीला धावून येणारे जागृत देवस्थान म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे.

---

**सोलापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध व जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेले करमाळा तालुक्यातील जेऊर रेल्वे स्टेशन पासून पाच किलोमीटर पूर्व दिशेला असणारे तीर्थक्षेत्र ठिकाण म्हणजेच शेटफळ नागोबाचे या गावातील नागनाथ देवस्थान वरून या गावाची नागोबाची शेटफळ म्हणून सर्वत्र ओळख आहे देशातील अद्भुत व अनोखी वैशिष्ट्य असणारे गाव म्हणून या गावाची आज संपूर्ण जगात ओळख झाली आहे. त्याचे कारण म्हणजे या गावात मोठ्या संख्येने असणाऱ्या नागांमुळे असंख्य अस्सल कोब्रा जातीच्या नागाचे वास्तव्य या गावात असूनही गावातील घराघरांमध्ये मुक्तपणे वावरणाऱ्या हे नाव घरातील एक सदस्यच बनले आहेत या गावात दिसणाऱ्या नागांना मारलं जात नाही त्यांची पूजा केली जाते नागाला या गावाने देवत्व दिलेला असल्यामुळे त्याला या ठिकाणी अभय मिळालेला आहे यामुळेच या परिसरामध्ये त्यांचा सर्वत्र मुक्त संचार असतो**



# नागनाथ तीर्थक्षेत्र



नंदकिशोर वलटे

मो. ९९२१४२६०४८

**नागनाथ देवस्थान :-**

शेटफळ गावात गावाच्या पूर्व बाजूला नागनाथ मंदिर असून हे मंदिर प्राचीन यादव उत्तर काळातील हिमाडपंथी पद्धतीने बांधलेले आहे वर शिखर समोर गाभारा सो ही बाजूने दगडाची भव्य तटबंदी व आत शेटफळनाथ व नंदीचे अशी दोन छोटी मंदिरे आहेत तर घडवलेल्या मोठमोठ्या दगडातून आखीव रेखीवपणे बांधलेली सुबक अशी बारव देवालयाच्या भवितेची साक्ष देते. मंदिराच्या समोर हनुमानाचे दुसरे एक मंदिर आहे. मंदीराच्या पुर्वे ला मागे १५० बाय १५०फुट लांब रुंद व भव्य अशी पुष्करणी (पोखरण) तीर्थकुंड आहे. या तीर्थकुंडात स्नान करणे पुण्याचे मानले जाते.

**मंदीराचा इतिहास:-**

मंदिर बांधणीचा निश्चित कालावधी माहीत नसला तरी मंदिर बांधणीच्या रचनेवरून मंदिर प्राचीन यादव उत्तरकालीन असावे असा अंदाज जाणकार व्यक्त करत आहेत तर सौंदे महात्मय या हस्तलिखित प्राचीन ग्रंथांमध्ये या देवस्थानचा श्रेष्ठफळ असा उल्लेख असल्याचे सांगितले जाते. या ठिकाणच्या महादेव मंदिरामध्ये शेटफळण्यात या नाथपंथी साधूचे वास्तव्य असल्याने या गावाला शेटफळ असे नाव पडल्याची आख्यायिका ही सांगितली जाते तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळामध्ये ज्यावेळेस अफजलखान शिवाजी महाराजांच्या बंदोबस्त करण्यासाठी आला होता त्यावेळी राजांना दिवचण्यासाठी अफजलखानाने अनेक मंदिरे उद्धवस्त केल्याचा उल्लेख इतिहासामध्ये आढळतो त्याच काळात अफजलखानाचे सैनिक या गावातही येऊन या मंदिराबाहेरील काही मूर्ती त्यांनी फोडल्या. मुख्य मूर्ती फोडण्यासाठी मंदिरात प्रवेश करण्यापूर्वीच मंदिरातून भुंगे निघून त्यांनी या सैनिकांचा पाठलाग केला व त्यांना पळवून लावले अशीही आख्यायिका या मंदिराच्या संदर्भात सांगितली जाते.

**मंदिरातील मूर्ती :-**

नागनाथ देवालयात नागनाथ देवाची मुख्य धातूची सुबक आकाराची मूर्ती असून तिच्यावर नागफणी आहे तर समोर शिवलिंग आहे नाग ही देवता शंकराच्या गळ्यात असल्यामुळे या मूर्ती पुढे शिवलिंग असल्याचे सांगितले जाते तसेच या मंदिराच्या आवारातील महादेव मंदिरात एक व मुख्य मंदिराच्या उत्तर व दक्षिण बाजूस अशी तीन ठिकाणी शिवलिंग आहेत. मुख्य मंदिरासमोर दोन नंदी देवतेच्या भव्य मूर्ती आहेत. यामधील काही काळाची मूर्ती भग्न पावल्याने ग्रामस्थांनी तिथे त्याच आकाराच्या नवीन मूर्तीची प्रतिष्ठापना करून भव्य असा कार्यक्रम आयोजित करून केली होती. यावेळी गावातून नवीन मूर्तीची भव्य आणि दिव्य स्वरूपाची मिरवणूक काढण्यात आली होती या मिरवणुकीमध्ये टाळ पखवाजाच्या दिंडी बरोबरच लेझीम पथक बँड पथक सहभागी झाले होते न भूतो न भविष्यती असा सोहळा यावेळी झाला होता.



**दैनंदिन पूजाविधी :-** या देवाची आरती दिवसातून दोन वेळा पहाटे पाच वाजता व सायंकाळी सात वाजता केली जाते मंदिरामध्ये फार पूर्वीपासून श्री नंदादीप ठेवण्यात आला असून तो अखंडपणे तेवत असतो दरवर्षी यात्रेच्या लोकवर्गणीतून त्याच्या तेलाची व्यवस्था केली जाते

**देवस्थानचे वैशिष्ट्ये :-**

शेटफळ गावात नागांना मारले जात नाही. त्यामुळे गावात नागांची संख्या मोठी आहे. गावातील घराघरांमध्ये नाग निघतात गावातील मोकळ्या जागेत पडलेल्या घरांमध्ये तर हमखास नागाचे वास्तव्य असते. त्यांचा सर्वत्र मुक्त संचार सुरू असतो. घरात निघालेल्या नागाला छोट्याशा काठीवर घेऊन गावाबाहेर मंदिराच्या मागे असलेल्या मोकळ्या जागेतील नैसर्गिक अधिवासात सोडले जाते. हे नाग पुन्हा गावात येतात. घरातील महिला लहान मुले व बाहेरगावचे लोक घाबरू नयेत म्हणून त्यांना पुन्हा काठीवर घेऊन गावाबाहेर सोडले जाते. गावात निघालेले नाग त्यांना बहिण असल्यामुळे खूप वेळ एकाच ठिकाणी थांबलेले दिसतात. इतर गावात नाग एका जागेवर फार वेळ थांबत नाही. त्याला काटेवर घेतल्यावर त्या काठीला विशिष्ट अशी आपल्या शरीराची गाठ मारून शांतपणे गावाबाहेर सोडेपर्यंत त्या काठावर थांबतो हे सुद्धा एक आगळे वेगळे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. गावात पाच ते आठ फूट लांब व जाड असे नाग ठिकठिकाणी दिसतात. लोकांना नागाची व नागाला गावातील लोकांचे अजिबात भीती वाटत नाही लहान मुले पटांगणात खेळत असली जवळ नाग दिसला तर मुलं आनंदाने टाळ्या वाजवतात. देवबाप्पा निघाला, देवबाप्पा निघाला असे म्हणत आनंद व्यक्त करतात. लांबूनच त्याचे दर्शन घेतात व आपल्या खेळामध्ये दंग होतात या गावात शेतात काम करताना पायाखाली नाग आल्याची शेकडो उदाहरणे आहेत. घरात रात्री अंथरुणात उशाला पायाखाली नाग निघाल्याचेही कित्येक उदाहरणे आहेत एवढेच काय तर लहान मुलांच्या पाळण्यात देखील नाग निघाल्याची अनेक उदाहरणे सापडतात. परंतु कोणालाही दगा होत नाही. एक दोन उदाहरण सोडले तर आज पर्यंत फारसे नागदंशाचे प्रकार येथे घडले नाहीत. झाल्यानंतर विष उतरवणे, पूजा बांधणे असे वैज्ञानिक उपचार येथे केले जात नाहीत. गावांमध्ये नवीन आलेली पाहुणे मंडळी रात्री मुक्कामाला या गावात थांबण्यासाठी तयार असतात. दिवसा एखादा मला मोठा नाग बघितलेला असल्यास त्यांना रात्रभर झोप लागत नाही.

गावातील घरात व बाहेर पटांगणामध्ये झोपलेली मंडळी आपले अंथरून करताना रात्री जरी नाग आला तरी तो निघून जावा यासाठी सर्व बाजूने पुरेशी जागा ठेवून आपले अंथरून टाकतात. आणि निश्चिंत मनाने झोप घेतात. गावात लग्न झाल्यानंतर आलेल्या नववधूंना काही दिवस नागांची भीती वाटते खरी परंतु नंतर सवय झाल्यावर त्यांची भीती संपत्ती या गावातील लोक व नाग यांचे भावनिक नाते निर्माण झाले असून आपल्या देवाला कसलाही त्रास होणार नाही याची दक्षता गावातील प्रत्येक जण घेत असतो. पूर्वी गावात नवीन घर बांधल्यानंतर नागांचा मुक्तपणे संचार या घरात व्हावा यासाठी लाकडी माळवादामध्ये एक मध्ये लाकडाच्या मध्ये पोकळी ठेवून नागांना मुक्तपणे संचार करण्यासाठी आवर्जून जागा ठेवली जात असायची. या ठिकाणी नागांचे वास्तव्य असायचे सध्या सिमेंट काँक्रीटच्या बांधकामात ते शक्य नसले तरी गावातील पडलेल्या घरात अडगळीच्या जागेत नागांचा आजही मुक्तपणे संचार असतो.

# करमाळा तालुक्याचा पायाभूत विकास करणारा नेता - आ. संजयमामा शिंदे

**भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अगदी प्रारंभीच्या काळात करमाळा तालुक्याचेच नव्हे तर सोलापूर जिल्ह्याचे नेतृत्व कै.नामदेवराव जगताप यांनी केले.त्यांच्या प्रदीर्घ कार्यकाळात तालुक्याला सर्वच क्षेत्रात जी दिशा मिळाली होती ती त्यांच्या पश्चात तालुक्याचे प्रतिनिधित्व करणारांना टिकवून ठेवता आली नाही याउलट ती जास्तच रसातळाला गेली.जिल्ह्याच्या राजकारणात आसलेला करमाळा तालुक्याचा दबदबा कै.नामदेवराव जगताप यांच्यानंतर संपला. त्यानंतर बाहेरच्या तालुक्यातील नेतेमंडळींनी करमाळ्यातील लोकप्रतिनिधींचा रीमोट कंट्रोल सतत आपल्या हातात ठेवून त्यांना कळसूत्री बाहुल्याप्रमाणे नाचवत ठेवण्यात धन्यता मानल्यामुळे तालुक्याचा विकास थांबला.पूर्णपणे थांबलेला करमाळा तालुक्याचा पायाभूत विकास कै.नामदेवराव जगताप यांचेनंतर २०१९ साली आमदार संजयमामा शिंदे यांनी करमाळा तालुक्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर पुन्हा सुरू झाला.**

विकास ही चिरंतन आणि निरंतर चालणारी प्रक्रिया असते .कोण्या एका लोकप्रतिनिधीने जादूची कांडी फिरवली आणि लगेच मतदार संघाचा कायापालट झाला असं कधीच घडत नसतं ,परंतु मतदारसंघाच्या उभारणीसाठी ज्या काही पायाभूत सुविधा असतात त्या सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे, तालुक्याची ओळख जिल्ह्यात, राज्यात निर्माण करणे ,ऐतिहासिक वारसा जतन करणे व त्याचे संवर्धन करणे,तालुक्याची अस्मिता जपणं हे लोकप्रतिनिधींचे आद्य कर्तव्य असतं. विशेषतः रस्ते, पाणी , वीज, शिक्षण,आरोग्य, प्रशासकीय इमारती, ऐतिहासिक वारसा असलेली तीर्थक्षेत्रे, गड ,कोट ,किल्ले यांचे जतन व संवर्धन करणे या बाबतीमध्ये मूलभूत आणि भविष्यकालीन नियोजन डोळ्यापुढे ठेवून लोकप्रतिनिधींनी काम करणे अपेक्षित असतं या निकषावरती आमदार संजयमामा शिंदे यांचे नेतृत्व अगदी कसोटीवरती उतरताना दिसते.

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या करमाळा शहराकडे व ग्रामीण भागातील ऐतिहासिक वास्तूंकडे सर्वच लोकप्रतिनिधींचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आपल्याला दिसते.आमदार शिंदे यांनी मात्र या बाबींकडे लक्ष देताना याचे संवर्धन आणि विकास यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक निधीची तरतूद केलेली दिसून येते. करमाळा शहरातील सर्वच प्रशासकीय कार्यालयांच्या इमारती या मोडकळीस आलेल्या आहेत. प्रशासकीय संकुल बांधकामासाठी तब्बल ३४.६८ कोटी निधी, सहाय्यक निबंधक कार्यालयासाठी २ कोटी निधी, करमाळा नगरपरिषद इमारत, सांस्कृतिक सभागृह, छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा बांधकाम यासाठी १० कोटी निधी, किल्ला संवर्धनासाठी २ कोटी, कमला भवानी मंदिर विकासासाठी ४ कोटी, ग्रामीण भागांतील चिखलठाण, संगोबा, अवाटी, शेटफळ इत्यादी तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ५ कोटी निधी ही कामे मंजूर आहेत. तर नव्याने कमलाभवानी मंदिर विकासासाठी ५ कोटी, करमाळा शहरांतर्गत रस्ते विकास आराखड्यासाठी ७२ कोटी व करमाळा शहर उजनी धरणावरून नवीन पाईपलाईन साठी ८७ कोटी निधी प्रस्तावित आहे.ही सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर करमाळा शहराचा चेहरा मोहरा निश्चितच बदललेल यात शंका नाही.

आ.शिंदे यांनी मतदारसंघातील रस्ते आणि पुल बांधकामासाठी अर्थसंकल्पात तब्बल ३६१ कोटीहून अधिक निधी मंजूर करून आणलेला आहे.यामध्ये प्रामुख्याने उजनी धरणावरील डिकसळ पुलासाठी ५५ कोटी निधी मंजूर असून त्याचे काम सुरू आहे .या पुलाबरोबरच उजनी धरण पात्रात पोमलवाडी ते गंगावळण व गोयेगाव ते आगोती या ठिकाणी नव्याने पुल बांधकामासाठी प्रस्ताव राज्य सरकारकडे दाखल केलेले आहेत. कुगाव ते शिरसोडी या पुलाला मंजुरी मिळालेली आहे. या पुलांच्या निर्मितीनंतर उजनी धरणाच्या निर्माणासाठी ज्या लोकांनी आपल्या जमिनी, घरे दिली अशा पुनर्वसित गावठाण मध्ये राहणाऱ्या लोकांचा दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. जेऊर ते शेटफळ चिखलठाण, कुगाव रस्ता तसेच अर्थसंकल्प व प्रधानमंत्री ग्रामसडक मधून फिसरे, हिसरे, हिवरे ,कोळगाव ,निमगाव ह, गौडरे हा रस्ता, हिवरवाडी ते दक्षिण वडगाव रस्ता , कुंभेज ते आळसुंदे रस्ता,वीट ते उमरड रस्ता, सटवाई ते नीलज बिटरगाव श्री रस्ता, रामवाडी ते कावळवाडी जिंती गेट रस्ता अशा दुर्लक्षित रस्त्यांना निधी दिल्यामुळे या भागातील दळणवळण सुलभ होणार आहे. गेल्या १२ वर्षापासून प्रलंबित असलेला जातेगाव ते टेंभुर्णी हा महामार्ग राज्य सरकारकडून राष्ट्रीय महामार्गाकडे हस्तांतरित करण्यासाठी आवश्यक असलेला राज्य सरकारचा ना हरकत दाखला मिळवून देण्यामध्ये आमदार शिंदे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.या रस्त्यासाठी १२३४ कोटी १२ लाख एवढा निधी मंजूर आहे.क्व् अंतर्गत महाराष्ट्रातील सर्वाधिक ७१ किलोमीटर लांबी असलेल्या सावडी ते वेणेगाव या रस्त्याला तब्बल २७१ कोटी निधी आमदार शिंदे यांनी उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या माध्यमातून मिळवला आहे. या रस्त्यामुळे सावडी, राजुरी, विहाळ, पोंधवडी, अंजनडोह, झरे, कुंभेज, कोंढेज, निंभोरे, मलवडी, केम ही ११ करमाळा तालुक्यातील गावे व उपळवटे ,दहिवली, कन्हेरगाव, वेणेगाव ही ४ माढा तालुक्यातील गावे अशी एकूण १५ गावे सोलापूर, पुणे या राष्ट्रीय महामार्गाला व नगर जिल्ह्याला हमरस्त्याने जोडली जाणार आहेत.


डॉ. विकास वीर

पाणी प्रश्नाच्या बाबतीतही आमदार संजयमामा शिंदे यांनी पायाभूत काम केलेले आहे.तालुक्यातील १०४ गावातील पाणीपुरवठा योजनांसाठी जलजीवन मिशन योजनेच्या माध्यमातून जवळपास ९५ कोटी ८८ लक्ष निधी मिळवला असून मंजूर कामांपैकी ५० टक्के कामे पूर्ण पूर्णत्वास गेली आहेत. सलग ५ वर्षे सातत्याने दहिगाव उपसा सिंचन योजना चालवून आमदार शिंदे यांनी एक आदर्श निर्माण केला आहे.वर्षातील ३६५ दिवसांपैकी सरासरी २५० दिवस खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामामध्ये दहिगाव योजना चालवल्यामुळे या योजनेबद्दलचा विश्वास तालुक्याच्या पूर्व भागातील २४ गावांमध्ये निर्माण झाल्यामुळे आज दहिगावच्या दोन्ही टप्प्यातील सर्व गावात केळी, ऊस या बारमाही पिकांसह तरकारी व फळबाग लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल वाढलेला असून जवळपास ७ हजार हेक्टर क्षेत्रावरती बारमाही पिकांची लागवड केली जात आहे. या योजनेची उर्वरित अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी १०९ कोटी रुपये मिळाल्यामुळे सर्वच कामे आता पूर्ण होणार आहेत.ही कामे बंद नलिका वितरण प्रणालीने होणार असल्यामुळे या बचत झालेल्या पाण्यामधून मतदार संघांतील इतर १४ गावे या योजनेत समाविष्ट होणार आहेत.




कुकडी प्रकल्पाचे पाणी करमाळा तालुक्याला पूर्ण दाबाने मिळावे यासाठी आमदार संजयमामा शिंदे यांनी विधानसभा सदस्य पदाची शपथ घेतल्यानंतर कुकडी प्रकल्प धरण साखळी पासून ते करमाळा तालुक्यापर्यंत कुकडीच्या मुख्य कॅनॉलची पाहणी केली. तालुक्यातील कॅनॉलची दुरुस्ती, झाडे झुडपे काढणे आदी कामे केल्यानंतरही डिस्चार्ज मध्ये विशेष फरक पडत नाही आणि असेच पाणी माझ्या तालुक्याला मिळत राहिले तर कुकडी लाभक्षेत्रातील सर्वच गावांच्या घशाला कायमची कोरड राहणार आहे हे लक्षात आल्यानंतर आमदार शिंदे यांनी कुकडी प्रकल्पातील करमाळा तालुक्याच्या हक्काचे ५.५० टीएमसी पाणी उजनी धरणात सोडून ते २ उपसा सिंचन योजना राबवून तालुक्यातील कुकडीच्या लाभ क्षेत्रातील ४० गावांना पाणी देण्याची योजना साकारण्याच्या दृष्टीने महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात पत्र व्यवहार सुरू केला. आज महायुती सरकारच्या कार्यकाळामध्ये सदर योजनेच्या सर्वेक्षणासाठी ४७ लक्ष निधी मंजूर झाला असून लवकरच सदर कामाची निविदा निघून प्रत्यक्ष सर्वेक्षणाला सुरुवात होणार आहे. कुकडी प्रकल्पातील मूळ कॅनॉल मध्ये पाणी सोडण्याची ही योजना असल्यामुळे संपूर्ण योजनेला अंदाजे ४२४ कोटी खर्च अपेक्षित आहे. २ उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून उजनी धरणातील पाणी करमाळा तालुक्याच्या कुकडी लाभ क्षेत्रातील गावांना देण्याची ही योजना असल्यामुळे भविष्यात मांगी तलाव आणि मांगी तलावावरती अवलंबून असणाऱ्या १२ -१३ गावांना पाणी मिळण्याचा मार्गही यामुळे सूकर होणार आहे.

कुकडी प्रकल्प व दहिगाव योजना याव्यतिरिक्त सीना नदीवरील पोटेगाव बंधारा दुरुस्तीसाठी ४ कोटी निधी मंजूर असून लवकरच त्याचे काम सुरू होणार आहे. त्याचबरोबर सीना नदीवरील तरटगाव व संगोबा या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे लातूर पॅटर्न बंधाऱ्यांमध्ये रूपांतरित करण्यासाठी प्रस्ताव, आवाटी येथे सीना नदीवरती बांधण्यात येत असलेला नवीन बंधारा या कामांबरोबरच जलसंधारण विभागाच्या माध्यमातून घारगाव, केडगाव, भोसे, जातेगाव, कोर्टी, वडाचीवाडी आदी गावांमध्ये तलाव दुरुस्तीची कामे मोठ्या प्रमाणावर ती सुरू आहे. कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेअंतर्गत उजनी धरणातून मराठवाड्यासाठी चाललेल्या २७ किलोमीटर बोगद्याचे ९ शाफ्ट करमाळा तालुक्यामध्ये आहेत. यामध्ये दहिगाव, जेऊर, कोंढेज, सरपडोह, सौंदे, शेलगाव क, अर्जुननगर, मिरगव्हण या शाफ्ट मधून शेतकऱ्यांना पाणी उचलण्यासाठी परवानगी मिळावी यासाठी ही आमदार शिंदे प्रयत्नशील आहेत.एकूणच पाणी या महत्त्वाच्या विषयावरती आमदार संजयमामा शिंदे पायाभूत काम सुरू आहे.

२०१४ ते १९ या कालावधीत करमाळ्यात एकही नवीन सबस्टेशन कार्यान्वित झालेले नसल्यामुळे २०२० साली तालुक्यातील वीज समस्येचा प्रश्न जटील होता. वीज समस्येवरती उपाय योजना करण्यास आमदार शिंदे यांना यश आले असून ५ वर्षाच्या कालावधीमध्ये आवाटी, राजुरी, रायगाव ही ३ नवीन सबस्टेशन करमाळा तालुक्यात उभा राहिली. त्यांची कामे आज प्रगतीपथावर आहेत .याबरोबरच कात्रज, कोर्टी, पांडे, कविटगाव, दहिगाव, शेटफळ, कव्हे ,म्हैसगाव ,बारलोणी या सबस्टेशनची क्षमता वाढ झाल्यामुळे शेतकऱ्यांना पुरेशा दाबाने वीज उपलब्ध होत आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी या योजनेअंतर्गत साडे, वीट, व लव्हे येथील सबस्टेशन विस्ताराची कामे पूर्ण होत आहेत. त्याचबरोबर वांगी २ ,ढोकरी, गुलमोहरवाडी, सौंदे, पोमलवाडी ,हिंगणी ,उपळवाटे या ठिकाणी नवीन सबस्टेशन उभा करणे व कोळगाव, झरे ,उमरड, शेटफळ, बारलोणी, चोभेपिंपरी या सबस्टेशनची क्षमतावाढ करण्याची मागणी प्रस्तावित आहे.

आरोग्य सुविधेच्या बाबतीतही तालुक्यात पायाभूत काम सध्या सुरू आहे. करमाळा उपजिल्हा रुग्णालय येथील रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून १०० कॉटमध्ये आमदार शिंदे यांनी रूपांतर केले आहे .त्यातील २० बेड हे अतिदक्षता विभागाचे आहेत. या रुग्णालयासाठी २५ कोटी २० लाख निधी मंजूर असून त्यातून कामे सुरू आहेत. तसेच उपजिल्हा रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानाकरिता १८ कोटी ६८ लाख, कुर्डूवाडी ड्रामा केअर साठी ७ कोटी २० लाख याबरोबरच कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजनेच्या माध्यमातून ऑक्सिजन लाईन , ऑक्सिजन प्लांट, अस्थिव्यंगाचे दिव्यांग प्रमाणपत्र वाटप सुविधा , सिझेरियन ची सुविधा,डिजिटल एक्सरे सुविधा ,हर्निया व गर्भाशयाची पिशवी काढणे सुविधा ,कायमस्वरूपी भूलज्ञाची नियुक्ती इत्यादी सुविधा दिल्या जात आहेत. जेऊर येथील ग्रामीण रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यामध्ये प्रामुख्याने गुळसडी, उमरड ,सावडी ,वडशिवणे इत्यादी उपकेंद्रांचे बांधकाम पूर्णत्वास गेलेले आहे.स्टाफ मंजुरीनंतर तिथे आरोग्य सुविधा उपलब्ध होतील. करमाळ्यात वरिष्ठस्तर न्यायालय मंजूर करण्याच्या कामातही आमदार शिंदे यांनी पुढाकार घेतला आणि त्याला मंजुरी मिळून प्रत्यक्षात कामाला सुरुवातही झालेली आहे. शेलगाव वांगी येथे केळी संशोधन केंद्र व्हावे याबाबतीतही त्यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू असून ते लवकरच मार्गी लागेल. याचबरोबर आमदार फंड ,समाज कल्याण विभाग, दलित वस्तीचा निधी, अल्पसंख्यांक विभागाचा निधी ,जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून जन सुविधा, नागरी सुविधा, तीर्थक्षेत्र ,शाळा दुरुस्ती, ३०५४,५०५४ ,गट ब चा निधी तसेच पुनर्वसन विभाग, क्रीडा विभाग या निधीच्या माध्यमातूनही प्रत्येक गावापर्यंत आमदार शिंदे पोहोचलेले आहेत..




सोलापूर 'तरुण भारत'
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
हजरत ख्वाजा हाजी सैफुल मुल्ख चिस्ती
दर्गाह वक्फ हैद्रा, ता.अक्कलकोट
शुभेच्छुक :
चेअरमन
मा.रफिक सिराजोद्दीन मुजावर
व्हाईस चेअरमन
मा.बंदानवाज तालाबली मुजावर
सेक्रेटरी
मा.वकील नबीसाब मुजावर




सोलापूर 'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!
शुभेच्छुक
मा.संभाजीराव जाधव
राष्ट्रीय महासचिव, संयुक्त भारत पक्ष
मो. ८७७९८३९०७१




आमदार
मा. बबनराव शिंदे
मालक
मा.रमेश मालक शिंदे
आदर्श सरपंच
मा.यशवंत भैय्या शिंदे
करमाळा,माढा विधानसभेचे लोकप्रिय आमदार
मा.संजयमामा शिंदे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
सोलापूर 'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!
शुभेच्छुक
दादाश्री
हॉटेल अँन्ड लॉजिंग चिंचगाव

सोलापूर 'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!
मा. डॉ.डी.टी.पवार
बी.एस.सी./एल.एल.एम/पीएडी (लॉ)
(प्रादेशिक परिवहन अधिकारी सेवानिवृत्त)
सौजन्य : सतगुरु चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर
संदेश : मानव धर्म एक आहे. सर्व योनीमध्ये मनुष्य योनी श्रेष्ठ आहे. मनुष्य जीवन हे भौतिक कर्तव्य पार पाडून सदगुरुचा शोध घेऊन. आत्मज्ञान प्राप्त करण्यासाठी आहे. मनुष्य जीवन हे अपघातामध्ये मृत्यूमुखी पडण्यासाठी नाही. सबब वाहतुकीचे नियम पाळा आणि अपघात टाळून सुरक्षित प्रवास करा.




सोलापूर 'तरुण भारत'
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
श्री साई चॅरिटेबल ट्रस्ट
गट नंबर ६७, सोलापूर-बार्शी हायवे, सासुरे-वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर महाराष्ट्र पिन - ४१३४०२
* साई आयुर्वेदिक महाविद्यालय अँड रिसर्च सेंटर
* साई होमिओपॅथी हॉस्पिटल
* इंदिरा पॉलिटेक्नीक (डिप्लोमा इंजिनिअरींग)
* श्री साई औद्योगिक प्रशिक्षण संस्था
* स्केल इंडिया कौशल्य प्रशिक्षण केंद्र
* सर्व सोयीनियुक्त सुसज्ज इमारती
* मुलांसाठी २ स्वतंत्र वस्तीगृह
* मुलींसाठी २ स्वतंत्र वस्तीगृह
* विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीयुक्त खेळाचे मैदान
अध्यक्षा
डॉ.मिरा सुर्यवंशी



**जेव्हा एखादा रुग्ण उत्तम व कमी खर्चात उपचारासाठी दुसऱ्या गावी जातो, तेथे उपचारानंतर तो रुग्ण आणि त्यांच्यासोबत आलेली मंडळी गावी परत जाताना त्या गावातील पर्यटन स्थळांना भेट देतात व थोडी फार खरेदी करतात यालाच वैद्यकीय पर्यटन असे संबोधले जाते.**



# सोलापूर : प्रसिद्ध वैद्यकीय पर्यटन केंद्र




सोलापूर म्हटलं की नजरेसमोर अनेक गोष्टी येतात त्यामध्ये सोलापूरची चादर, टॉवेल, नॅपकिन, अनेक साखर कारखाने, एक्स्पोर्ट दर्जाचे द्राक्षे, डाळींब, सिद्धेश्वर मंदिर, सोलापूरची शेंगा चटणी, हुरडा पार्टी, पक्ष्यांचं माहेरघर, स्मार्ट सिटी, विविध खाद्य संस्कृती व अलीकडील काही वर्षांमध्ये शेती या क्षेत्रात होणारी प्रचंड प्रगती याबरोबर आवर्जून लक्षात येणारी गोष्ट म्हणजे सोलापूर हे एक उत्तम वैद्यकीय पर्यटन केंद्र.

मी माझा अनुभव आपणासमोर मांडत आहे. १९७५ पासून जसे मला कळते तसे आमच्या घरी आमचे अनेक नातेवाईक हे वैद्यकीय उपचार घेण्यासाठी कर्नाटकातून सोलापूरमध्ये आवर्जून येत आणि आमच्या घरी वास्तव्य करीत असत. अशीच काही परिस्थिती आमच्या घराच्या अवतीभवती असलेल्या अनेक लोकांच्या घरी पहावयास मिळायचे. जवळजवळ माझा मागील ४५ वर्षाचा अनुभव पाहता आजही अशा रुग्णांचा ओढा सोलापूरकडे असलेला पहावयास मिळतो.

मी आठवी इयत्तेत होतो तेव्हा सोलापुरातील वाडिया हॉस्पिटल, सिव्हिल हॉस्पिटल,अनेक प्रसिद्ध डॉक्टरांच्या नर्सिंग होममध्ये सोलापूरच्या आजूबाजूला असलेल्या अनेक जिल्ह्यातून तसेच लगतच्या राज्यातून अनेक रुग्ण उपचारासाठी सोलापूरला येत असत. आजही सोलापूरमध्ये अनेक जिल्ह्यातून व परराज्यातून रुग्ण उत्तम व कमी दरामध्ये उपचार मिळत असल्याने मोठ्या संख्येने येत असताना पाहतो. सोलापूर नजीकच्या महानगरात स्थायिक झालेले सोलापुरातील अनेक कुटुंबातील सदस्य हे वैद्यकीय उपचारासाठी परत सोलापुरात येतात.

सोलापूर हे मागील अनेक दशकापासून एक उत्तम वैद्यकीय पर्यटन केंद्र असण्याची अनेक कारण आहेत त्यामध्ये प्रामुख्याने येथे असलेले वैद्यकीय क्षेत्रातील अनुभवी तज्ञ डॉक्टर्स, उत्तम व कमी दरामध्ये उपचार, उत्तम आधुनिक उपचार, अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज असलेले नर्सिंग होम व मोठी रुग्णालय, उत्तम रुग्णसेवा, रुग्णांच्या आजाराच्या तपासणीसाठी असलेल्या उत्तम व अत्याधुनिक लॅबोरेटरीज, उत्तम पॅरामेडिकल स्टाफ, राहण्यासाठी वन स्टार ते फाईव्ह स्टार हॉटेल्स, सोलापूरच्या नजीक असलेले अनेक पर्यटन स्थळ समावेश होतो. वैद्यकीय पर्यटनाने इतर उद्योगधंद्यांना व व्यावसायिकांना लाभ होतो उदाहरणार्थ हॉटेल्स, लॉजेस, रेस्टॉरंट ,लॉज, प्रवासी वाहने, पर्यटन केंद्रास,आणि अनेक वस्तूंची खरेदीसाठी असलेली दुकाने वगैरे. सोलापूर हे शहर जवळच्या अनेक जिल्ह्यांना,महानगरांना, मराठवाडा, कर्नाटक राज्य व आंध्र प्रदेश यांना उत्तम रस्ते व रेल्वे जोडलेले असल्यामुळे त्याचा फायदा वैद्यकीय पर्यटनासाठी होत आहे.



मला सोलापूर मधील वैद्यकीय क्षेत्राबद्दल खूप अभिमान व आदर आहे. येथे असलेले वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत सर्व डॉक्टर्स, फिजोथेरपीस्ट, टेक्निशियन, पॅरामेडिकल स्टाफ, नर्सिंग स्टाफ, फार्मासिटिकल्स हे आपापल्या क्षेत्रात प्राविण्य मिळवलेले आहेत. सोलापुरातील अनेक तज्ज्ञ डॉक्टर्स राज्यस्तरीयच नवे तर राट्रीयस्तरीय संघटनेवर उच्च पदावर कार्य करीत आहेत याचा सोलापुरातील प्रत्येक नागरिकासने अभिमान बाळगावे.

सोलापुरात प्रामुख्याने ऑर्थोपेडिक सर्जरी, जॉईंट रिप्लेसमेंट, आर्थ्रोस्कोपिक सर्जेरी, गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी, प्लास्टिक सर्जरी, लॅप्रोस्कॉपिक सर्जरी, न्यूरोलॉजी, न्यूरोसर्जरी, किडनी प्रत्यारोपण, बालरोग शस्त्रक्रिया, कॅन्सर, फुफ्फुस रोगावरील तज्ज्ञ, वंध्यत्व उपचार, नेत्ररोग, युरोलॉजी, कार्डिओलॉजी, मानसोपचार, डेंटिस्ट, फिजिओथेरपिस्ट, आयुर्वेद तज्ज्ञ, होमिओपॅथी, आणि दंत चिकित्सा यावर अनेक अद्यावत नर्सिंग होम व रुग्णालयातून उत्कृष्ट कार्य होत आहे. सोलापुरात रुग्णाच्या रोगनिदानासाठी व उचारासाठी लागणारी आधुनिक उपकरणे उपलब्ध असून त्यामध्ये सिटी स्कॅन, एम.आर.आई., लेसर थेरपी, आय.सी.यू., व्हेंटीलेटर्स, लासिक उपकरणे वगैरे यांचा समावेश होतो.



**डॉ. व्यंकटेश मेतन**

**मो. ९३७००८००९०**

माझा अनुभव असा आहे की रुग्णांना सोलापूर मधील मिळणारी रुग्णसेवा ही उत्तम दर्जाची मिळतेच त्याचबरोबर ती इतर महानगरापेक्षा कमी खर्चिक असते. सोलापूरमधील सर्व वैद्यकीय तज्ञ मंडळी हे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांबरोबर सुसंवाद करण्यासाठी योग्य तो वेळ दिला जातो यामुळे डॉक्टर व रुग्ण यांचं एक घनिष्ठ नातं निर्माण होतं. त्यामुळे रुग्ण व रुग्णाचे नातेवाईक यांचं समाधान होतं.

सोलापुरात अनेक अत्याधुनिक शस्त्रक्रिया उपचार हे महानगराच्या मानाने अल्प दरात केल्या जातात. उदाहरणे देण्यासारखे अनेक उपचार क्रिया किंवा शस्त्रक्रिया यांचा उल्लेख करता येईल पण मी काही शस्त्रक्रिया यावर काही गोष्टी आपणास सोबत सामायिक करीत आहे. गुडघ्याचे सांधा रोपण या शस्त्रक्रियेसाठी भारतातील महानगरामध्ये येणारा खर्च हा तीन लाखांमध्ये जातो. पण हीच शस्त्रक्रिया सोलापुरात दीड ते दोन लाखांमध्ये केली जाते. मणक्याच्या आजारासाठी स्पायनल फ्युजन या शस्त्रक्रियेसाठी भारतातील महानगरामध्ये याचा खर्च तीन ते साडेतीन लाख पर्यंत जातो पण हीच शस्त्रक्रिया सोलापूरमध्ये दीड ते दोन लाखांमध्ये केली जाते. पित्ताशयातील खडे काढण्याच्या लॅप्रोस्कोपचे या शस्त्रक्रियेसाठी भारतातील महानगरामध्ये येणारा खर्च हा दोन ते अडीच लाखांमध्ये जातो पण हीच शस्त्रक्रिया सोलापुरात पंच्याहत्तर हजार रुपयात केली जाते.

मागील दीड दोन वर्षांपूर्वी आलेल्या कोरोनाच्या महाभयंकर लाटेत सोलापूरच्या नजीक असलेल्या अनेक शहरातून तसेच महानगरातून व परराज्यातून मोठ्या प्रमाणात रुग्ण उपचारासाठी सोलापूरला प्राधान्य दिलेलं आढळत. मी अश्या बाहेरच्या शहरातून व महानगरातून सोलापुरात आलेल्या कोरोना रुग्णांना उपचारास अनेक रुग्णालयात ऍडमिट करण्यास मदत केली. मला सांगण्यास आनंद होतो कि हे रुग्ण बरे होऊन जाताना सोलापुरात मिळालेल्या उत्तम उपचार मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करून येथील डॉक्टरांचे कौतुक केले.

मागील चार-पाच वर्षात सोलापूरला जोडणारी सहा राज्य व राष्ट्रीय महामार्ग ही चार पदरी झाल्यामुळे रुग्णसेवा घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढलेली दिसते. त्यामध्ये प्रामुख्याने मागील ३-४ वर्षात मराठवाडा येथील अनेक रुग्ण सोलापूरला येत आहे. सोलापूर हे आंतराष्ट्रीय वैद्यकीय पर्यटन केंद्र बनण्यासाठी येथील विमानसेवा सुरु होणे गरजेचे आहे.

आपल्या सोलापुर हे उत्तम वैद्यकीय पर्यटन केंद्र असून याचा प्रत्येक सोलापूरकरांनी अभिमान बाळगावा. सोलापुरात मागील दहा-पंधरा वर्षांमध्ये अनेक अद्यावत उपकरणांनी सज्ज असलेले मोठी रुग्णालय उभी राहताना पहावयास मिळतात यामागील कारण असे आहे की सोलापूर व सोलापूरच्या लगतच्या अनेक शहर व राज्यातील रुग्णांचा सोलापुरातील रुग्णसेवेवरचा असलेला विश्वास.

# महाराष्ट्रातील अग्रगण्य शिक्षण संस्था


**नीरा आणि भीमा नदी पश्चिम महाराष्ट्रातील दोन जुळ्या बहिणी. सराटी गावाजवळ अबलक वळण घेऊन निरा भिमेच्या कुशीत नृसिंहपूरला विसावली. या संगमाच्या अलीकडे पाच-सहा कोसावर अकलाईचे एक मंदिर आहे. अकलाई आदिमाया, शिवशक्तीचा अवतार तुळजाभवानीच रूप घेऊन आई अकलाई नीरेच्या काठावर थांबली. तेथेच गाव वाढत वाढत जाऊन अकलाई देवीच्या नावावरून अकलूज हे नाव पडलं. खरे तर माळशिरस तालुका म्हणजे दुष्काळी भाग, जेथे गवत उगवत नव्हते, पक्षाला बसण्यास झाडे झुडपे नव्हती अशा त्या निर्जल व निर्जल वाळवंटासारखा, त्या काळात माळशिरस तालुका माळांचा शिरोमणी म्हणून ओळखला जाणाऱ्या तालुक्यचे शिक्षण व सहकाराच्या माध्यमातून नंदनवन करणारे सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील. सहकारातून किती विकास केला जाऊ शकतो हे सोलापूर जिल्ह्याकडे पाहिलं कि समजते. प्रतिकूल परिस्थितीशी झगडून सहकारातून अनेक संस्था त्यांनी उभ्या केल्या. त्यातीलच एक शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज.**

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज

।। तेवो सदा ज्ञानमय प्रदीप ।।

आज ७४ वर्षे मागे वळून पाहताना, संस्थेचा अमृत महोत्सव साजरा करताना हा प्रवास कुठून सुरू झाला हे आजच्या पिढीने सवड काढून जाणून घेतला पाहिजे. सहकार महर्षींना शाळेची फी भरण्यासाठी पैसे नसल्यामुळे शाळा सोडावी लागली. आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून मुले वंचित राहू नयेत. त्यांच्या शिक्षणाची सोय करेन असा निश्चय केला. २६ ऑक्टोबर १९४७ रोजी स्वातंत्र्यसंग्रामात केलेल्या कार्याबद्दल विजयादशमीच्या मुहूर्तावर जनतेने शंकरराव मोहिते पाटील, बाबासाहेब माने पाटील व सदाशिवराव माने पाटील या बंधूंचा जनतेच्या वतीने ५०१ रुपयांची थैली व शेला पागोटे देऊन सत्कार केला. सहकार महर्षींनी त्यात तेवढ्याच रक्कमेची भर घालून व स्वतःची ११ एकर जमीन देऊन शिक्षणसंस्था काढण्याची घोषणा केली आणि एका वर्षाच्या आतच विजय विद्यार्थी वसतिगृह व हांगे चाळ येथे दोन खोल्या नाममात्र भाड्याने घेऊन ११ विद्यार्थ्यांवर २३ जून १९४८ रोजी संस्थेची सुरवात झाली.

गरीब मुलांना विनामूल्य शिक्षण उपलब्ध व्हावे, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पालकांना त्यांच्या पाल्यासाठी आर्थिक ताण पडू नये, हूशार प्रज्ञावंत मुलांना शिक्षणापासून वंचित राहू नये अशा उच्च ध्येयाबरोबरच वसतीगृह तयार करून शिक्षणाची व राहण्याची मुलांची सोय केली. केवळ आर्थिक सुबत्तेने समाज परिवर्तन होणार नाही हे लक्षात घेऊन विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मुशीतून बौध्दिक विकासाची नवी पिढी तयार झाली पाहिजे हे जाणून अनेक शैक्षणिक संस्था त्यांनी स्थापन केल्या.



**प्रा. तात्यासाहेब काटकर**

**मो. ९२२६१४४८३६**

तेवो सदा ज्ञानमय प्रदीप या व्रतविधानानुसार सेवाभावी वृत्तीने महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून दिले जात आहे. गेल्या ७५ वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीमध्ये शिक्षणाने येणारी सक्षमता वेगवेगळ्या रूपात प्रकट करून गुणवंत विद्यार्थ्यांच्या पिढ्या निर्माण केल्या आहेत. प्रत्येकाला शिक्षणात समान प्रवेश मिळावा या उद्देशाने जात, पंथ, धर्म आणि इतरांसारखी सामाजिक विभाजन दूर करून संस्थेने स्वावलंबन, समता, बंधुता आणि मानवतेच्या दिशेने प्रवास करत आहे. आज राज्यस्तरावर नावाजलेली एक सन्मानित शिक्षण संस्था असून महाराष्ट्रातील एक अग्रगण्य शिक्षण संस्थांच्या पैकी आहे. संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, व्यावसायिक शिक्षण अशा शाखेत लखो विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत. हजारो लोकांच्या हाताला या संस्थेमुळे काम मिळत आहे. चांगल्या ध्येयाने हाती घेतलेल्या या कामाला अनेकांनी मदतीचा हात पुढे केले. संस्थेच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक विद्यार्थी घडविण्याचे काम करत आहेत. संस्थेचे हजारो विद्यार्थी देशात, परदेशात विविध क्षेत्रात म्हणजे समाजकारण, राजकारण, सहकार, क्रीडा, शिक्षण, प्रशासकीय सेवा, शास्त्रज्ञ, संरक्षण, कायदा, उद्योग, व्यापार, शेतीमध्ये कार्यरत आहेत. अनेकांच्या परिश्रमातून संस्थेस, शाखांना, शिक्षक विद्यार्थ्यांना विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षण संस्था पुरस्काराने गौरव केला आहे.


राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, आनंदयात्रा, विज्ञानयात्रा, महालेझीम, रयतेचा राजा राजा शिवछत्रपती महानाट्य, डोळ्याचे पारणे फेडणारे सांस्कृतिक कार्यक्रम, दिल्लीच्या धर्तीवरती प्रजासत्ताक दीन, एस. पी. एम स्पोर्ट्स चॅम्पियन्सशिप, संयुक्त परीक्षा समन्वय समिती, शिक्षक उद्बोधन वर्ग, पारंपरिक खेळ, विद्यार्थी विमा अशा अनेक कार्यक्रम व उपक्रम राबविणारे महाराष्ट्रातील एकमेव संस्था म्हणजे शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज.

संस्थेची वाटचाल महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, संस्थेचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे. पुन्हा शेवटी भव्य देह्दृष्टी, प्रभावी व्यक्तीमत्व, खणखणीत आवाज, अमोघ वकृत्व आणि अंगीकृत कार्यासाठी सर्वासाचा होम करण्याची प्रवृत्ती अशा असामान्य व अलौकिक गुणांमुळे सहकार महर्षीनी महाराष्ट्रच्या सार्वजनिक जीवनात आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटविला आहे. जातिभेदाला मूठमाती देऊन एकजिनसी समाज निर्माण करण्याचे व शिक्षण उपलब्ध करून बहुजन समाजाला ताठ मान करून जगण्याचे साधन म्हणून त्यांनी स्थापिलेल्या शिक्षण संस्थेची नोंद इतिहासाला घ्यावी लागेल. सहकार महर्षी देहाने गेले असले तरी शिक्षण संस्था व महाराष्ट्रच्या सहकार क्षेत्रात ते जिवंत आहेत आणि पुढेही राहतील.

**हरीकिर्तन प्रवचन पुराण ज्याचे । त्यांचे मुखात वर्णन देवादिकांचे।**
**स्तोत्र पदतीन कविता रचिल्या अनंत।हा संत श्रीधर कवी स्मरुया मनात ।**

**नाझरा ता. सांगोला येथील श्री संत कवी श्रीधर स्वामी यांनी हरी विजय, पांडव प्रताप, जैमिनी अश्वमेध, राम विजय, शिवलिलामृत इत्यादी २७ ते २८ ग्रंथांचे ग्रंथकर्ते म्हणून सारा महाराष्ट्र त्याना ओळखतो. त्यांचा जन्म नाझरे येथे झाला. शिवलीलामृत हा ग्रंथ महाराष्ट्रातील घराघरापर्यंत देव्हाऱ्यावर जाऊन पोहचला आहे. या ग्रंथाचे पारायण शैव व वैष्णव पंथातील भाविक भक्त शिवरात्रीस व श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारीही याचे वाचन केले जाते. या सर्वग्रंथाचे सार म्हणून नित्यनियमित पठणासाठी ४२ ओव्या वाचणारेही अनेक भक्त आहेत. तसेच शिवस्तुतीतील ३० श्लोकही नित्यपणे गायिले जातात. भगवान शिवशंकराचा नाम:स्मरणाचा गजर या ग्रंथाच्या माध्यमातून अधिकच घुमत आहे. शिवलिलामृत या ग्रंथ लेखनाने श्रीधर स्वामी अधिकच प्रकाश झोतात आले.**

# नाझऱ्याचे श्री संत कवी श्रीधर स्वामी




श्रीधर स्वामी, रंगनाथ स्वामी यांचा जन्म नाझरे नगरीत होणे म्हणजे येथील सर्वांचे सद्भाग्य म्हणावे लागेल. त्याना लहानपणी श्रीखंड्या या नावाने ओळखले जात होते. श्री निजानंद रंगनाथ स्वामी हे त्यांचे चुलते होते. रंगनाथ स्वामी हे उत्तम प्रवचन-किर्तनकार होते. रंगनाथ स्वामी एकदा दिवसभर थकून-भागून आले होते. त्यांचे अंग तापाने फणफणत होते. किर्तनाची सेवा तर ठरल्याप्रमाणे करायची होती. त्यावेळी खंड्या सोबतच होता. त्यांनी किर्तनसेवा खंड्यास करण्यास सांगितले आणि खंड्याच्या जीभेवर 'श्री'अक्षर कोरले आणि किर्तनास सुरुवात करण्यास सांगितले. जीभेवर 'श्री' हे अक्षर लिहिल्यापासून खंड्याचे नाव श्रीधर लागले गेले. गुरुकृपा अन् भगवंत कृपा एकाच वेळी झाल्यामुळे श्रीधराचे भाग्य उदयाला आले. वझरे हद्दीत श्रीधरस्वामींच्या आजोबांची म्हणजे दत्तानंद स्वामींची जीवंत समाधी आहे. समाधीस्थळी बसून त्यानी लेखन प्रपंच करायला सुरुवात केली.

श्रीधर स्वामींचे ११ वे वंशजातील सदस्य स्व. पांडुरंग देशपांडे गुरुजी (बापू) यांच्या अर्धांगिनी ह. भ. प. निर्मलादेवी देशपांडे यांचीही तपश्चर्या फार मोठी आहे. त्यानी ११०० शिवलिला मृत पारायणाचा संकल्प पूर्ण आहे. त्यांनी स्वत:च्या अक्षरात(हस्तलिखीत)पूर्ण ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिली आहे. १६५८ मध्ये जन्मलेल्या श्रीधरस्वामींनी १७२९ मध्ये आपला देह धरणीवर ठेवला. त्यांची समाधी पंढरपूर येथे दत्त घाटावर आहे. पंढरपूरला गेलेले वारकरी विठूरायाच्या दर्शनाबरोबर श्रीधरस्वामींच्या समाधीचेही दर्शन घ्यायला विसरत नाहीत.



**सिध्देश्वर झाडबुके**

**मो. ९९७५०३१०६५**

**२० वर्षांपूर्वी संपूर्ण देशात केवळ एका जिल्ह्यासाठी सोलापूर विद्यापीठाची स्थापना झाली. अशा या एकमेव विद्यापीठाने गेल्या दोन दशकात सोलापूर जिल्ह्यातील उच्च शिक्षणाचा 'रेश्यो' वाढवण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. आज संपूर्ण देश व जगभरातील उच्च शिक्षणाची स्थिती बदलत आहे. त्या बदलास सामोरे जात केंद्र सरकारने जवळपास ३३ वर्षानंतर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP)-२०२० आणले. महाराष्ट्र सरकारने देखील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वीकारले. यंदाच्या वर्षापासून सर्व महाविद्यालयामध्ये नवीन शैक्षणिक धोरणाची अमलबजावणी होत आहे. याच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार जिल्ह्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ताभिमुख व रोजगाराभिमुख उच्च शिक्षण देऊन त्यांच्यात कौशल्य निर्माण करून रोजगाराभिमुख पिढी निर्माण करण्याचा ध्यास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने घेतलेला आहे.**



## गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण देऊन रोजगाराभिमुख पिढी निर्माण करण्याचा सोलापूर विद्यापीठाचा ध्यास!

# विद्यापीठास झाली वीस वर्षे पूर्ण; दमदार वाटचाल!


राहुल वंजारे

मो. ९३२५०५०१२३






सोलापूर विद्यापीठ स्थापनेपूर्वी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे पदव्युत्तर केंद्र सोलापुरात अस्तित्वात होते. महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दि. २२ जुलै २००४ नुसार सोलापूर विद्यापीठ स्थापन झाले. दि. ५ मार्च २०१९ रोजी या विद्यापीठाचा नामविस्तार होऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ असा नामाविस्तार राज्य शासनाने मंजूर केला. २० वर्षे पूर्ण करून २१ व्या वर्षाकडे वाटचाल करत असलेल्या या विद्यापीठाने सोलापूर जिल्ह्यात शैक्षणिक क्रांती करून उच्च शिक्षणासाठी पुणे, मुंबई, गुलबर्गा, विजापूर आदी परजिल्ह्यात व परराज्यात जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्थलांतर थांबवले.

'विद्यया संपन्नता' ब्रीदवाक्य अंगीकारलेल्या या विद्यापीठाने गुणवत्ताभिमुख शिक्षणाची सोय करण्याबरोबरच रोजगार व स्वयंरोजगाराच्या दृष्टिकोनातून कौशल्याभिमुख व उद्योगाभिमुख पिढी घडवण्यासाठी प्रयत्न करीत आहे. निश्चितच सोलापूर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात समृद्ध विकास यामुळे होताना दिसून येत आहे.२००४मध्ये सोलापूरचे सुपुत्र असलेले महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मोठ्या प्रयत्नाने केवळ एका जिल्ह्यासाठी सोलापूर विद्यापीठाची स्थापना झाली. आज या विद्यापीठाने चांगली प्रगती करून देशातील विद्यापीठांसाठी रोल मॉडेल विद्यापीठ ठरले आहे. आजपर्यंत या विद्यापीठाच्या कुलगुरूपदाची धुरा अनुक्रमे डॉ. इरेश स्वामी, डॉ. बाबासाहेब बंडगर, डॉ. एन. एन. मालदार, डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी सांभाळली. मागील १० महिन्यांपूर्वी म्हणजे दि. ६ ऑक्टोबर २०२३ रोजी कुलगुरूपदाची सूत्रे प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी स्वीकारली आहे. नूतन कुलगुरू डॉ. महानवर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा विकास करताना जागतिक पातळीवर आपली कीर्ती झाली पाहिजे असा मानस व्यक्त केलेला आहे. त्या दृष्टीने त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली आहे. नॅकचे मानांकन वाढवून विद्यापीठाची गुणवत्ता सिद्ध झाली पाहिजे आणि येथील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत, या दृष्टीने विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे.

विद्यापीठाची नूतन प्रशासकीय इमारत आणि परीक्षा भवनची आलिशान अशी देखणी इमारत नवीन कॅम्पसमध्ये तयार झाली आहे. उद्घाटनाचा सोहळा येत्या काळात होण्याची शक्यता आहे. याच बरोबर सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिल्यानंतर राज्य शासन आणि विद्यापीठ प्रशासन यांच्याकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा भव्य पुतळा विद्यापीठाच्या नवीन कॅम्पसमध्ये उभारण्याचा निर्णय घेऊन त्यादृष्टीने वेगाने पावले उचलली आहेत. पदमश्री पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांच्याकडून अहिल्यादेवींचा पुतळा तयार केला आहे. स्मारक देखील विद्यापीठाच्या नूतन कॅम्पसमध्ये उभारले जात आहे. अतिशय उंच आणि भव्य-दिव्य ब्रांझमधील १४ फुटी पुतळा उभारत आहे. राज्य शासनाकडून साडे चौदा कोटींचा निधी त्यासाठी मंजूर झालेला आहे.

त्याचबरोबर सोलापूर विद्यापीठ कॅम्पसमध्ये सुरुवातीला पाच संकुले आणि काही विभाग सुरू होते. आता यामध्ये वाढ होऊन ११ संकुले व ३६ विभाग आणि ५४ कोर्सेस झाली आहेत. विद्यार्थ्यांची संख्या दुपटीने वाढ झाली आहे. सुमारे दोन हजार विद्यार्थी विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये शिक्षण घेत आहेत. मुलींची संख्यादेखील लक्षणीय आहे. सुसज्ज ग्रंथालय, वसतिगृहे, जागतिक दर्जाची क्रीडांगणे, स्मार्ट रूम्स यामुळे दरवर्षी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या विद्यापीठात रांगा लागलेल्या दिसून येतात. शेजारील धाराशिव, सांगली, सातारा या जिल्ह्यातील विद्यार्थी देखील सोलापूर विद्यापीठात पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी शिक्षण घेतात.

विद्यापीठातील कौशल्य विभाग केंद्राच्यावतीने खूप मोठे कार्य हाती घेऊन १४३ हून अधिक कौशल्य विकासाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. यामध्ये महत्त्वाचे कोर्सेस सुरू करून तरुण पिढीला सक्षम बनण्याचे कार्य केले जात आहे. गेल्या तीन वर्षात सहा हजार विद्यार्थी विविध कौशल्य विकासाच्या कोर्सेसना प्रवेश घेऊन प्रशिक्षित झाले आहेत. यामधील ९०% विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगार प्राप्त झालेला आहे. विशेषतः वैद्यकीय स्किल कोर्सेसचा आकडा १००% पर्यंत गेलेला आहे. याचबरोबर विद्यापीठातील इनक्युबेशन सेंटरचे कार्य अतिशय वेगाने सुरू असून उद्योजक पिढी घडवण्यासाठी प्रयत्न होत आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्पनांना मूर्त स्वरूप देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य स्टार्टअप यात्रेच्या माध्यमातून होत आहे. आज सोलापूर विद्यापीठाने राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक संस्थांबरोबर सामंजस्य करार केले आहेत. या माध्यमातून शिक्षणाचे आदान-प्रदान व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञान मिळवण्यासाठी प्रयत्न होत आहेत.

परदेशातील काही विद्यापीठांशी देखील आपल्या विद्यापीठाने करार केले आहे. यामध्ये फिनलँड आणि माल्टा येथील विद्यापीठाचा समावेश आहे. याचबरोबर प्रगत राष्ट्रातील युनियन ऑफ ऑक्सफर्ड या विद्यापीठीय संघटनेने आपल्या विद्यापीठाचे कौतुक करीत जागतिक समीट परिषदेसाठी निमंत्रित केले होते. त्यामध्ये आपल्या विद्यापीठाचे सादरीकरण करण्यात आले. जागतिक पातळीवर देखील आपल्या विद्यापीठाचे या माध्यमातून नाव झाले. नॅक पुनर्मुल्यांकनात ३४ गुण वाढून २.९६ सह बी प्लस प्लस चा दर्जा सोलापूर विद्यापीठाने प्राप्त केला. कोविड काळात देखील विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण, ऑनलाइन परीक्षा घेण्यात शंभर टक्के यशस्वी झाले. एकूणच सोलापूर विद्यापीठाने अल्प कालावधीत चांगली प्रगती केल्याचे अनेक शिक्षण तज्ञांनी म्हटले आहे.

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कॅम्पसमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या कॅम्पस मुलाखतीसाठी देखील विविध उपक्रम राबवले जातात. याकरिता अनेक कंपन्याशी सामंजस्य करार विद्यापीठाने केलेला आहे. त्याचबरोबर विद्यापीठात विविध विभागात शिक्षण घेणाऱ्या जवळपास सर्व अभ्यासक्रमांसाठी देखील शिष्यवृत्ती देखील राज्य शासनाकडून प्राप्त होते. त्यामुळे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्याकरिता विद्यार्थ्यांना चांगला फायदा होतो.

### संलग्न महाविद्यालये १०९

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये : १०९
विद्यापीठांतर्गत एकूण विद्यार्थ्यांची संख्या : सुमारे ७५ हजार
विद्यापीठ कॅम्पसमधील मागील वर्षीची विद्यार्थी संख्या :२५३७

**विद्यापीठातील सध्यस्थिती :**

संकुले-११, विभाग-३६
कोर्सेस-५४, स्किल कोर्सेसची संख्या-१४५

**सोलापूर हे शहर अनेक कारणांनी ओळखला जातो. मागील काही वर्षापासून सोलापूरला पक्षी पर्यटन केंद्र अशी नवी ओळख मिळत आहे. सोलापूर जिल्ह्यातील फक्त २ टक्के एवढाच भूप्रदेश जंगलाने व्यापलेला आहे (वास्तविक तो ३०% ने व्यापला असावा). सोलापूर जिल्ह्यामध्ये वर्षभरात २७० हुन जास्त पक्ष्यांच्या प्रज्याती आढळतात. भारतातील २२ टक्के पक्ष्यांच्या प्रज्यातींचे सोलापुरात आढळतात. दर हिवाळ्यामद्धे परदेशातून मोठ्याप्रमाणात परदेशी पक्षी येथे स्थलांतर करतात.**

# उत्तम पक्षी पर्यटन केंद्र


डॉ. व्यंकटेश मेतन

मो. ९३७००८००९०








मागील काही वर्षांपासून भारतातील अनेक पक्षीप्रेमी आणि वाईल्डलाईफ फोटोग्राफर सोलापूरला भेट देत आहेत. दिवसेंदिवस येथे येणाऱ्यांच्या संख्येत वृद्धी होत आहे.यामुळे सोलापूर हे पक्षी पर्यटनाच्या दिशेने वाटचाल करत आहे.

सोलापूर हा वन्यजीवनदृष्ट्या अत्यंत समृद्ध असून येथे अनेक दुर्मिळ पाणपक्षी, माळरानावरील पक्षी तसेच झुडपातील पक्षी पहावयास आढळतात. सोलापूर शहरात, शहराच्याजवळ आणि जिल्ह्यात पक्षिनिरीक्षणासाठी उत्तम स्थळे आहेत. त्यामध्ये शहरात कंबर तलाव, स्मृती वन विहार, सिद्धेश्वर वनविहार, होटगी तलाव, शहराजवळ हिप्परगा तलाव, नान्नज, बोरगाव, हिरज, कुरनूर धरण, यमाई तलाव, बोरामणी पाझर तलाव तसेच जिल्ह्यामध्ये पंढरपूर, अकलूज, माळशिरस, करमाळा, अक्कलकोट, पिलीव या तालुक्याचा समावेश होतो. सोलापूरमध्ये आढळणाऱ्या काही महत्वाच्या आणि दुर्मिळ पक्ष्यामध्ये तिरंदाज, समुद्री बगळा, पांढरा करकोचा, रोहित, कलहंस, चक्रवाक, मर्लिन बदक, चतुरंग बदक, तलवार बदक, मोठी लालातरी, आखूड बोटाचा सर्पगरुड, पांडुरका भोवंत्या, लाल डोक्याचा ससाणा, सामान्य क्रौन्च, माळढोक, कास्य पंखी कमळपक्षी, भारतीय धाविक, कंठेरी अर्ली, काळ्या डोकंच कुरव यांचा समावेश होतो.

एक उत्तम पक्षी पर्यटनासाठी लागणारे महत्त्वाचे स्तंभ म्हणजे सोलापूरला पोहोचण्यासाठी उत्तम महामार्ग व रेल्वेमार्ग वाहतूक, राहण्याची उत्तम सोय, सोलापूर शैलीचे जेवण, पर्यटन संबंधीचे कार्यालय, ट्रॅव्हल एजंट्स, इतर पर्यटन आकर्षणे, करमणूक व प्रवासीसाठी लागणाऱ्या सर्व सोयी उपलब्ध आहेत. या सर्व गोष्टीचा विचार करता सोलापूर हे भारतातील एक उत्तम पक्षी पर्यटन केंद्र बनू शकते.

सोलापूर पक्षी पर्यटन केंद्र होण्यासाठी पुढील गोष्टी करणे आवश्यक आहे. सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये असलेले तलाव गवताळ प्रदेश माळरान छोटी जंगले तसेच यांचे संगोपन आणि संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी महाराष्ट्र सरकार, वनविभाग, वन विभागातील अधिकारी, कर्मचारी, सोलापुरातील सर्व नागरिकांची आणि सामाजिक सेवा करणाऱ्या संस्थेची एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. सोलापुरात योग्य ठिकाणी पक्षी निरीक्षण आणि छायाचित्रे काढण्यासाठी लपणग्रह बांधली पाहिजेत. सोलापूर पक्षी पर्यटन केंद्र झाल्यास आपल्या सोलापूर मधील असलेल्या पक्ष्याच्या वास्तवाची सर्व ठिकाणे संरक्षित करण्यास मदत होईल.

मागील ५ वर्षात वातावरणाचा समतोल बिघडलेला आहे. यामुळेच मागील काही वर्षात परदेशातून येणाऱ्या पक्षांचे प्रमाण कमी झाले आहे. निसर्गाचा नाश म्हणजे मानव जातीचे नाश. हे मानवांना माहित असूनही त्याकडे संवेदनशीलपणे न पाहता हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत आहे ही मोठी शोकांतिका आहे. चला तर प्रत्येकाने थोडासा हातभार लावू या. जस आपल्याला स्वतःच्या घराबद्दल प्रेम असते त्याच भावनेने आपण प्रत्येक पक्षी आणि प्राण्यांची नैसर्गिक वसाहती सुरक्षित ठेऊ या.

**पक्षी निरीक्षणावेळी घ्यावयाची काळजी**

काही पक्षी ठराविक मोसमातच दिसतात त्यामुळे पक्षीनिरीक्षणासाठी योग्य मौसम आणि दिवस ठरविणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. पक्षीनिरीक्षणासाठी सकाळी सूर्योदयापासूनचे दोन-तीन तास आणि सूर्यास्ताच्या अगोदरचे दोन-तीन तास ही उत्तम वेळ असते. पक्षीनिरीक्षणासाठी आपल्या अवतीभोवतीच्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास असावा लागतो. पक्षीनिरीक्षणासाठी निघताना आपल्यासोबत एक उत्तम प्रतीचा बायना कुलर, छायाचित्रे काढायची असल्यास उत्तम प्रतीचा कॅमेरा, पक्षांची माहिती असलेली छोटी पुस्तके, निसर्गाशी समरूप होणारा पोशाख असावा. पक्षी निरीक्षण करताना पक्षी आणि आपल्यामध्ये योग्य ते अंतर ठेवूनच कराव्यात, छायाचित्रे काढताना पक्षांच्या अगदी जवळ जाणे टाळावे, पक्ष्यांना कोणत्याही प्रकारचा धोका/भीती निर्माण होईल अशा हालचाली करू नयेत. आपल्या देशातील शिकार कायद्यांचे जाणून घ्या आणि त्यांचे पालन करा. पक्षी निरीक्षणानंतर आपण पाहिलेल्या पक्ष्याची नावे या ठिकाण याची वहीत लिहून नोंद करावी.

**पक्ष्यांचे संरक्षण, संवर्धन करण्याचे मार्ग**

पक्ष्यांचे संवर्धन आणि संरक्षण करण्याचे काही ठराविक उत्तम असे मार्ग मी आपणासमोर मांडीत आहे. प्रत्येक नागरिकाने याचे पालन केले तर आपला निसर्ग समतोल राहील याची मला खात्री आहे.

जेंव्हा कीटक नियंत्रणासाठी रसायनांचा वापर केलेले धान्य उंदीर, कीटक, छोटे प्राणी,पक्षी खातात जेंव्हा ह्याची शिकार करणारे पक्षी त्यांना भक्ष म्हणून खातात त्या पक्ष्याच्या जीवास धोका होतो आणि अनेक वेळा ते मृत्युमुखी पडतात. यासाठी कीटकनाशकाचा उपयोग कमी होऊन नैसर्गिक कीटक नियंत्रणावरील उपायावर भार द्यावा. ह्यावर पूर्णपणे नियंत्रण आणण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी शेतीची तंत्रे बदलून सेंद्रीय शेती करून सेंद्रिय पिकांचे उत्पादन करावे.

आपल्या आसपासच्या वातावरण व जमिनीतील मातीच्या कस यानुसार आणि तेथील पक्ष्याना लागणाऱ्या नैसर्गिक वनस्पती आणि फळझाडे मोट्या प्रमाणात लावावीत. आपण पक्ष्यांसाठी आपल्या घरावर किंवा अंगणात त्यांचे अन्न, पाणी आणि सुरक्षित जागी घरटी ठेवावीत.

आपण आपला रिकामा वेळ आपल्या नजीकच्या निसर्गात फेरफटका मारून पक्षी निरीक्षण करा आणि निसर्गाचा आनंद घ्या. आपल्या भागातील सर्व पक्षी तसेच धोकादायक प्रजातींचे संरक्षण करण्यासाठी संवर्धन गट/ संस्था संवर्धनाच्या प्रयत्नांमध्ये सामील होऊन सक्रियपणे कार्य करा. एक निसर्गप्रेमी म्हणून मी आपणा सर्वांना नम्रपणे सांगतो की आपण आपल्या आजूबाजूला असलेल्या निसर्ग, जंगले आणि यातील वन्यजीवन याची माहिती आणि त्याचं महत्त्व जाणून घ्यावी.





























# आदर्श सैनिक स्कूल,कुर्डूवाडी सोलापूर जिल्ह्यातील पहिली तर राज्यातील चौथी शाळा

आदिशक्ती शिक्षण संस्था संचलित आदर्श पब्लिक स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून भारत सरकारच्या संरक्षण विभागाच्यावतीने सैनिक शिक्षण सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. या सैनिक स्कूलमूळे कुडूवाडी शहराची राज्यातच नव्हे तर देशामध्ये ओळख होणार आहे.

कुर्डवाडी येथे मंजूर झालेली सैनिकी शाळा ही सोलापूर जिल्ह्यातील पहिली आहे तर राज्यातील जुन्या सातारा, चंद्रपुर नंतर ही चौथी शाळा आहे हे विशेष. ८४० निवासी विद्यार्थी, शिक्षक तसेच कर्मचारी यामुळे कुर्डूवाडी शहरातील बाजारपेठेला निश्चित लाभ होऊन अर्थकारण वाढणार आहे.




सैनिक स्कूलमध्ये पहिल्या वर्षी १२० विद्यार्थी देशाच्या विविध कानाकोपऱ्यातून शिक्षणासाठी येणार आहेत. भविष्यात प्रतिवर्षी १२० प्रमाणे इयत्ता बारावी पर्यंत ८४० विद्यार्थी येणाऱ्या वर्षांमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यातून कुर्डूवाडी या ठिकाणी शिक्षणासाठी येणार आहेत.आदर्श सैनिक स्कूलमध्ये १८ एकर परिसरामध्ये सर्व सोयी सुविधा युक्त बारावीपर्यंतचे शिक्षण दिले जाणार आहे. रोबोटिक लॅब, लैंग्वेज लॅब, एस.एस.टी. लॅब, पी.सी.एम.बी. लॅब च्या माध्यमातून तज्ञ शिक्षक मंडळींकडून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाणार आहे. सदराचे युनिट हे कर्नल, ड्रिल इण्स्ट्रक्टर यांच्या निगरानीखाली चालविण्यात येणार आहे. व या युनिटसाठी आवश्यक असणारा प्रशिक्षित स्टाफ देखिल नेमण्यात आला आहे. एन.डी.ए.ला विद्यार्थी पाठविणे हा शाळेचा प्रमुख उद्देश असेल. त्याचबरोबर यू.पी.एस.सी., नीट यासारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्याचाही उद्देश आहे.

**- अमोल सुरवसे**
**संस्थापक अध्यक्ष**

